शनिवार । १२ जुलै १९८० । ७५ पैसे

# माणूस

## यापुढील दोन विशेषांक..

## संजय नंतरची दिल्ली...

अटलबिहारी वाजपेयी, मधू दंडवते
यशवंतराव चव्हाण, लालकृष्ण अडवानी
शंकरराव चव्हाण, शिवराज पाटील
रामभाऊ म्हाळगी, समर मुकर्जी
अंबिका सोनी, पिलू मोदी
व इतर अनेक खासदार व
युवक काँग्रेसचे कार्यकर्ते
यांच्या भेटीगाठींवर आधारित
विशेषांक

किंमत : एक रुपया

१९ जुलै

## किसान कामगार विशेषांक

चला....
दिल्लीहून महाराष्ट्रात....
पुरंदर तालुक्यातील नायगावला....
कालपरवापर्यंत दुष्काळी म्हणून उजाड पडलेले
असंख्य गावांसारखेच हे एक गाव.
पण विलास साळुंखे या पुण्यातील एका जिद्दी
कारखानदाराने या दुष्काळावर मात करणारी
'पाणी पंचायत' तेथे सुरू केली आणि
मुंबईच्या झोपटपट्टीत किडामुंगीसारखा
जगणारा कामगारही आपल्या मूळ गावाकडे-
नायगावला परतू लागला....किसान
बनण्यासाठी....!
ही वाटचाल सादर करणारा अंक

२६ जुलै

किंमत
तीन रुपये

सादरकर्ते
विजय परुळकर

# सप्रेम नमस्कार

■ २१ जूनच्या अंकातील श्री. शरद अभ्यंकर यांचे ' गाझा ते गॅलिली ' संबंधातील पत्र वाचले. मला वाटते वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहता, अरब इस्राइल तंटा ' बळी तो कान पिळी ' ह्या तत्त्वानुसारच सुटू शकेल. श्री. अभ्यंकरांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना स्वदेश, मातृभूमी, मानवतावादी इत्यादी भोंगळ काल्पनिक गोष्टींचा वास येत आहे; त्या गोष्टी निव्वळ भावनेतून जन्म पावल्या आहेत व त्या प्रयोगशाळेत विज्ञानाच्या कसोटीवर कधीही सिद्ध करता येणार नाहीत.

हिंसाचार किंवा हत्या म्हणजे तरी काय ? आपण आपल्या उदरभरणासाठी, शास्त्रीय संशोधनासाठी प्रत्यही कित्येक प्राण्यांची हत्या करीत असतोच ! मनुष्य व इतर पशू यांच्या हाडा-मांसातील रासायनिक घटक ( प्रमाणातील कमीजास्तपणा सोडल्यास) एकच असतात. मनुष्य ह्रा सुद्धा वैज्ञानिकदृष्ट्या एक प्राणीच आहे. हिंसाचाराच्या बाबतीत मनुष्य व इतर प्राणी यांच्यात वैज्ञानिकदृष्ट्या तरी कोणताच फरक करणे गैर होय.

श्री. अभ्यंकरानी मांडलेला ' बांधव ' वगैरे मुद्दा तर अत्यंत हास्यास्पद व गांधीजीसारख्या एका सनातनी हिंदूचेच ते विचार वाटतात. वास्तविक आपण मेल्यानंतर हे जग काही आपणास पुन्हा दिसणार नाही. आपण जे काही सुखोपभोग घ्यावयाचे ते जिवंत असेपर्यंतच घेतले पाहिजेत. अशा परिस्थितीत कोण कुणाचे बांधव ? माझ्या सुखासाठी मी इतरांचे गळे का घोटू नयेत ? याचे उत्तर जोपर्यंत वैज्ञानिक प्रयोगशाळेत मिळत नाही तोपर्यंत ' बांधव ' वगैरे निव्वळ काल्पनिक. हिंदु कल्पनांना काडीचेही महत्त्व देता कामा नये !

२८ जून
सुभाष भोबे
संभाजीनगर, गोवा.

■ ' गाझा ते गॅलिली ' च्या संदर्भातील दि. २१ जूनच्या अंकातील डॉ. शरद अभ्यंकर यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना पुढीलप्रमाणे स्पष्टीकरणे संभवतात—

१ : ' भारत आपल्यावर.......दिल्ली ताब्यात ठेवणे आवश्यक आहे ' असा दावा केला तर तो योग्यच होय; पण त्यासाठी दोन अटी आहेत. पहिली अट—भारताने पाकिस्तानवर पूर्वी कधी आक्रमण केले असेल, व दुसरी अट—भारत पुन्हा तसेच आक्रमण करण्याचा संभव असेल, तेव्हाच पाकिस्तानचा दावा योग्य म्हणावा लागेल. अरबांचा प्रदेश परत करा असा कोरडा उपदेश करणे म्हणजे ' आयजीच्या जिवावर बायजी उदार ' अशातलाच प्रकार झाला. इस्राइलला नामशेष करण्याच्या हेतूने अरबांकडून पुन्हा आक्रमण होणार नाही याची जबाबदारी स्वीकारण्यास हे उपदेशक तयार आहेत काय ?

२ : ज्यांना माघार घ्यायला पुरेसा प्रदेश नाही त्यानी 'आक्रमकाचा प्रदेश प्रतिआक्रमण करून ताब्यात घ्यावा नाही तर स्वत.च नष्ट व्हावे लागेल इथे हे लक्षात ठेवावे लागेल की, १९४८ मध्ये इस्राइल राष्ट्राच्या स्थापनेच्या दिवशीच प्रथम अरब राष्ट्रांनी इंग्रजांच्या प्रोत्साहनाने इस्राइलवर आक्रमण केलेले आहे.

३ : आई-बापानी हलाहल दिल्यास, जन्मदात्याचे ऋण स्मरून ते घ्यावे काय ?

४ व ५ : जे लोक हिंसेला वाहिलेले आहेत त्याना हिंसेनेच उत्तर मिळणार ! ही तर एक प्रतिक्षिप्त क्रिया आहे. निसर्गाचा नियम आहे तो. इतर धर्मीयांना जगण्याचाच अधिकार नाकारणाऱ्या धर्माच्या अनुयायांनी जगभर जो हिंसेचा नंगानाच केला त्याची प्रतिक्षिप्त क्रिया अहिंसेने कशी होणार ? विंचवाला कितीही गोंजारला तरी तो दंश करणे सोडील काय ?

६ : अशा वेळी शांततेचा उपदेश व्यर्थ असतो. त्यामुळे प्रश्न न सुटता लोंबकळत राहातात, असा हजारो वर्षांचा अनुभव आहे. असे उपदेश कारणी लागले असते तर महाभारत घडलेच नसते ! हिंदुस्थान परतंत्र झाले नसते, पाकिस्तान निर्माण झाले नसते, नागालँडची समस्या निर्माण झाली नसती. इतकेच नव्हे तर आम्हीच स्वतंत्र केलेला बांगला देश आमच्यावरच उलटला नसता !

७ : ' या देशात मुस्लिम धर्मीयांचेच राज्य


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे
अंक : सहावा
१२ जुलै १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

चालेल असे म्हणणाऱ्याना त्यांच्याच भाषेत उत्तर द्यावे लागते.

८ : व ९ : शतकानुशतकाच्या मातृभूमीतून खि पू. ४ मध्ये हाकलल्या गेलेल्या ज्यू समाजाने १९०० वर्षेपर्यंत आपली मातृभूमीवरील निष्ठा कणभरही कमी होऊ दिली नाही. 'या वर्षी आम्ही गुलाम आहोत; पण पुढल्या वर्षी आम्ही स्वतंत्र होऊ. या वर्षी आम्ही (दूरदेशी) इथे आहोत; पण पुढल्या वर्षी आम्ही इस्रायलच्या पवित्रभूमीत झिऑनमध्ये असू !' अशी पुनरुत्थानाची आकांक्षा अंतःकरणात प्रज्वलित करणारी प्रार्थना केल्यावाचून त्यांनी आपला फाक्षोष्टरचा सण कधी साजरा केला नाही आणि शतकानुशतके त्यांची मातृभूमी बळकावून बसलेल्याना १९०० वर्षांनंतर हाकलून लावल्यास त्यात त्यांचे काय चुकले ?

१० : क्र ४ मध्ये याचे स्पष्टीकरण आलेच आहे.

११ : आमची भूमी बळकावून बसलेल्या आक्रमक चीन–पाकिस्तानशी आम्ही संबंध ठेवतो; पण अरबी आक्रमकांची भूमी बळकावणाऱ्या इस्रायलशी मात्र संबंध ठेवीत नाही. हा मुस्लिम अनुनय नव्हे तर काय ?

१९४६ च्या मार्चमध्ये ब्रिटिश पार्लमेंटचा तत्कालिन सदस्य सिडने सिल्वरमन याच्यासमवेत म. गांधींचा आलेला संवाद यासंबंधात उद्‌बोधक आहे.

'तुम्ही अरबानाही पॅलेस्टाइनमध्ये प्रवेश्यास संमती द्याल काय ? -- गांधीजी.

'हो देऊ; पण ती संमती पॅलेस्टाइनमध्ये ज्यूंचे 'राष्ट्रनिकेतन' [ Jewish National Home ] प्रस्थापित करण्याच्या आमच्या घोषणेशी विसंगत नसेल तर' – सिल्वरमन.

'म्हणजे आपण बहुसंख्य अरबाना त्या ठिकाणी अल्पसंख्य करू इच्छिता ?– गांधीजी.

'अरबाना त्यांची स्वत:ची सात राज्ये आहेत. याचा अर्थ ज्यूवर १०० टक्के अन्याय होऊ नये म्हणून अरबावर पांच टक्के अन्याय करणे असा होतो' –सिल्वरमन

'म्हणजे अरबांना काही गमवावे लागणार तर ?' –गांधीजी.

'असे थोडेसे गमवावे लागेल की जे त्याचे कधी नव्हतेच !' – सिल्वरमन.

या चर्चेच्या शेवटी महात्माजींनी आपला मतभेद व्यक्तवून सांगितले की, 'भारतीय मुसलमानांचे यासंबंधात समाधान केल्यावाचून झिऑनवादी मंडळींनी हिंदुस्थानच्या पाठिंब्याची अल्पही प्रतीक्षा करू नये.'

यावरून प्रश्नाच्या योग्यायोग्यतेपेक्षा महात्माजी भारतीय मुसलमानांच्या समाधानाला अधिक महत्त्व देत होते असेच दिसून येते. पुढे 'मुसलमानाचे समाधान' करणे किती दुर्घट असते याचा महात्माजींना लवकरच पुरेपूर प्रत्यय येऊन भारताची इतिहाससिद्ध अखंडता गमावून बसावे लागले हा भाग वेगळा !

२९–६–८० राजेन्द्र विश्वनाथ आर्तेकर
संभाजीनगर (वास्को) गोवा

# आसाम आंदोलन : बंगाली प्रतिक्रिया

तारा पंडित, कलकत्ता

आसाम आंदोलनाविषयी बंगाल सोडला तर सर्व राज्यांतील लोकांना सहानुभूति वाटताना दिसते. विशेषत: महाराष्ट्रातील पत्रकारानी आंदोलनाबाबत पाठिंबा देणारेच उद्‌गार काढलेले आढळले; पण बंगालची बाजू समजून घेणेही अत्यंत आवश्यक आहे. बंगाली माणसाच्या दृष्टिकोनातून पाहिल्याखेरीज सत्यपरिस्थिती आकलन होणार नाही व कोणतेही विधान एकांगी ठरू शकेल. म्हणून बंगाली माणसाचे म्हणणे काय आहे ते सुसबद्ध मांडण्याचा एक प्रयत्न!

आसाम, मेघालय आणि पूर्वांचल प्रदेशातील इतर राज्ये यांनी उभे केलेले आव्हान हे प्रत्यक्ष भारतीय राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेला व देशाच्या एकात्मभावाला तडा देणारे आहे. जर हे प्रश्न तावडतोब व समाधानपूर्वक मिटवले नाहीत तर त्याच्या प्रतिक्रियाचे जाळे सर्व देशभर पसरल्यावाचून राहणार नाही. ह्या परकीय नागरिक आंदोलनामागे काही विशिष्ट राजकारणी मंडळींचा हात असून त्यांना परदेशी सत्ता अप्रत्यक्ष मदत करीत आहेत.

बाहेरचे विद्वान आणि पत्रकार ह्यांना अजून येथील घडामोडीच्या खोलीची, व्यापकतेची आणि अंतर्बाह्य परिस्थितीची नीटशी कल्पना आहे असे वाटत नाही. खून, हल्ले, लुटारूपणा, फसवेगिरी इत्यादी कृत्याना असंख्य भारतीय नागरिक बळी पडले आहेत ह्याची त्यांना जाणीव नाही. ह्या चळवळीचे उद्देश देशाची सुरक्षा आणि एकात्मता धोक्यात आणणारे आहेत ह्याचीही त्यांना जाणीव नाही. जे कोणी पत्रकार व पुढारी अलीकडे आसामला भेट देण्यास गेले त्याना फक्त चळवळीतील विद्यार्थी व इतर नेत्यांकडेच सरळ नेण्यात आले व संपूर्णपणे एकतर्फी बातम्या पुरवण्यात आल्या अशा लोकांनी व पत्रकारानी तयार केलेले रिपोर्ट हे पूर्णांशाने एकांगी ठरले आहेत व त्यांनी उभे केलेले चित्र हे लोकमत गोंधळून टाकणारे आहे. ह्या पत्रकार-प्रतिनिधींना चळवळीला बळी पडलेल्या लोकांच्या भेटीगाठी आवर्जून वर्ज्य करण्यात आल्या होत्या.

सरकारी अधिकारीवर्ग आणि पोलिसखाते हे चळवळीशीच हातमिळवणी करणारे ठरले आणि ज्याच्यावर हल्ले झाले त्यांचा कुणीच त्राता उरला नाही. प्रेसिडेंट्स् रूल येऊनही परिस्थितीत काहीच फरक पडला नाही. राज्यसरकार तर आपल्या जबाबदाऱ्याही पार पाडीनासे झाले आहे.

आसाममध्ये परकीयाविरुद्ध वेळोवेळी आंदोलने झाली ती १९४८,१९५०,१९५५, १९६० (हे जास्त प्रमाणावर).१९६५,१९६८ (या वर्षी प्रजासत्ताकदिनावरच बहिष्कार टाकला होता),१९७१ व १९७२ (हे बऱ्याच मोठ्या प्रमाणावर) ह्या वर्षांमध्ये.

सध्याचे आंदोलन व ही पूर्वीची आंदोलने ह्यात एक फार मोठा फरक आहे. पूर्वीची आंदोलने फक्त बंगाली लोकांविरुद्ध होती आणि सध्याचे आंदोलन आहे–

(१) आसामी भाषीयांव्यतिरिक्त सर्व भारतीय नागरिकांविरुद्ध.

(२) राष्ट्रीय एकात्मतेची कल्पना आणि घटनेतील एका विशिष्ट कलमाविरुद्ध – ज्या कलमान्वये देशातल्या देशात कोणीही नागरिक कोणत्याही प्रदेशात मुक्तपणे जाऊ शकतो व कुठेही मानाने जगू शकतो.

(३) आसाम हा भारताचाच एक भाग आहे ह्या सत्य गोष्टीविरुद्ध.

आताच्या आंदोलनामुळे सर्व आसामी लोकांच्या मनात हे भरविले जात आहे की, आसाम हा भारताचा एक अंश कधी नव्हताच; पण ब्रिटिशानी १८७६ च्या ट्रीटीद्वारा तो भारतात समाविष्ट केला होता. ( इथे सहज आठवण झाली म्हणून सांगावेसे वाटते की, परवा एसेम जोशी आले असताना बोलता बोलता म्हणाले – राष्ट्रगीतामध्ये तरी आसामचा उल्लेख आहे का सांगा ! आणि लक्षात आले की, खरेच राष्ट्रगीतामध्ये आसामचा उल्लेख कसा नाही ? ) देशभक्तीचे अवसान आणणारे हे चळवळीचे

नेते, 'भारतीय राज्यतंत्रापासून मुक्ती' मध्येच आसामचे भाग्य दडलेले आहे, अशा कल्पना रूढ करू पाहात आहेत. (परिशिष्ट १ पहा) ह्याचा नमुना म्हणजेच आसामी प्रेस व काही प्रादेशिक पक्ष आणि संस्था ह्यांनी भारतीय सैन्याचा द्वेष करण्याविषयी प्रचार सुरू केला आणि ज्या वेळी उत्तर कामरूपमधील दंगा थांबवण्यास सैन्याची मदत घेतली गेली तेव्हा 'भारतीय' ह्या शब्दावर विशेष जोर देण्यात आला. हीच अभारतीय प्रवृत्ती आसाममधून क्रूड व पेट्रोल भारताच्या इतर भागात येण्याचे थांबवण्यास कारणीभूत झाली. शिवाय आसामसाठी डबल नागरिकत्वाची मागणी आहे ती आहेच.

नेमक्या ह्याच वेळी मेघालयामध्ये आदिवासींनी अन्य नागरिकांना – मग ते भारतीय असोत वा नसोत – प्रवेश बंद पुकारला.

ह्या नि अशा प्रकारच्या घटनांमधील साधर्म्यामुळे ह्यामागे विदेशी हात अवश्य असल्याचे सिद्ध होते. आसामच्या 'परकीय नागरिक' आंदोलनात सहभागी होण्यासाठी खासी, मणिपुरी, मिझो व नागा तरुण धावत आले. तसेच आसामचे सत्याग्रही शिलाँग (मेघालय) येथील 'परकीय नागरिक' चळवळीत प्रत्यक्ष भाग घेते झाले. असा रिपोर्ट आहे की आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर व मिझोराम येथील आंदोलनप्रमुख मंडळी गोहाटी, शिलाँग, इम्फाल, उखरूल व कोहिमा ह्या ठिकाणी गुप्त बैठकी घेत असत. एवढेच काय पण अगदी अलीकडे आसामचे तरुण चीन व बांगला देशमध्ये शस्त्रास्त्राचे शिक्षण घेण्यासाठी गेले असल्याचीही माहिती मिळते.

प्रत्येक ठिकाणी एकच ओरड ऐकू येते – 'भारतीय कुत्र्यांनो, आमचा देश सोडून जा!' शिवाय ह्या सर्व प्रदेशातील खेड्यात त्या त्या ठिकाणच्या ग्रामप्रमुखाच्या परवानगीशिवाय कोणीही non–tribal राहण्यास किंवा काम करण्यास जाऊ शकत नाही हा अनुभव आहे. मात्र डोंगराळ प्रदेशात तरी तेथील रहिवाशांना परकीयांपासून धोका असल्याची भीती निराधार आहे.

१९७१च्या शिरगणतीच्या रिपोर्टानुसार– मेघालयात ८०.४९ टक्के लोकसंख्या ही tribal असून १ टक्का सदस्य दलित आहेत. उरलेले बाकीचे non–tribal असून त्यांच्यापैकी बहुतेक सरकारी अधिकारी किंवा पब्लिक सेक्टरचे कर्मचारी आहेत व त्यांच्या नोकऱ्या बदलीच्या आहेत आणि अगदी बोटावर मोजण्याइतकेच फक्त व्यापारी किंवा लहानसहान उद्योग करणारे असे आहेत.

मेघालयात ८५ टक्के नोकऱ्या tribes साठी राखून ठेवलेल्या असतात. तेथे व्यापार करायचा असेल तर लायसन्स लागते. या कारणास्तव मेघालयावर *non–tribals* चा प्रभाव आहे असे म्हणता येणार नाही. असेंब्लीमध्ये देखील ६० जागा 'जनरल' असून फक्त ७ MLA हे नॉन ट्रायबल आहेत. वास्तविक लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून पाहता कमीत कमी १२ MLA हे नॉन ट्रायबल असायला काहीच हरकत नाही.

आसाम सरकारच्या १९७१ च्या सिव्हिल लिस्टप्रमाणे ए. सी. एस्. क्लास वन् ऑफिसर्समध्ये :– २०० पैकी १३ बंगाली, ए. सी. एस्. क्लास वन् ऑसिसर्समध्ये २०० पैकी १३ बंगाली, ए. सी. एस्. क्लास टू ऑफिसर्समध्ये ३२८ पैकी २७ बंगाली, पी. डब्ल्यू. डी. सरकारी इंजिनिअर्समध्ये ३०० पैकी ६९ बंगाली, एस्. पी. हुद्दयाच्या पोलिसऑफिसर्समध्ये ३० पैकी फक्त ३ बंगाली, को – ऑपरेटिव्ह क्लास वन् ऑफिसर्समध्ये ६० पैकी ८ बंगाली व हेल्थ सर्व्हिसमध्ये २२४ पैकी १८ बंगाली आहेत.

ह्या आकडेवारीवरून काय दिसते? आसामी लोक स्वत:च्याच भूमीमध्ये परस्थ झाले आहेत आणि त्यांची सांस्कृतिक व राजकीय अस्मिता धोक्यात आहे.

आज नॉन आसामीविरुद्ध आणि विशेषत: बंगाली-भाषिक लोकांविरुद्ध व सर्वसाधारणपणे ज्यांना 'परकीय' म्हटले जाते अशांविरुद्ध एक भयंकर द्वेषाचे वेड प्रसृत होत आहे. हे 'परकीय' कोण? उदाहरणार्थ, १९४७ मध्ये पूर्व पाकिस्तानातून आसाममध्ये आलेले, १९५० च्या नेहरू–लियाकत तडजोडीमुळे आलेले, १९६५ मधील भारत–पाक युद्धानंतर आलेले किंवा १९७१ च्या बांगलादेश संग्रामानंतर आलेले सर्व लोक. ह्यांनी आसाम हीच आपली मातृभूमी मानली व आसामी लोकांत पूर्णांशाने मिसळून गेले. हेच सर्व आता 'परकीय' ह्या संज्ञेला पात्र ठरत आहेत व त्यांना येथून घालवून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

फार काय, पण पूर्वबंगालमधून १९७४ च्या आसपास येऊन कामरूपमधील नलबारी व बारपेटा येथे स्थायिक झालेले बंगाली हिंदूदेखील यातून सुटले नाहीत. खरे तर तेव्हापासून ते बंगाली भाषा पूर्णपणे विसरले असून आसामी भाषाच त्यांनी आत्मसात् केली आहे व मुलांनाही आसामी माध्यम असलेल्या शाळांमधूनच ते शिकवीत आहेत. गेल्या जानेवारीत याचेवर देखील हल्ले झाले आहेत. त्यांच्यापैकी ४०० स्त्रिया व मुले यांची हत्या झाली आहे. हजारोंची घरे जाळून टाकण्यात आली व मालमत्ता लुटण्यात आली. कित्येक जखमी झालेल्यांना औषधोपचार देखील पारखे ठरले!

आज जे बंगाली लोक कित्येक दशकांपूर्वी कायमचे आसाममध्ये स्थायिक झाले अशांना बहुसंख्येने Foreigner's Act 1946 ह्या कलमानुसार आसाममधून नोटीस देऊन हाकलून देण्यात येत आहे आणि आश्चर्य म्हणजे जी माणसे १९५१ पासून आसाममध्ये राहात आहेत, पण केवळ त्यांच्याजवळ नागरिकत्वाचे सर्टिफिकेट नाही एवढ्या आधारावरच त्यांनाही हाकलून लावण्यात येत आहे.

ज्या वेळी धर्माच्या कारणास्तव देशाची फाळणी झाली त्या वेळी पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल आदी राष्ट्रीय नेत्यांनी पाकिस्तानातील मायनॉरिटी म्हणून संबोधल्या जाणाऱ्यांना पक्के आश्वासन दिले होते की, जर त्यांना तेथे राहणे अशक्य आहे असे वाटत असेल तर भारताची दारे त्यांना केव्हाही उघडी आहेत. हे आश्वासन देऊन राष्ट्रीय नेते मात्र आपल्या नैतिक जबाबदारीतून मोकळे झाले. कारण ते कोणत्याही कारणास्तव पाकिस्तानातून परत आलेल्यांना नाही म्हणू शकत नव्हते. आज आसाम चळवळीचे तथाकथित नेते मात्र ते आश्वासन चक्क उधळून लावीत आहेत

सध्या आसामी वर्तमानपत्रे आणि गोहाटी रेडिओ हे नॉन आसामी लोकांविषयी तिरस्काराचाच प्रचार करण्यात गुंतले आहेत. ह्याची सत्यता 'आसाम ट्रिब्यून', 'सैनिक असम,' 'साप्ताहिक नीलाचल' व 'अग्रदूत' यांचे गेल्या सबंध वर्षातील अंक पाहता प्रत्ययाला येते. संगीत, नाट्य आणि प्रादेशिक ह्या माध्यमांचा वापर करून त्यांना आंदोलनाची मुखपत्रेच बनवून टाकले आहे. तरी पण काही आसामी भाषिक विद्वानांनी मात्र ह्या चळवळीतून निर्माण होणाऱ्या धोक्यांची जाणीव देण्याचे भान ठेवले आहे हे विशेष. (परिशिष्ट २ पहा.)

हे सर्व सावरण्यासाठी पहिले कर्तव्य म्हणजे राज्यात सुव्यवस्था आणि शिस्त प्रस्थापित करण्यासाठी केंद्रसरकारने पुढाकार घेतला पाहिजे. म्हणजे निदान सर्व लोकांना जीवन जगणे सुसह्य होईल. दुसरे म्हणजे 'परकीय नागरिक' ह्या नावाखाली लोकांना हाकलून देणे ताबडतोब थांबले पाहिजे. शिक्षणक्षेत्रात माजलेली गैरव्यवस्था थांबवून विद्यालये सुरळीत चालू ठेवायला हवीत. जे लोक नाहक ह्या आंदोलनाला बळी पडले त्यांचे पुनर्वसन होऊन त्यांची घरेदारे-मालमत्ता त्यांना परत मिळाली पाहिजे व त्यांना शांततेने जगता येईल अशी खबरदारी घेतली पाहिजे.

ह्या प्राथमिक गोष्टी अमलात आणल्यानंतरच समस्या सोडवणे सोयीचे होऊ शकेल. ह्या समस्या राजकीय पातळीवर सोडवण्याचा प्रयत्न व्हावा, जेणेकरून देशाचे एकात्मपण इतर सर्व प्रश्नांवर मात करून कायम टिकून राहू शकेल.
¤

### परिशिष्ट १.

**नव्या वर्षाची कामे**

**(इंग्रजी प्रतिवरून)**

◦ सर्व बंगाली भाडेकरूंना एक आठवड्याचे आत आसामबाहेर हाकलून लावा. तसे न केले तर त्रिपुराच्या लोकासारखी तुमची गत होईल.

◦ घर किंवा जमीन बिगर आसामी लोकांना विकणे पूर्णांशाने बंद करा. चोरून हे काम करणारानी जागरूक राहावे.

◦ लाखो परकीयाना हाकलून लावणे हे तुमचे आद्यकर्तव्य होय. ह्या बाबतीत राज्य व केंद्रसरकार नालायक आहेत.

◦ सर्व विश्वासघातक्याच्या खुनाने नवे वर्ष साजरे करा.

◦ तेल, चहा, लाकूड इ. वस्तू परक्या प्रदेशात (म्हणजेच भारताच्या इतर राज्यात) पाठवणे बंद करा—मग तुम्हाला त्यासाठी रक्त सांडावे लागले तरी हरकत नाही.

◦ नववर्षाच्या मुहूर्तावर आसामी लोकसंख्या वाढवण्याच्या तयारीला लागा. कुटुंबनियोजन गेले चुलीत !

◦ बिगर-आसामी ऑफिसराचे हुकूम मानू नका. तुम्ही त्याचे गुलाम नाही. उलट त्यांना सुद्धा हाकलून लावा. कोणीही माणूस—तो आसामी नसेल तर त्याला नोकरी मिळणार नाही.

◦ सर्व बंगाली माध्यमाच्या शाळांमधून आसामी माध्यम सुरू करा—अगदी चालू वर्षापासूनच. नाही तर शाळा बंद पडतील आणि ह्या शाळाना आसामच्या थोर व्यक्तीची नावे द्या.

◦ बंगाल्याच्या ताब्यात असणारी सर्व दुकाने, व्यापारउदीम, कंपन्या आणि जमीनजुमला लगेच आपल्या ताब्यात घ्या.

◦ युनायटेड स्टेटस् ऑफ आसाम (U. S. A.)ची गुप्त सैन्याच्या मदतीने उभारणी करा.

### तुमचे यश अटळ आहे

आम्ही USA ची जनता अशी आशा बाळगतो की, भारत सरकार आसामी माणसाचे रक्त पिळून घेऊ शकणार नाही किंवा रक्ताचा थेंब देखील सांडू देणार नाही आणि आसामच्या जनतेने (USA सहित) भारत सरकारच्या रक्तशोषक इराद्याला योग्य उत्तर देण्यासाठी तत्पर राहावे.

जय ऑल असम

Publicity Dept. U. S. A (East) 810.
¤

### परिशिष्ट २

काही थोड्या विद्वानांनी आसाममधील अमानुष कृत्याविरुद्ध आवाज उठवला आणि स्वतःवरील संकटांची पर्वा न करता ते सत्य व न्यायासाठी झगडत आहेत.

'नागरिक' ह्या आसामी वर्तमानपत्रातून श्री. हेमेन् बर्गोहेन यांनी 'कलाखार' नावाच्या साप्ताहिकातून गोहाटीचे डॉ. हिरेन गोहेन यांनी सध्याच्या चळवळीचे असत्य स्वरूप व त्यामुळे निर्माण होणारे धोके प्रतिपादन केले आहेत. ही पत्रके म्हणजे आसामच्या विद्वान मंडळीचा वैचारिक पातळीवरचा आवाज आहे.

श्रीमती निरुपमा बर्गोहेन ह्या आघाडीच्या कादंबरीकार व पत्रकार असून 'कलाखार' नावाच्या साप्ताहिकाचे २६ जानेवारी व ११ फेब्रुवारीला संपूर्ण अंक (त्यांनी) लिहून काढले. त्यातील हे काही उतारे—

...☐ उत्तर कामरूपमधील हिंसाचार बघून माझे चित्त पिळवटून निघाले असून तेथे स्त्रियावर झालेल्या अत्याचाराचे वर्णन ऐकून मी विलक्षण अस्वस्थ झाले आहे. वास्तविक माझे आईवडील हे दोघेही उत्तर कामरूपचेच असल्यामुळे मला त्या प्रदेशाविषयी विशेष आत्मीयता वाटते. माझा जन्म आणि बालपण गोहाटीमधील असले तरी आईवडिलांबरोबर मी कैक वेळा त्यांच्या जन्मगावी—नलबारी येथे गेलेली आहे. माझी पहिली कादंबरी 'हे नारी निर्वादी' आणि अगदी अलीकडची 'एपारार राब हिपारार' ह्या दोन्हीमध्ये मी प्रामुख्याने नलबारीच्या निसर्गसौंदर्याचं वर्णन केलेलं आहे. कलकत्ता विद्यापीठाची एम. ए. ची डिग्री घेतल्यानंतर माझ्या करिअरला सुरुवात झाली ती नलबारी कॉलेजमधील इंग्रजीची प्राध्यापिका म्हणून... आता त्याच ठिकाणी-जेथ विलक्षण अत्याचार झालेत अशा उत्तर कामरूपला भेट देताना मी भयंकर अस्वस्थ आहे.

☐ नलबारी येथे दोन रेफ्युजी कँपस् होते. एक मुलींच्या शाळेत व एक मुलाच्या शाळेत. मी दोन्ही कँपस्ना भेट दिली. तेथील भयकर घाणीत राहणारी ती मानवाची रूपे पाहून मला धक्काच बसला. त्यांच्यात १९४७–४८ मध्ये पूर्वबंगालमधून आसामात येऊन राहिलेले लोक देखील होते. आजवर त्यानी आसामी भाषा, संस्कृती इत्यादीचा स्वीकार केल्यानतर ते आसामी नाहीत असे का म्हटले जावे याचे आश्चर्य वाटते.

☐ ह्या लोकांशी मी बोलले. त्यांच्यावर झालेल्या अत्याचारांच्या एकेक कथा ऐकून माझ्या अगावर शहारे आले. त्यांची घरेदारे लुटली, जाळली एवढेच नव्हे तर त्यांच्या नातेवाइकाचे खून देखील झाले. त्यांचा दोष एवढाच की ते बंगाली आहेत. बंगाली कसे ? ज्यानी आसामी भाषेतून शिक्षण घेतले आहे, जे आसामी गाणी म्हणतात, आसामी नाटके करतात, थोडक्यात, जे आसामी संस्कृतीशी एकरूप झाले आहेत असे बंगाली. ह्या आसामी-बंगाली लोकांवर आज बेघर होऊन कँपमध्ये राहण्याची पाळी आली आहे. येथून आता ते कुठे जाणार ? पूर्वपाकिस्तानातून हकालपट्टी झाल्यावर ते सिपुरीला स्थायिक झाले होते. त्यानी काय आता पुन्हा पाकिस्तानात जायचे ?

दोन्ही कँप मिळून शरणार्थींची एकूण संख्या साडेतीन हजारावर होती. त्यातील प्रत्येकाची छळणूक म्हणजे एकेक स्वतंत्र कथा आहे. माणूस किती क्रूर होऊ शकतो ह्याचे ते प्रत्यतर आहे. ( त्या कथा उपलब्ध आहेत, पण येथे विस्ताराने लिहिणे अशक्य आहे. )

आसामी लोक आसामबाहेरच्या एकाही माणसाचे ( मग तो आयुष्यभर त्याच्यातच राहिलेला असेना का ) अस्तित्व सहन करू शकत नाहीत ह्याची आता कँपमधील लोकांना पूर्ण जाणीव झाली आहे. याचा अर्थ आम्ही आसामी लोक (श्रीमती निरुपमा (लेखिका) ह्या मूळ आसामीच आहेत. ) ह्या आसामी बनलेल्या बंगाली लोकाना आपल्यात सामावून घेऊ शकणार नाही. आमच्या खेड्यामधून इत.पर निर्वासित मुसलमान व बंगाली हिंदू याचा आवाज दाबून टाकण्यात येईल. केवढा घोर अपराध आम्ही करीत आहोत ? कसल्या भावनाच्या आहारी जाऊन आम्ही विचित्र देशभक्तीच्या नादी लागत आहोत ? मला काहीही कळेनासे झाले आहे. मी अक्षरशः हतबुद्ध झाले आहे. जे अत्याचार झाले ते कोणत्याही वर्तमानपत्रातून सविस्तरपणे प्रकाशित झालेच नाहीत. बातमीरूपाने तर नाहीतच; पण अनेकानी अनेक पत्रे लिहिली तीही प्रसिद्ध करण्याचे भान

संपादकांनी ठेवलेले नाही. आणीबाणीच्या काळातही मी लेखनस्वातंत्र्य उपभोगले होते पण आता मात्र ते पूर्णांशाने नष्ट झाले आहे.

एकूण बंगाली मनाचे प्रतिबिंब हे असे उमटले आहे. त्यांची आंदोलनाबाबत प्रतिक्रिया यातून व्यक्त होते. एवढेच नव्हे, कलकत्त्यातील चित्रपट, थिएटर आदि सर्व कलाकारांचा आसाम-आंदोलन निषेधार्थ एक प्रचंड मोर्चा निघण्याचे ठरत आहे. हे सर्व ऐकून घेतल्यानंतर आता आपण त्यांना काय सांगणार आहोत ?

□

# व्हिएटनाम-थायलंड संघर्ष

## निर्वासितांची ससेहोलपट

वा. दा. रानडे

व्हिएटनामच्या आक्रमणाविरुद्ध मदत म्हणून थायलंडला अमेरिकेने विमानांनी शस्त्रांची मदत पाठविली आहे. अफगाणिस्तानचा प्रश्न अनिर्णित असतानाच आशियाच्या या दुसऱ्या भागात व्हिएटनाम–थायलंड संघर्षातून पुन: तंग वातावरण निर्माण झाले. व्हिएटनामच्या फौजांनी थायलंडच्या प्रदेशात आक्रमण केल्यानंतर नऊ दिवसांनी थायलंडला ताबडतोब विमानांनी शस्त्रे पाठविण्यास अध्यक्ष कार्टर यांनी मान्यता दिली. थायलंडच्या प्रदेशातून आपले सैनिक व्हिएटनामने आता मागे घेतले असले तरी सीमेवर तंग वातावरण आहे. थायलंडला विमानांनी पाठविलेल्या शस्त्रांचा वाहतुकीचा खर्च दहा लाख डॉलर अमेरिकेने केला असून शस्त्रांची किंमत ३५ लाख रुपये थायलंड देणार आहे.

व्हिएटनाम–थायलंड–संघर्ष उद्भवण्याचे मुख्य कारण थायलंडमध्ये आलेल्या कांपूचियन ( कंबोडियन ) निर्वासितांना परत कांपूचियात पाठविण्याचा थायलंडने घेतलेला निर्णय. थायलंडमध्ये दीड लाख कांपूचियन निर्वासितांनी आसरा घेतला होता आणि नॉंग सामेन, नॉंग चान व नॉन मेकमुन या खेड्यांत त्यांच्यासाठी छावण्या उभारलेल्या होत्या. या निर्वासितांमध्ये कांपूचियातील पूर्वीच्या खमेर राज राजवटीचे समर्थकही होते. व्हिएटनामच्या एक हजार सैनिकांनी थायलंडच्या हद्दीत एक मैल लांब आत प्रवेश करून सीमेवरची ही तिन्ही खेडी ताब्यात घेतली. चकमकीत थायलंडचे एक टेहळे विमान व हेलिकॉप्टर पाडले आणखी एक लाख कंबोडियन निर्वासितांना पुन. थायहद्दीत ढकलले. खमेर राज समर्थकांना नॉंग चानमधून कांपूचियात तांदूळ पाठविला जात असे, ही रसद थांबविणे हाही या आक्रमणाचा एक उद्देश होता. निर्वासितांना परत पाठविणे तुम्ही थांबविले नाहीत तर आम्ही ते थांबवू. असा इशारा व्हिएटनामने दिला होता व लष्करी हस्तक्षेप करून त्यानी तो खरा केला. व्हिएटनाम फौजांच्या हालचालीवरून त्यानी आणखी मोठ्या हल्ल्याची तयारी केली असावी आणि नॉम मेनामजवळच्या खमेर राज ठाण्यावर हल्ला करण्याचा त्यांचा उद्देश असावा असे दिसते. व्हिएटनामी सैनिकानी सध्या कांपूचियन हद्दीत माघार घेतली असली तरी ते पुन: मोठा हल्ला करण्याची शक्यता लक्षात घेऊन त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी अमेरिकेने थायलंडला शस्त्रांची मदत पाठविली आहे.

उत्तर व्हिएटनाम, दक्षिण व्हिएटनाम, लाओस व कांपूचिया मिळून पूर्वी एकच राज्य होते, तसे ते पुन. स्थापन करावे ही व्हिएटनामची आकांक्षा चुकीची म्हणता येणार नाही; पण लोकशाही मार्गाने व तेथील लोकांच्या संमतीने हे उद्दिष्ट गाठायला हवे. लष्करी बळाने हे एकीकरण घडवून आणणे केव्हाही समर्थनीय नाही. कांपूचिया आपल्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी व्हिएटनामने आपल्या फौजा तेथे पाठवून आपल्या बाजूची राजवट तेथे स्थापणे याचा निषेधच करायला हवा आणि सर्व लोकशाहीवादी राष्ट्रांनी तो केलेला आहे.

कांपूचिया व्हिएटनामने लष्करी बळावर आपल्या नियंत्रणाखाली आणल्यामुळे निर्माण झालेला कांपूचियन निर्वासितांचा प्रश्न व्हिएटनामनेच सोडवायला हवा. ती त्याचीच जबाबदारी आहे. थायलंडने हे निर्वासित आपल्या प्रदेशात का ठेवून घ्यावेत आणि आपल्या अर्थव्यवस्थेवर त्यामुळे पडणारा ताण का सहन करावा ? हे निर्वासित थायलंडने परत पाठवायचे ठरविले ते योग्यच होते; पण प्रश्न इतका साधा नव्हता. या निर्वासितांमध्ये मुख्यत: पूर्वीच्या राजवटीचे समर्थक होते. कांपूचियातील नवी राजवट त्यांनी मान्य केलेली नाही.तेथे पूर्वीची राजवट आणण्यासाठी गनिमी लढा चालू आहे त्याला हे निर्वासित मदत करतात, रसद पोचवितात. ही मदत थांबविण्यासाठी थायलंड–हद्दीतील त्यांच्या ठाण्यावर हल्ला करून ती ताब्यात घ्यावीत म्हणजे या गनिमी हालचालींना पायबंद बसेल हाही व्हिएटनामच्या हल्ल्याचा एक उद्देश होता. निर्वासितात सध्याच्या राजवटीचे विरोधक आहेत अशी त्यांची समजूत असल्याने त्यांना आत घेण्याची व्हिएटनामची तयारी नाही; पण हे कांपूचियन निर्वासित कांपूचियाचेच नागरिक आहेत. त्यांना काम्पूचियाने आपल्या हद्दीत घेतलेच पाहिजे ! हे निर्वासित सध्याच्या राजवटीचे विरोधक असतील तर त्यांच्याविरुद्ध उपाय त्यानी आपल्या हद्दीत काय योजावयाचे ते योजावेत. थायलंडवर त्यांचा भूर्दंड कशासाठी ?

लहानमोठ्या प्रत्येक युद्धात निर्वासितांचा प्रश्न उपस्थित होत असतो. तो सोडविण्यासाठी काही आंतरराष्ट्रीय तत्त्वे व पद्धती ठरवायला हव्यात. निर्वासित स्वदेशी पाठवणे आणि तेथे त्यांचे व्यवस्थित पुनर्वसन होणे हीच या प्रश्नाची योग्य सोडवणूक होय. निर्वासित परतवण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करायला हवे. नवी राजवट या निर्वासितांना पसंत असेल तर ते स्वखुशीनच

मलपृष्ठ २ वर

# गाझा ते गॅलिली

## लेखांक सहावा । राजू पटवर्धन

## इस्राइलनं बेन गुरियनना मानलं. आम्हाला सावरकर दूरचे वाटले !

इस्राइली गाय एका वेतात सरासरी साडेसहा हजार लिटर दूध देते आणि आपली पवित्र भारतीय गाय मात्र फक्त सरासरी साडेचारशे लिटर दूध देते ही सद्य:स्थिती आपल्याला विशेष बेचैन करते, याचं कारण शेतीमधल्या इतर अनेक क्षेत्रांत कुठेकुठे आपली प्रगती नेत्रदीपक अशी आहे. भारतात रोज ५० लिटरहून अधिक दूध देणाऱ्यासुद्धा जगात एक क्रमाकाच्या ठरतील अशा थोड्या का होईना पण गाई 'भारतीय ॲग्रो-इंडस्ट्रीज फौंडेशन' सारख्या प्रथितयश संस्थेत आहेत. तासगावच्या वैज्ञानिक द्राक्षकुलासारखे द्राक्षाच्या उत्पादनाचा जागतिक उच्चांक गाठणारे प्रगत आणि कष्टाळू शेतकऱ्याचे समूह स्तिमित करणारे कार्य करून दाखवीत आहेत. आपल्याला त्रस्त करणारा मुद्दा एवढाच आहे की, आपल्या एकूण अर्थव्यवस्थेतच केंद्रस्थानी पंचताराकित हॉटेल आणि भोवती सर्वत्र झोपड्या ही पठडी दिसते, तशीच शेतीमध्ये, मूठभर गाई जागतिक विक्रमाच्या आणि बहुसंख्य अर्धपोटी किंवा बिनदुधी अशी परिस्थती दिसते.व्यापक किंवा सर्वसमावेशक अशी प्रगती होऊन सर्वकष असं सुधारणेचं जे निदान म्हणजे सरासरी उत्पादनात वाढ, ते मात्र आपल्याकडे मृगजळच ठरतं. ह्या पार्श्वभूमीवर सरासरी उत्पादन वाढविण्यासाठी इस्राइलनं केलेली संस्थात्मक रचना, तिच्यासाठी निश्चित केलेली ध्येयं आणि ती राबवण्यासाठी नेमलेली माणस या तिन्ही गोष्टी आपल्याला उद्बोधक ठरतील अशाच आहेत. इस्राइलमधल्या माझ्या शिक्षणाचा जो विषय-दुग्धव्यवसाय-तोच उदाहरणादाखल घेतला आहे.

इस्राइली पशुसंवर्धकांची 'आय्. सी. बी. ए.' ही सहकारी तत्त्वावर चालवलेली संस्था आहे. ह्या संस्थेमध्ये नोंदणी झालेल्या गाईंची संख्या एकूण गाईंच्या जवळजवळ ६५ टक्के आहे या नोंदलेल्या गाईंचे सरासरी दुग्धोत्पादन ७८५५ लिटर आहे. सर्व गाई धरल्या, तर ६५०० लिटर आहे १९४७ मध्ये नोंदलेल्या गाईंची सरासरी ४३५९ लिटर होती. म्हणजे ३२ वर्षांत नोंदलेल्या गाईंचं दुग्धोत्पादन जवळजवळ ८२ टक्क्यांनी वाढलं आहे.

मोशाव्हिमच्या प्रगतीप्रमाणे ही प्रगतीसुद्धा काही विशिष्ट ऐतिहासिक प्रक्रियेमुळे झालेली असली-इस्राइलचा छोटा आकार हो एक मुख्य जमेची बाजू-तरी तिच्यामध्ये अशा अनेक दिशा आपल्याला दिसतील की ज्या आपण जवळजवळ कायमच्या चुकून बसलोय् यापैकी मुख्य दिशा म्हणजे स्पष्ट पण सीमित केलेली अशी ध्येयं. इस्राइली शेतकऱ्यांनी १९४८ मध्येच ठरवलं की, आपण गाईंचा एकच वंश निर्माण करायचा तो म्हणजे 'इस्राइली फ्रीजियन.' दुसरी गोष्ट पक्की केली की, शेतकऱ्याला काहीही फुकट द्यायचं नाही ! उत्कृष्ट अशा सेवा त्याला द्यायच्या, पण पैन् पै मोजून घ्यायची !

'दमास्कनीज्' आणि 'सीरियन' या गाईंपासून सुरुवात करून त्यांना जगातल्या सर्वोत्कृष्ट वळूंचं रेतन देऊन प्रत्येक पिढीत थोडी थोडी वाशिक सुधारणा करत आज 'इस्राइली फ्रीजियन' हा वंश तयार झाला आहे. 'इस्राइली फ्रीजियन' वळूच्या रेतनाला आज जगभर मागणी आहे आणि ते आता जगभरच्या गाईंची वाशिक सुधारणा घडवून आणत आहेत. मोशाव्हिमना जसं इस्राइली सरकारनं पूर्ण अंतर्गत स्वातंत्र्य दिलं, तसंच तांत्रिक आणि आर्थिक बाबतीत स्वातंत्र्य आय्. सी. बी. ए. ला दिलं. यामुळे आय्. सी. बी. ए. च्या तज्ज्ञांनी एकदा ध्येय ठरवून त्याप्रमाणे निर्णय घेतले की, सबंध इस्राइल देशभर तेच निर्णय राबवले जाणार याची निश्चितीच झाली. कारण आय्. सी. बी. ए. चं सभासदत्व पत्करलंच पाहिजे ही शेतकऱ्यावर जवळजवळ सक्तीच केली गेली. शेतकरी प्रथम इतके राजी नव्हते; पण आय्. सी. बी. ए. पासून मिळणारे फायदे त्यांना कळायला लागल्यावर मग त्यांच्यात सभासदत्व मिळवण्याची स्पर्धाच लागली

आय् सी. बी. ए. सिद्धवळू कसे निवडते आणि निर्माण करते हे मोठं मनोरंजक आहे. सगळ्या प्रगतीची सुरुवात आहे ती पद्धतशीर रेकॉर्ड ठेवण्यामध्ये. आय् सी. बी. ए. च्या एका माणसाचं एवढंच काम असतं. सभासद असलेल्या प्रत्येक शेतकऱ्याकडे जाऊन दर महिन्यातून एकदा प्रत्येक नोंदलेल्या गाईचं दुग्धोत्पादन प्रत्यक्ष किती आहे हे तो पाहतो. सगळ्या दोन लाख गाईंचे हे उत्पादनाचे आकडे कॉम्प्युटरकडे पाठवले जाऊन त्यांचं पृथ करण आणि विश्लेषण केलं जातं. मार्गदर्शक माहिती काढली जाते ती अशी-

१ ) प्रत्येक शेतातल्या गाईंचं सरासरी उत्पादन.

२ ) नोंदलेल्या प्रत्येक गाईचं उत्पादन.

३ ) देशातील गाईंचं सरासरी उत्पादन.

४ ) जास्तीत जास्त सरासरीच्या पहिल्या क्रमांकांच्या काही कळपातल्या गाईंपैकी कळपाच्या सरासरीपेक्षा दोन स्टँडर्ड डेव्हि-

एशनपेक्षा जास्तीनं स्वत:चं उत्पादन असलेल्या गाई.

यावर क्र. ४ मधल्या गाईंना 'एलिट' ('उच्च' श्रेणीच्या) म्हणून निवडण्यात येतं. त्यांना सिद्धवळूना जन्म देण्याची क्षमता असलेल्या गाई (Potential bull mothers) म्हणून संबोधण्यात येतं. फक्त ह्याच सुमारे २५ गाईंना जगातल्या सर्वोत्कृष्ट सिद्ध-वळूचं रेतन आयात करून दिलं जातं. त्याच्यापासून अंदाजे १२ कालवडी आणि १२ गोऱ्हे मिळतात. हे १२ गोऱ्हे आय. सी. बी. ए. दरवर्षी विकत घेते. सर्वोत्तम असा आहार आणि देखरेख दिली जाते. सुमारे १ वर्षानं या गोऱ्ह्याचे वळू तयार होतात. मग त्यांच्याकडून वीर्य काढून घेण्यात येऊन प्रत्येकाच्या चाचणीसाठी प्रत्येकाची १००० कृत्रिम रेतनं देशभरच्या गाईंना दिली जातात. या गाईंपासून सुमारे ४०० कालवडी मिळतात. त्यांचं दुग्धोत्पादन आणि त्यांच्या कालवडींचं दुग्धोत्पादन हे कळल्यानंतरच (म्हणजे ते चाचणीमधले वळू सहा वर्षांचे झाल्यानंतर) मगच कोणते सिद्धवळू ठरवायचे हा निर्णय घेण्यात येतो. मग या बारांतून कोणाच्या कालवडींना विताना त्रास झाला, कुणाच्या कालवडीच्या कासेची ठेवण योग्य आहे, कुणाच्या कालवडीचं दूध सगळयात जास्त आहे हे ठरवून बारांपैकी फक्त दोन सिद्धवळू म्हणून ठेवले जातात. बाकीचे दहा काढून टाकण्यात येतात.

इथे ही गोष्ट महत्त्वाची आहे की, इस्राइलसारख्या प्रचंड पैसा असलेल्या देशालासुद्धा एका वर्षात ४–५ वळूपेक्षा जास्त वळू निर्माण करणं परवडत नाही! कारण वळू निर्माण करणं हे प्रकरण अत्यंत खर्चिक आहे. प्रत्येक वळूमागे लागणारी सर्व यंत्रसामुग्री, तंत्रज्ञ हे धरून जवळजवळ तीन लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. मात्र जे वळू होतात, ते खरोखरीचेच सिद्ध असतात.

हा प्रचंड खर्च भरून निघायला वेळ लागत नाही. कारण प्रत्येक गाईला गाभ घालवण्यासाठी आय. सी. बी. ए. दरवर्षी २० लिटर दुधाच्या किंमतीइतकी रक्कम घेते. मात्र गाभ जाण्यासाठी कितीही रेतनं करावी लागली, तरी या रकमेत बदल होत नाही. आय.सी.बी.ए. चा कृत्रिम-रेतन-तंत्रज्ञ रोज त्याला नेमून दिलेल्या शेतावर जातो आणि ही रेतनं करतो. प्रत्येक तंत्रज्ञाला आय. सी. बी. ए. पिवळी फोक्सवॅगन देते. प्रत्येकाला रोज जवळजवळ १०० किलोमीटर प्रवास घडतो.

डॉ. मोडक आणि मी एक दिवस 'एझ्रा' नावाच्या कृत्रिम रेतनतज्ज्ञाबरोबर हिंडलो. गॅलिली सरोवराच्या परिसरात जवळजवळ २५ शेतांवर एझ्रा आम्हाला घेऊन गेला. रोज एकट्यानं १०० किलोमीटर प्रवास करावा लागत असल्यामुळे कोणाची तरी कंपनी मिळाली म्हणून एझ्रा खूष होता. माजावर आलेल्या गाईची तो किती प्रकारांनी चिकित्सा करायचा हे पाहून मी थक्कच झालो. पुन्हा मालकानं माजावर आहे म्हणून दाखवलेल्या गाईला रेतन करण्याचं तो कधी नाकारत होता. यावरून मला तासगावच्या एका प्रसंगाची आठवण झाली. केंद्रादरचे डॉक्टर एका दमलेल्या मालकाला सांगत होते, 'अहो, तुमच्या गाईचा तो सोटा नाही–तो पू आहे. तिला वळूचं इंजेक्शन करून काही उपयोग नाही.' यावर गाईचा मालक म्हणत होता, 'कमालच केलीत डॉक्टरसाहेब! अहो, दहा मैल चालत गाय आणली तो काय माझा दोष? आम्ही छोटे पडलो म्हणून असं व्हय? त्या अमक्याच्या गाईला द्यायला इंजेक्शन हाय अन् आमचीला नाय!' शेवटी डॉक्टरांनी त्याच्या समाधानाखातर दिलं इंजेक्शन ठोकून! आता काय होणार ते उघडच–तो पू राहणार आणि गाय सारखी उलटणार!

एझ्रा प्रत्येक गाईचं रेकॉर्ड बघून पशुवैद्यासाठी काही असेल, तर मुद्दाम लिहून ठेवत होता–हो, इंजेक्शनं किती केली आणि किती गाई गाभ राहिल्या यावरून एझ्राचं भवितव्य ठरणार होतं. कृत्रिम रेतनतंत्रज्ञ हा इस्राइलमध्ये वरच्या दर्जाचा समजला जातो ते का, हे मला एझ्रावरून पटलं. त्याचं वाचन, त्याची आकलनशक्ती आणि स्वत:चं निर्माण केलेलं तंत्र हे आश्चर्यकारक होतं. 'तुमच्या इंदिरा गांधींनी अफगाणिस्तान प्रश्नात रशियाची बाजू घेतली ही तुमची अलिप्तता का?'–हा त्याचा एकदम गुगली प्रश्न ऐकून मी ओळखलं की, स्वारी राजकारणात रस घेणारी आहे. मग नासर ते नेहरू इतक्या विषयावर आमची खूप चर्चा झाली.

## आपला सघन पशुसुधार प्रकल्प

एझ्रा रोज पहाटे सहा वाजता आपल्या फेरीला सुरुवात करतो. दुपारी दोनपर्यंत त्याचं काम उरकतं. रेतनाची इंजेक्शनं आणि गाभ-गाईंची संख्या याचं एझ्राचं गुणोत्तर १·७ इतकं आहे. भारतात हे गुणोत्तर कुणाचं किती आहे हे सहसा बघितलं जातच नाही. पुन्हा सर्व आपले तंत्रज्ञ शास्त्रीय कर्मचारी असल्यामुळं तसं त्यांना काही स्वारस्य कशात वाटत नाही.

एझ्रासारखीच रोज फेरी मारताना आम्हाला भेटले एक डॉ. झाक्स. त्यांचं बी. बी. सी. न्यूजसारखं बोलणं ऐकूनच मी ओळखलं हे मूळचे ब्रिटिश आहेत. त्यांनाही रोज अशीच चक्कर असते. गाईंना तपासणं, औषधं देणं, शस्त्रक्रिया करणं हे सगळं ते करतात. त्यांच्यासारख्या डॉक्टरांच्या सेवेबद्दल आय. सी. बी. ए. शेतकऱ्याकडून प्रत्येक गाईमागे ४० लिटर दुधाच्या किंमतीइतकी रक्कम घेते. मात्र यामधून त्या शेतकऱ्याला–शेल्टरांसारख्या–एक शाश्वती असते की रोज एझ्रा आणि डॉ. झाक्स हे दोघे आपल्याकडे येऊन जाणारच जाणार! यामुळे आय. सी. बी. ए. ची फी द्यायला तो काकू करीत नाही. एझ्रा आणि झाक्स दोघंही खूष आहेत. कारण त्यांना खूप पगार आहे, गाडी आहे आणि यंत्र, सुविधा यांची कोणतीही चणचण नाही. यामुळे शेतकऱ्याची गाय दरवर्षी एकदा विणार (तिचा भाकड काळ अगदी कमी) त्याला पैसा देणार आणि राष्ट्रीय सरासरी वाढणार.

ह्या सर्व गोष्टी सोप्यासाध्या वाटल्या, तरी त्या किती महत्त्वाच्या आहेत हे दर्शविण्यासाठी आपल्याकडचा महाराष्ट्र सरकारचा आमच्या सांगली जिल्ह्यात चालू असलेला 'सघन पशुसुधार प्रकल्प' (आय.सी. डी. पी.) बघण्यासारखा आहे. आपल्या दिशा कशा चुकत गेल्या हे अगदी ठळकपणे समजून येईल. संकरित गाई निर्माण करणाऱ्या घडक कार्यक्रमाला महाराष्ट्रात सुरुवात होऊन दहा वर्षे होऊन गेली. ह्या दहा वर्षांत जे विभागनिहाय प्रकल्प निर्माण झाले, त्यातलाच आय. सी. डी. पी. हा एक. सरकारी खात्याप्रमाणे विस्तार आणि प्रसार ही धोरणं ठरली. किती डझन कृत्रिम रेतन-केंद्रं निर्माण केली यावरून प्रकल्पाचं यश अजमावलं जाऊ लागलं.

पुन्हा आपल्याकडे मा-बाप सरकारनं पुत्रवत प्रजेला सगळं फुकटच दिलं पाहिजे ही लोकप्रिय सरकारकडून अपेक्षा असल्यामुळे या केंद्रावरून 'गरीब बिचाऱ्या' शेतकऱ्याच्या गाईला विनामूल्य रेतनाची सोय सरकारनं निर्माण केली. झालं, फुकट रेतन द्यायचं तर वळू परदेशातून विकतचे कसे परवडणार ? मग आपले दानशूर दाते–इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, अमेरिका–त्यांच्याकडचे सिद्ध वळू दान करायला तयार होतेच. त्यांनी रेड डेन, जर्सी, ब्राउन स्विस, हॉलस्टीन फ्रीनियन–होते त्या जातीचे वळू पाठवले. आपल्या सरकारला काय मजाच मजा ! लागलीच हे वळू जतन करण्याची मिरजेसारखी केंद्रं निघाली. त्याच्यावर येतील तेवढे परदेशी वळू घेतले गेले. ते वळू कोणत्या जातीचे आहेत, त्याची योग्यता काय आहे, त्यांचा खर्च किती असतो हे बघायला कोणाला सवड होती ?

आता वस्तुस्थिती अशी आहे की, हे वळू (म्हणजे परदेशाहून आलेले) दात्या देशानी कुठल्या योग्यतेचे पाठवले हे त्याचं त्यांनाच ठाऊक मुख्य गोष्ट ही की, आपल्याला १०-२०वर्षांनी कुठं पोचायचं आहे, कुठला वंश निर्माण करायचा आहे ही ध्येयं कुणाला माहीतच नव्हती. आय. सी. डी. पी. च्या कुठल्याही अधिकाऱ्याला विचारा, 'तुमची ध्येयं काय ?' याला एकच उत्तर–' क्रॉस ब्रीडिंग ! ' पण कुठला क्रॉस, त्यात देशी रक्त किती, त्याचं दूध किती हे माहीतच नाही. त्यातून निसर्गाच्या कृपेनं काही सिद्धमाता कुठं जन्माला येत असल्याचं, तर त्या आय. सी. डी. पी. ला कळणं अशक्यच. कारण दूध मोजून ते मांडून कोण ठेवतंय ? 'मिल्क रेकॉर्डिंग' हे म्हणे आय. सी. डी. पी. चं काम आहे; पण आतापर्यंत कुठल्याही शेतकऱ्याकडे असला मनुष्य दूध बघायला आल्याचं कुणालाही माहीत नाही आणि बरं, इतका विस्तार करून गाई गाभ किती जातात, त्यासाठी किती 'इंजेक्शनं करावी लागतात, त्यासाठीच्या तंत्रज्ञाना काय माहिती आहे हे सर्व कल्पनेनंच जाणलेलं बरं. आय. सी. डी. पी. सारख्या स्थानिक पातळीवर हा सावळा गोंधळ आहे, तर राज्यपातळीवर केवढा असेल ?

## 'फुकट'चा हव्यास

या सगळ्यामागे आपला 'फुकट'चा हव्यास आहे. हा हव्यास आपला आत्मविश्वास किती तकलुपी आहे हे दाखवतो. ज्या शेतकऱ्याकडे ५००० रुपयांची एक गाय आहे तो कितीही गरीब असो किंवा श्रीमंत असो, त्याला त्या गाईपासून किती दूध मिळवायचं, म्हणजे तिच्यावर ३००० रुपये खर्च करावाच लागतो. त्याला तिला गाभ घालवण्याच्या इंजेक्शनला पन्नास रुपये गेल्याचे काहीच दुःख नाही. कारण त्याला त्या गाईची कालवड आईपेक्षा दुधाला जास्त उतरेल ही खात्री मिळेल. सध्या सरकारला फुकट रेतनपद्धतीत तिसऱ्या दर्जाच्या वळूचं रेतन त्याच्या गाईला मिळतंय, ते देणारी माणसं प्रशिक्षित व्यवस्थित नाहीत, गाय महिनोन् महिने गाभ नाही आणि शेवटी होणारी प्रजा मूळ गाईपेक्षा निकृष्ट असा अनुभव शेतकऱ्याला येतोय् ! हे फुकट किती महाग पडतंय् हे कुणालाच कळत नाही. जी गोष्ट रेतनाची तीच औषधाची. सरकारी दवाखान्यात औषधं फुकट आहेत खरी; पण गाईला १० मैल दवाखान्यात आणणं जमलं नाही, तर डॉक्टर येणार आहेत का १० मैल पैशाशिवाय ? इथेही एका वेतात होणारा औषधाचा खर्च हा त्या शेतकऱ्याला जास्त नसतो. एखाद्या लेथमशिनला तंदुरुस्त ठेवायला ऑइलिंग, ओव्हरहॉलिंग करावं, त्याला जसा खर्च येतो–मग मालक 'गरीब' 'श्रीमंत' असा भेदभाव नाही–तसाच खर्च गाईला येतो. हा खर्च मर्यादित ठेवून उच्च दर्जाच्या सेवा कशा मिळू शकतात हे आय्. सी. बी. ए. नं दाखवलं आहे. आय्. सी. डी. पी. कधी काळी त्यापासून काही बोध घेईल अशी आशा आपण करू या. सध्या इतकी दयनीय स्थिती आहे की, यदाकदाचित् आपल्या संकरित गाईचं दूध सरासरीनं वाढलं असेल, तर ते कळायला आय्. सी. डी. पी. कडे मार्गच नाही ! इस्राइल वर्षाला फक्त दोन नवे वळू बनवतं, आपल्याकडे आय. सी. डी. पी. कडे डझनानं असतात–मग ते म्हातारे असतील, अर्धपोटी असतील किंवा दूध पुढल्या पिढीत कमी करणारे असतील !

ज्या दुर्बलांचा आपण उद्धार करू इच्छितो ते जणू कायमचे दुर्बलच राहणार अशी आपण कणव करतो. यामधून 'फुकट' गोष्टी आपल्याला आवडतात. इस्राइल हे राष्ट्रही ह्या 'फुकट' कल्पनेपासून वंचित नाही. मात्र जी गोष्ट फुकट द्यायची, ती धंद्याची वाढ होण्यासाठी ही खूणगाठ बांधलेली असते. आय. सी. बी. ए. नं 'ग्लास ऑफ् मिल्क' ही योजना इस्राइली शाळा व कॉलेजासाठी सुरू केली. एकेक दुधाचा पेला रोज प्रत्येक विद्यार्थ्याला फुकट द्यायचा. अंतःस्थ हेतू हा की, सर्वांना दुधाची चटक लागावी आणि दुधाच्या वाढत्या उत्पादनाला हुकमी गिऱ्हाईक पुढे सतत निर्माण व्हावं ! म्हणजे दान केलं तरी पुढे काही तरी त्याचा पैशात फायदा होईल हे तत्त्व ठेवून केलं जातं.

एका अप्रिय परंतु आवश्यक गोष्टीपासून अनेक तऱ्हेचे दृश्य परिणाम घडवणारी महत्त्वाची गोष्ट इस्राइलमध्ये दिसते ती म्हणजे सक्तीची लष्करी सेवा. अरब शत्रूचं सख्याधिक्य इस्राइलविरुद्ध १ : १२ पेक्षाही अधिक असल्यामुळे ही सक्ती अपरिहार्यच आहे. मात्र त्या सेवेसाठी निवडलेलं वय–मुलामुलींसाठी – १८ ते २१ वर्षेच का आहे हे मनोरंजक ठरेल. २२ ते २५ का नाही किंवा २० ते २३ का नाही ? यामागे इस्राइल सरकारची भूमिका ही आहे की, १८ व्या वर्षी कुठल्याच तरुण वा तरुणीचं महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होऊ शकत नाही. म्हणजे सैन्यात गेल्यामुळे शिक्षणात खंड हा पडणारच हे गृहीतच असतं–किंबहुना हेतूच तो असतो ! यामुळे २१ व्या वर्षी हे तरुण सैन्यातून बाहेर पडले की, त्याना कळून चुकतं की आता आपण इतक्या चमत्कारिक वयात आहोत की, व्यवस्थित शिक्षण पूर्ण केलं नाही, तर पुढे आपल्याला नोकरी मिळणं अशक्यच आहे. परिणाम हा होतो की, हे तरुण विद्यापीठात शांत बसून अभ्यास व्यवस्थित करतात. १८ ते २१ या वयात जास्तीत जास्त उनाडपणा जगभरच होत असतो. इतर ठिकाणी या वयातलीच तरुण-तरुणी लांब केस वाढवून गांजा ओढत भटकत फिरत असलेली दिसतात. इस्राइलमध्ये असे 'गुड फॉर नथिंग' तरुण अजिबात दिसत नाहीत. तशी प्रवृत्ती तिथं नाही असं नाही. भरपूर आहे, मात्र ह्या सक्तीच्या लष्करी अनुभवामुळे तिला आळा बसतो. तसंच तरुणाना पुढे ५५ व्या वर्षापर्यंत आणि मुलींना ३४ व्या वर्षापर्यंत दरवर्षी एक वर्ष सैन्यात जावं लागत असल्यामुळे प्रत्येकाच नाव, अनुक्रमांक आणि ठावठिकाणा लष्कराकडे नोंद केलेला




असतो. त्या व्यक्तीच्या सर्व हालचाली—विशेषत: बेकायदेशीर हालचाली काही असतील तर —लागलीच समजून येतात. वैयक्तिक खाजगी जीवनावर हा घाला आहे हे मात्र खरं. आपणाकडे असले काहीही निबंध नाहीत हे आपलं भाग्य आहे !

या लष्करी अनुभवामुळे इस्राइली नागरिकांना एक चांगली सवय लागते ती म्हणजे नियम पाळण्याची. आमच्या एका बस-प्रवासाचा डेव्हिड ओरॉन हा ड्रायव्हर होता. कुठे रेल्वेमार्ग ओलांडायचा असेल, तर 'स्टॉप अँड गो' ही निशाणी बघताच तो १ मिनिट थांबायचाच—मग दोन्ही बाजूंनी चार–चार मैल रेल्वेचे रूळ दिसत असून रेल्वेगाडी येत नसली तरी. हा डेव्हिड अशांपैकी होता ज्यांना देश, धर्म वगैरे कल्पना जवळजवळ माहीतच नाहीत. जिथे जास्त पैसा तिथे हा जाणार. मध्यंतरी असाच तीन वर्षे ऱ्होडेशियाला गेला होता. तेव्हा तिथे गोऱ्यांचं, अल्पसंख्यांकांचं सरकार होतं. जगातल्या बहुतेक राष्ट्रांची तेव्हा ऱ्होडेशियाला मान्यता नव्हती. त्यामुळे जो मागेल त्याला आपलं नागरिकत्व द्यायला ऱ्होडेशिया एका पायावर तयार होता. त्यामुळे डेव्हिडला ऱ्होडेशियन नागरिकत्व चटकन् मिळालं. ते दिल्यावर दोन वर्षांनी ऱ्होडेशियन सरकारनं त्याला सैन्यात दाखल होण्याचा हुकूम दिला. हा हुकूम म्हणजेच मुगावे आणि एनकोमो यांच्या काळ्या स्वातंत्र्यसैनिकांबरोबरच लढायला जाण्याचं निमंत्रण. हे डेव्हिडनं झिडकारलंन्. तो म्हणाला, 'हे तुमचं भांडण. मी फुकट तुमच्या काळ्या लोकांना का मारू ?' अन् म्हणून स्वारी इस्राइलला परत आली. आता नवजात झिंबाब्वे सरकार आल्यावर डेव्हिडची परत तिकडे जाण्याची तयारी सुरू आहे.

आतापर्यंत मोशेसाहेब, सॅम्सन् एमिसेस मालका, सिडनी रूबेन, रॉनिट्झ्, शेरव्हर कुटुंब, डेव्हिड ओरॉन, एस्रा इत्यादी व्यक्ती आपण पाहिल्या. या कुठल्याच व्यक्तीचं व्यक्तिमत्त्व संपूर्ण असं उदात्त, सुंदर, ध्येयवादी वगैरे पुतळ्यासारखं नाही—तसं ते कुठे असणारच नाही—मात्र प्रत्येक ठिकाणी आपल्याला हे दिसेल की, ही प्रत्येक व्यक्ती भारताला जवळच्या वाटणाऱ्या अशाच कल्पनेत किंवा संस्थेत किंवा ऐतिहासिक–सामाजिक अशा प्रक्रियेत कळत–नकळत भाग घेत आहे—मग ती सहकारी सोसायटी असो, लोकशाही निवडणुका असोत, धर्माची व्यापक व्याख्या करून देशाभिमान जागृत करणं असो, पर्यटनाचा धंदा निर्माण करणं असो, शेतीत सर्वांगीण प्रगती करणं असो ह्या सगळ्यामध्ये विधायक कार्याचा सूक्ष्म धागा सतत दिसून येतो. यामध्ये सबंध इस्राइलची लोकसंख्या ३६ लाख म्हणजे मुंबई शहरापेक्षाही खूप कमी आहे, हा मुद्दा महत्त्वाचा असला तरी सर्व प्रश्न भारतात आहेत त्याच स्वरूपाचे आहेत हे आपल्याला मार्गदर्शक ठरतं—उदा.—अनेक भाषांमधून एक राष्ट्रीय भाषा निर्माण करणं, अनेक संस्कृतींमधून एक स्वतंत्र संस्कृती निर्माण करणं वगैरे. इस्राइल म्हणजे भारताला असा दिलासा आहे की निदान छोट्या मर्यादित प्रदेशात तरी आपण सर्वंकष प्रयत्न केले तरी कधी ना कधी ह्या प्रदेशात तरी आपण नेत्रदीपक कामगिरी करू शकू.

या विधायकतेचे आणि देशबांधणीचे प्रतीक आहेत डेव्हिड बेन–गुरियन आणि त्यांचा इस्राइल. त्यांच्या विरुद्ध बाजूला उभे आहेत यासेर अराफत आणि त्यांची पी. एल्. ओ.

पृष्ठ २१ वर

# अमेरिकन्सचे स्वप्नभंग

माधुरी बापट

**स्वप्न १ ले :**
**पाणी न पिण्याचे !**

कुणाचे काय तर कुणाचे काय ! एप्रिल-मेच्या कडाक्याच्या उन्हाळ्यात कोक पिण्याचं किंवा आइस्क्रीम खाण्याचं आपणा भारतीयांचं स्वप्न ! तरीही ऐन उन्हाळ्यात माठातलं थंडगार पाणी पिण्यावाचून आपला आत्मा थंड होत नाही. जुनी माणसं तर म्हणतात, ह्या पाण्याची काही 'आधुनिक माठात' त्या – रेफ्रिजरेटरमधल्या पाण्याला सर नाही.

तर मुद्दा असा की तहान लागली की आपण पाणीच पितो. दुसरं काय पिणार ? पण इथं अमेरिकेत पाणी नसतं हो प्यायचं ! सार्वजनिक ठिकाणी पाणी पिणाऱ्या भारतीयांना 'You are not in India' असे अमेरिकन्सचे टोमणे ऐकावे लागतात.

सर्व प्राणिमात्रात बुद्धीनं श्रेष्ठ असलेले आपण मनुष्यप्राणी ! त्यातून अमेरिकेतला माणूस म्हणजे सर्वच बाबतीत जरा वरच्या लेव्हलचा ! पाणी पितात ती गाईगुरं ! माणसांनी पाणी कसलं प्यायचं ? तेव्हा पाणी पिणं हे निकृष्टपणाचं !

म्हणजे त्याचं काय की धंदा हमामानामुळे मुळातच इथे तहान कमी लागते आणि जेव्हा लागते तेव्हा पाण्याच्या भावात मिळणारा कोक, ऑरेंजज्यूस असतोच ढोसायला ! पण आजारपणात प्रसंगी पोटाला चिमटा घेऊनही आपल्या तिकडे सामान्य माणसाला मोसंब्याचा रस बघायला मिळत नाही, म्हणून आपल्याला पाण्याचं महत्त्व आहे, हे इथल्या महाभागांना कसं कळणार ?

हे सगळं वाचून म्हणाल, 'काय बंडला मारताय हो ! पाण्याशिवाय प्राणिमात्र जगू शकेल का ? ' दोन वर्षांपूर्वी मला जरी कुणी असं सांगितलं असतं तरी मीपण हेच म्हटलं असतं. माणसाला पुष्कळ गोष्टी आवडत नाहीत. व्यक्ती तशा प्रकृती ! अगदी फळांचा राजा आंबाही न आवडणारे महाभाग असतात. पण 'मला पाणीच आवडत नाही' असं जगाच्या पाठीवर कुणी म्हणत असेल तर ते ह्या अमेरिका देशी !

एक अमेरिकन माता नि तिचे पाच वर्षांचे लेकरू यांच्याला संवाद ऐकला, तेव्हा खरोखर कानांवर विश्वास बसला नाही. मुलीच्या शाळेचा वार्षिक समारंभ एका पार्कात आयोजित केलेला. ऑगस्टमधला कडाक्याचा उन्हाळा ! दोन वर्षांपासून सहा वर्षांपर्यंतचे पन्नास-साठ बाल अमेरिकन्स नि त्यांचे पालक जमलेले. सर्व कार्यक्रम पार पडून' निघायच्या वेळेपर्यंत प्रत्येकानेच बरोबर आणलेले कोक, कूलएड, टँग संपून गेलेले; पण एक पाच वर्षांचे तहानलेले पोर ज्याला त्याला कोक आहे का असं विचारत होते. शेवटी त्याची आई म्हणते ' See that fountain. Go and drink water ! ' त्यावर ते एवढं तहानलेलं पोर ताडकन् उच्चारले ' I don't like water ' आणि हे ऐकून मी चाट !

आयुष्यात कधी पाणीच न पिणाऱ्या ह्या अमेरिकन्सना आता इथलेच डॉक्टर्स कॉन्स्टिपेशनपासून कॅन्सरपर्यंत सर्व व्याधी टाळण्यासाठी भरपूर पाणी प्या असं जीव तोडून सांगत असतात; पण पाणी न पिण्याचं स्वप्न बाळगणाऱ्या सुखासीन अमेरिकन्सना काही ते पटत नाही आणि म्हणूनच Milk of Magnetia, Ex-lax, Metamaties ! सारखी औषधे इथे धंदा करून राहिली आहेत.

पण वाढत्या महागाईने नि बेकारीने आता सर्वसामान्य अमेरिकन माणसाच्या ग्रोसरीच्या यादीतून कोक, पेप्सी, टॅब, कूलएड, टँग, पंच, ऑरेंजज्यूस हळूहळू गायब होऊ लागले आहेत. त्याच्या जागी पाणी प्यायचं म्हणजे अगदी वाईट वाटतं, जिवावर येतं, डोळ्यातून पाणी निघतं खरं; पण अमेरिकन माणसाचं 'पाणी न पिण्याचं स्वप्न मात्र हळूहळू धुळीला मिळू लागलं आहे.

*

**स्वप्न २ रे :**
**बचत न करण्याचे.**

आपण सर्वसामान्य भारतीयाच आयुष्यातलं काय स्वप्न असत असेल, तर प्रथमपासूनच थोडी थोडी बचत करून पुढं मुलीचं लग्न, मुलाचं शिक्षण, म्हातारपण यासाठी लागणारी पुंजी साठवायची. आपल्या तिकडे बचत न करणाऱ्याला काही सरकार मदत देत नाही. ओघाने भुकेपोटी भीक मागण्याचीच पाळी ! म्हणूनच आपल्याला बचतीची किंमत कळते.

पण ज्या देशात सरकार कुणावरही भीक मागायची वेळ येऊ देत नाही वा भुकेपोटी जीव गेला तर नाचक्की मानली जाते तिथं ही भीती कसली ? मग बचत कराच कशाला ? आपल्या तिकडच्यासारखी काही इथं मुलीच्या लग्नासाठी वा मुलाच्या शिक्षणावर खर्च करण्याची पद्धत नाही व तो करावाही लागत नाही. आयुष्यभर नोकरीधंदा केलेला असेल तर रिटायर्ड झाल्यावर सोशल सिक्युरिटी मिळतेच. कधी नोकरी गेलीच तर अनएम्प्लॉयमेंट अलौन्स मिळतो किंवा काही कारणाने बरेच आर्थिक नुकसान झाले तर Bankrupty जाहीर करता येते. मग Welfare वर जाऊन food stamps घेऊनही राहता येते. म्हणजे उपाशी मरण्याची वा भीक मागण्याची काही कधी कुणावर वेळ येत नाही.

मग ह्या बचतीची गरजच काय ? उलट बचत केलेल्या पैशावर, त्याच्या व्याजावर टॅक्स मात्र भरपूर भरावा लागतो. इथं इकॉनॉमी जिवंत राहावी, पैसा सारखा खेळता राहावा ह्यासाठी पगार सुद्धा दर आठवड्याच्या आठवड्याला देतात. आपल्या तिकडे महिन्यातून एकदा पगार मिळाला की, सामान्य माणूस महिन्याची खरेदी एकदम करून टाकतो. इथं मात्र दर आठवड्याला अशी खरेदी. दर शुक्रवारी अशी काही खरेदी करायची की, सोमवारी पुन्हा

ठणठण गोपाल !

कित्येक तर महाभाग असे आहेत की, वर्षाला तीस-चाळीस हजार डॉलर्स कमवूनही ह्या लोकांची बचत सोडाच; पण बँकेत साधे बचतखातेही नसते. स्वप्नातही कधी बचतीचा विचार येत नाही त्यांच्या. ही झाली बरेच पैसे कमावणाऱ्याची कथा; पण आठवड्याला केवळ १००-१२५ डॉलर्स कमावणारी सेक्रेटरी सुद्धा अशा काही थाटात राहते की, पाहत रहावे. तिच्या प्रोफेशनमुळे तिला उत्तमोत्तम कपडे, कॉस्मेटिक्स, शारीरिक सौंदर्य यावर खर्च हा करावा लागतोच; पण तिला घरातही तो उंची सोफा हवा, कुलांच्या कुंड्या हव्या, कलर्ड T. V. हवा, महागडे ड्रेप्स हवे, आठवड्यातून तीन वेळा तरी उंची हॉटेलचं जेवण हवे.

दारात कारही साधीसुधी नाही मोठी हवी. इंपोर्टेड, महागडी हवी. थंडरबर्ड, वोक्सवॅगन, टोयोटा अगदी रोल्सरॉइसही !

कार किंवा स्वत:चे घर असणे ह्या गोष्टी आपल्या तिकडे तरी स्वप्नातच जमा असतात. किती लोकांना ह्या गोष्टी शक्य असतात ? सगळी बचत, प्रॉव्हिडंट फंड घालून आयुष्याच्या शेवटी केव्हा तरी फार तर एखादा ओनरशिपचा फ्लॅट घेऊ वा एखादी स्कूटर घेऊ हीच सामान्याची उडी !

इथं मात्र नुसतं घर किंवा एक-दोन कार्स असणं ही साधी राहणी. इथं तुमच्या श्रीमंतीचं लक्षण म्हणजे स्वत:ची बोट असणं वा हेलिकॉप्टर असणं किंवा घरातच स्विमिंगपूल वा टेनिसकोर्ट असणं वगैरे वगैरे.

आणि ह्या सर्व गोष्टी, सुखसोयीपण हव्यात अगदी ऐन तरुणपणी ! आता अमेरिकेत स्वत:चं घर करणं हे आपल्या तिकडच्या सारखं जरी फारसं अवघड नसलं तरी ते स्वप्न पुरं करायला सुरुवातीला तरी थोडीफार बचत ही करावी लागतेच; पण तेवढी तरी कोण करणार ?

वाढत्या महागाईला तोंड कसे द्यावे ? बचत कशी नि कुठे करावी ? यावर हल्ली वर्तमानपत्रांतून, मासिकांतून वरचेवर 'टिप्स' वाचायला मिळतात. त्या वाचून तर खरोखर हसू येते.

कोकऐवजी पाणी प्यावे, आठवड्यातून तिनदा तरी घरूनच लंच घ्यावे, हॉटेलात जाऊ नये, कूपन्स वापरावीत, १५ दिवसांतून एकदाच खरेदी करावी, क्रेडिट कार्डस वापरू नयेत वगैरे वगैरे.

आला दिवस खाऊनपिऊन मजेत घालवा, हे दिवस आता संपत आले. आधुनिक जगातल्या सगळ्या गोष्टी जरी पश्चिमेकडून पूर्वेकडे गेल्या तरी ही बचतीची कल्पना मात्र पूर्वेकडूनच पश्चिमेकडे येत आहे.

आणि म्हणूनच 'बचत न करण्याचे' इथले स्वप्नही आता हळूहळू विरघ लागले आहे.

## स्वप्न ३ रे :

## रोखीने खरेदी न करण्याचे

एका मोठ्या उंची डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये शिरायचं. हवी असेल ती हजार-दोन हजार डॉलर्सची खरेदी करायची नि पैसे न देताच नुसतं एक कार्ड दाखवून घरी परत यायचं नि मग सवड होईल तसं हळूहळू बिलाचे पैसे पाठवत राहायचं. अशी कल्पना आपल्याला कशी काय वाटते ? काही तरीच ! एवढा व्यवहार उधारीवर कसा काय हो करायचा ? पण उच्च वर्गीय समाजात कदाचित असं घडत असेल. त्याच्या क्रेडिटवर, नावावर उधारीचा व्यवहार होतही असेल; पण सर्वसामान्य, मध्यमवर्गीय ह्या उधारीच्या व्यवहारापासून चार हात लांबच राहातो. एक तर कुठल्याही दुकानात आपल्या तिकडे सुंदर अक्षरातल्या 'आज रोख, उद्या उधार' अशा पाट्या दिसतात वाण्यासारखे दुकानदार तर आधी बिलाचे पैसे टाकल्याशिवाय काही घरी माल पाठवत नाहीत. शिवाय सामान्य माणूस तर प्रतिष्ठेपायी रोखीचाच व्यवहार करू इच्छितो. चुकूनमाकून उधारीवर माल आणलाच तर त्याचे पैसे फिटेपर्यंत सच्च्या मनाला झोपही येत नसते.

पण ही झाली भारतासारख्या देशातल्या लोकांची कथा ! जिथे जवळ शंभर रुपये असतील तर खर्च त्याहून नक्कीच कमी होतो. — काही अपवाद सोडले तर !

अशीच काहीशी परिस्थिती अमेरिकेतही असणार अशी आपली कल्पना असते; पण प्रत्यक्षात मात्र सगळं उलटंच दिसतं. बचत करणारी फारच थोडी लोकं सोडली तर बाकी सगळा वर्ग असाच.

वर्षाला ५०।६० लाख मिळवणाऱ्याचं जसं क्रेडिट असतं, तसंच १०।१२ हजार मिळवणाऱ्याचंही असतं. इथे आर्थिक समानता ही अशी आहे. म्हणजे लक्षाधिशाप्रमाणे सामान्यही एक कार्ड दाखवूनच माल घरी आणतो. फक्त फरक एवढाच की जो खराच पैसेवाला असतो तो लौकर वेळेवर बिलाचे पैसे पाठवतो व बाकीचे पैसे दरमहा केवळ १०।२० डॉलर्स पाठवून मुद्दलाच्या पठाणी व्याजातूनही कधी बाहेर पडत नाहीत.

आता इथं 'क्रेडिट' ही काय भानगड आहे नि ते कसे मिळवायचे, त्याचा आणखी उपयोग काय ? हा एक वेगळाच विषय होईल. थोडक्यात सांगायचं तर–

१) प्रथम तुम्ही सर्व प्रकारची बिले– घरभाडं, वीज टेलिफोन, पाणी, गॅस वगैरे न चुकता वेळेवर पाठवणे.

२) गरज नसली तरी एखादे छोटेसे १००० डॉलर्सपर्यंतचे कर्ज घेऊन ते व्यवस्थित फेडायचे.

३) सर्व प्रकारच्या कर्जांचे हप्ते – घर, कार, बोट वगैरे वेळेवर न चुकता पाठवणे.

तुमचा सर्व तपशील पाहून बँकेचे वा क्रेडिट-कार्ड देणाऱ्याचे समाधान झाले की तुम्ही क्रेडिट कार्ड वापरायला लायक झालात.

ज्यावर तुमचे नाव, सोशल सिक्युरिटी नंबर, कार्डाचा नंबर, क्रेडिटची मर्यादा (५००/१००० डॉलर्स) व कार्डाची Expiry date छापलेले असते असे कार्ड तुम्हाला मिळते.

मोठ्या शहरांतून जवळ रोख पैसे बाळगून magging च्या व कदाचित जिवाचाही बळी पडण्यापेक्षा हे असे कार्ड जवळ बाळगणे खरंच सोयीचं असतं. जो हिशोबाने खर्च करतो त्याच्यासाठी तर हे चांगलंच. कारण अशा खरेदीवर जे व्याज भरावं लागतं ते टॅक्समधून माफ मिळतं.

पण महिन्याला चारशे डॉलर्स मिळवणाऱ्याने जर १ दिवसात ५०० डॉलर्स खर्च केले तर कसं व्हायचं ? पूर्वी खरेदीनंतर १ महिन्याचा अवधी तरी असे. आता क्रेडिट कार्डावरच्या बंधनांमुळे तोही मिळेनासा झाला आहे.

ही क्रेडिट कार्डसही अनंत प्रकारची आहेत.

१. मास्टर चार्ज, व्हिसा, अमेरिकन एक्स्प्रेस कार्ड यासारखी कार्डे जवळजवळ सर्व जगभर कुठेही म्हणजे हॉटेल्स, टॅक्सी, ग्रोसरी, डिपार्टमेंटल स्टोअर्स, विमान कंपन्या वगैरे ठिकाणी चालतात.

२. विशिष्ट डिपार्टमेंटल स्टोअर्स वा पेट्रोलपंपांनी दिलेली कार्डे ही त्या त्या ठिकाणीच चालतात.

कार्डाची Expiry date संपल्यावर अर्ज करून दुसरे मिळते; परंतु कार्डाची मर्यादा जर ५०० च असेल व ती संपली असेल व त्यातले काही जरी पैसे फिटलेले नसतील तर मात्र कॉम्प्युटरकडून No येते. मग त्यावर खरेदी करता येत नाही.

अशी क्रेडिट कार्डस् जमवणे हाच इथल्या काही लोकाचा छंदच असतो. दुसरं म्हणजे एखादा जर रोखीनं व्यवहार करायचा असेल, उदा. घर, कारसारख्या खरेद्या तर बँकाच परवानगी देत नाहीत कारण मास्टर चार्जसारखी कार्डे सर्व बँकांनी मिळून एकत्र येऊन काढलेली असतात.

म्हणजे इथे रोख पैसे कुणी घेतच नाहीत असं मात्र नाही; पण तसा व्यवहार करणं हे मात्र इथं श्रीमंतीचं लक्षण समजलं जात नाही.

ग्रोसरी स्टोअरमध्येही रोख पैसे देणाऱ्या आपल्यासारख्या लोकांकडे इतर पाहातच राहतात. आमच्या माहितीच्या एका भारतीय डॉक्टरमहाशयानी तर चक्क १०-१२ हजार डॉलर्स रोख देऊन कार घेतली तेव्हा तो कारचा डीलर आ वासून पाहातच राहिला.

कारण इथला सर्व व्यवहार आतापर्यंत ह्या क्रेडिटपायी उधारीवरच होत राहिला. प्रत्यक्षात कुणीच पैसे देत नाही. मग सरकारच्या खजिन्यात पैसा कुठला? तेव्हा नोटा छापवातच आहेत.

म्हणूनच आता ह्या क्रेडिटच्या दुनियेची Economy ढासळू लागली आहे. आता नवी क्रेडिट कार्डस् मिळणेही बंद होत आहे. शिवाय ज्या दिवशी खरेदी केली त्या दिवसापासून त्यावर व्याज चढते ते वेगळेच.

क्रेडिट कार्डस् वापरू नका, आजच त्याला कामी लावा, रोखीने शक्यतो व्यवहार करा अशा आता मारे मोठ्या जाहिराती होत असतात; पण अमेरिकन माणसाच्या कानापर्यंत किती पोचतात देव जाणे!

एकूण काय तर इतर स्वप्नाबरोबरचं हे क्रेडिटचं–'रोखीने व्यवहार न करण्याचं' अमेरिकन स्वप्नही हळूहळू सपुष्टात येत आहे. □

# सायंटालॉजी : एक नूतनतम 'अफूची गोळी'

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

गियानामधील जॉर्जटाउन येथे एका नव्या धर्मपंथाच्या अनुयायांनी त्याच्या नेत्याच्या आदेशानुसार शेकडोच्या संख्येने आत्मनाश केल्याची कहाणी तुम्ही वाचलीच असेल.

भारतातील आनंदमार्गी या नावाने प्रसिद्ध असणारा एक संप्रदाय, दहशतवाद, खून, पळवापळवी, बॉंबस्फोट या त्यांच्या अनुयायांच्या कृत्यामुळे बराच प्रसिद्धीस आला होता.

याच प्रकारचा 'सायंटॉलॉजी' नावाचा (अ) धर्म अमेरिकेतील एका चक्रम माणसाने चालू केला, त्याची कहाणी मी आज सागणार आहे.

या धर्माच्या प्रवर्तकाचे नाव एल्. रॉन हब्बार्ड. तृतीय श्रेणीची पुस्तके गिरणीतून काढल्यासारखी लिहिणारा एक लेखक; पण १९४० सालीच त्याने जाहीर केले की, 'उगाच ५ पैशाला एक शब्द या दराने लिखाण करणे म्हणजे खुळेपणा आहे. खरोखर कुणाला कोट्याधीश व्हायचे असेल, तर स्वतःचा धर्म सुरू करणे यासारखा शहाणपणा नाही!' आणि खरोखरच 'चर्च ऑफ सायंटॉलॉजी' या नावाने या गुरूने आपला पंथ सुरू केला. इतर चर्चेस आणि याच्यामध्ये मुख्य फरक असा की, या पंथाच्या जगभरच्या शाखेत जमा होणाऱ्या निधीचा ठराविक हिस्सा (बहुतेक वेळा १० टक्के) गुरुवर्य हब्बार्ड यांना पोचवला जातो. आज या पंथाची आमदनी वर्षाला ८० कोटी रुपयाच्या घरात आहे. यावरून या महाशयांनी केवढी प्रचंड संपत्ती आतापर्यंत साठवली असेल याची कल्पना येईल! अर्थात यातला बहुतांश भाग स्विस बँकातून त्याच्या पत्नीच्या नावावर ठेवलेला आहे. दक्षिण कॅलिफोर्नियामध्ये पूर्वी सुट्टीचा विहार असणाऱ्या एका अलिशान महालात हे राजेश्री सध्या रहातात. ही मालमत्ता अर्थातच त्याच्या चर्चच्या नावावर आहे'

आजकाल जे नवनवीन 'धर्म' उदयाला येत आहेत त्यातला सायंटॉलॉजी हा तसा सर्वांत जुना म्हणावा लागेल; पण सर्वांत श्रीमंत आणि सर्वात धोकेबाज आहे हे मात्र निश्चित. यांच्या अनुयायांपैकी अनेक जण 'धर्मसंस्थापनार्थाय' दरोडेखोरी, हेरगिरी, पळवापळवी, चारित्र्यहनन अशा गोष्टी करण्यास मागेपुढे पहात नाहीत. गेल्या ऑक्टोबर महिन्यात, या पंथाच्या नऊ उच्च पदस्थ अधिकारीमंडळीचेवर कट करणे आणि चोऱ्या करणे हे आरोप सिद्ध होऊन त्याना शिक्षा झाल्या. अमेरिकेचे सहाय्यक ॲटर्नी रेमंड बेनोन हे या तपासाचे प्रमुख होते. ते म्हणतात, 'न्यायालयापुढे आलेल्या पुराव्यावरून, या मंडळींनी अनेक व्यक्ती आणि संस्था यांचेविरुद्ध गुन्हेगारी–मोहिमा उघडल्याचे सिद्ध होते. धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्काआड दडून या लोकानी समाजातल्या प्रत्येक घटकावर हल्ले चढवले.'

१९५० मध्ये हब्बार्ड याने 'डायनेटिक्स : मनोआरोग्याचे आधुनिक शास्त्र' हा आपला ग्रंथ प्रसिद्ध केला. १९७४ मध्ये

वॉशिंग्टन येथे पहिले सायंटॉलॉजीचे चर्च सुरू केले. १९७८ पर्यन्त अमेरिकेत ३८ आणि बाकी जगात ४१ इतकी या चर्चेसची संख्या वाढली. शिवाय १७२ 'मिशन्स' आणि ५४ लाखाचे वर सभासद नोंदण्यात आले. हे आकडे अनेकाना अर्थातच संशयास्पद वाटतात. तरीही पूर्ण वेळ काम करणारे ३००० कार्यकर्ते आणि ३०००० सभासद असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

जयपूरच्या महाराजांचा इंग्लंडमध्ये ३० खोल्यांचा महाल भोवताली २३ हेक्टर जमीनजुमला असणारा होता, तो हुब्बार्ड-गुरुजींनी १९५० मध्ये आपल्या वाढत्या संघटनेचे जागतिक केंद्र स्थापण्याकरता विकत घेतला आणि इथे हे महाशय एखाद्या राजा-लाही लाजवेल अशा विलासी इतमामाने राहू लागले. त्यांच्या हुजऱ्यांचेमध्ये सुरेख छोकऱ्या असतात. हुब्बार्डसाहेबांच्या हातात तेवत असणारी सिगारेट पटवणे आणि ते टाकतील ती राख झेलणे हे यांचे काम असते. त्यांनी उच्चारलेला प्रत्येक शब्द नोंदवला जातो. अगदी संतापाच्या भरात हासडलेल्या ग्राम्य शिव्यादेखील! सकाळी 'भूपाळी' वगैरे म्हणून यांना बिछान्याबाहेर काढणे, आंघोळ घालणे, कपडे चढवणे, त्यांचे कार्यालय घासून–पुसून लख्ख ठेवणे ही कामे या पोरीच करतात. 'पांढरा मोजा घालून कोठेही बोट फिरवले तरी तो मळता कामा नये' इतके लख्ख! त्यांचे कपडे १३ वेळा स्वच्छ पाण्यातून खळबळले जातात- (कारण कपड्याला साबणाचा थोडाही वास आला की हे महाराज भडकून उठतात.)

## पूर्व चरित्र

इतक्या आरत्या गाणारा भक्तगण या माणसाच्या भोवती कसा काय गोळा होतो? या जगातील काही निवडक थोड्या व्यक्तींचे आपण सर्वश्रेष्ठ नेते आहोत अशी त्यांची स्वतःची खात्री पटवणाऱ्या मोठ्या लालित्यपूर्ण कल्पित कहाण्या सांगत रहाण्याची या माणसाची हातोटी हे याचे कारण म्हणावे लागेल. 'मी स्वतः अणुवैज्ञानिक होतो. दुसऱ्या महायुद्धात लढत असता मी गंभीर जखमी झालो. आंधळा होऊन नौदलाच्या एका रुग्णालयात मी खितपत पडलो होतो; पण दोन वर्षांच्या अल्पकाळातच मी केवळ विचाराच्या आणि संशोधनाच्या जोरावर संपूर्ण आरोग्य आणि दृष्टी पुन्हा प्राप्त करून घेतली. या काळातील माझ्या संशोधनाचे फळ म्हणजेच 'डायनेटिक्स' आणि 'सायंटॉलॉजी.' माझ्याच काय पण सर्व मानव-जातीच्या असंख्य प्रश्नांची योग्य उत्तरे देण्याचे सामर्थ्य या नव्या शास्त्रात आहे.'–इति हुब्बार्ड.

आता सत्य काय ते पाहू या. कॉलेजमध्ये हुब्बार्डने अणुविज्ञान हा विषय घेतला होता खरा; पण त्यात तो नापास झाला. नौदला-मध्ये तो होता; पण कुठेही आघाडीवर गेल्याचा वा जखमी झाल्याचा उल्लेख नौदलाच्या कागदपत्रात सापडत नाही. आंत्रव्रण, संधिवात आणि इतर अशाच विकारांमुळे नौदलातून त्याला रजा देण्यात आली आणि ४० टक्के 'अपंग निवृत्तिवेतन' मंजूर करण्यात आले. याच सुमारास 'आपल्याला दीर्घकाल नैराश्याचे झटके येतात आणि आत्महत्येचे विचार मनात घोळतात' म्हणून मानसोपचाराची व्यवस्था व्हावी असे अर्ज त्याने निवृत्त सैनिकमंडळाकडे केले होते. काही चेक चोरल्याच्या आरोपाखाली त्याला कैदही झाली होती. 'काही कम्युनिस्ट हेर आपल्या मागावर आहेत' असा त्याने F. B. I. कडे अर्ज केला होता. त्यावर तिथल्या एका अधिकाऱ्याने 'वेडा असावा' असा शेरा मारलेला आढळतो.

पण डायनेटिक्सचा उदय झाल्यापासून हुब्बार्डचे हे विक्षिप्त तत्त्वज्ञान अडीच कोटी शब्दसंख्येचे ग्रंथ, लेख आणि फीत-मुद्रित भाषणे एवढे फोफावले आहे. काही बाबतीत भारतीय विचाराशी या तत्त्वज्ञानाचे आश्चर्यजनक साम्य आहे. पृथ्वीवर मानवी जीव ७४ ट्रिलियन वर्षांपासून आहेत असे हुब्बार्डने दाखवून दिले आहे. या जीवनाची सुरुवात 'शुक्र' ग्रहावर झाली असेही तो सांगतो. आजचे पृथ्वीवरील जीव म्हणजे युगानुयुगे पुन्हा पुन्हा जन्म घेत रहाणारे 'अमर' अशा आत्म्याचे दृश्य स्वरूप आहे. मानवी जीवनात अनुभवावी लागणारी अनेक दुःखे ही पूर्वीच्या जन्मातील कर्मांचा परिपाक अथवा स्मृतींचे अवशेष असतात. यांना तो 'Engroom' (संचित?) म्हणतो.

हुब्बार्डच्या पहिल्या पुस्तकाने सर्वत्र खळबळ माजवून दिली. 'संचिता' च्या २७० व्यक्तींना आपण 'मुक्ति' दिली; त्यामुळे त्यांची बौद्धिक पातळी खूपच वाढली आणि संधिवात, हृदयविकार यासारख्या त्यांच्या तक्रारी कायमच्या दूर झाल्या असा त्याने दावा केला होता.

असे हे 'संचित' शोधून काढण्याची हुब्बार्डची पद्धतही विलक्षण होती. एक बॅटरी. त्यावर चालणारा एक विद्युतप्रवाहदर्शक (Galvano meter) व त्यातून निघणाऱ्या तारांची वेटोळी दोन पत्र्याच्या डब्यांना जोडलेली असे हे यंत्र असे. सायंटॉलॉजीचा एखादा धर्मगुरु ही डबडी हातात पकडायला सांगून, 'संचित' जाणू इच्छिणाऱ्या माणसाला त्याच्या या जन्माबद्दल, तसेच पूर्वजन्माबद्दल शेकडो प्रश्न विचारत असे. उत्तरे देताना दर्शकाच्या काट्याच्या हलण्यावरून निष्कर्ष काढले जात. अशा 'संचिता' शी आमनेसामने मुकाबला झाल्याबरोबर त्याच्या मनोभांडारातील पूर्वजन्माशी निगडित स्मृतींची अडगळ दूर होऊन त्याचे मन मानवी मर्यादेहून उच्चतर अशा पातळीवर पोचते. तो देह आणि मनाने 'संपूर्ण स्वतंत्र' अवस्थेला पोचतो; असे थोडक्यात या 'मुक्ती' चे स्वरूप सांगता येईल.

अर्थात् या 'तपासणी' चे वेळी आपल्या पूर्वायुष्यातील गुन्हेगारी कृत्ये, लैंगिक संबंध, वैवाहिक वा कौटुंबिक अडचणी याबद्दल जी जी गुप्त स्वरूपाची माहिती उघड केली जाई तिची व्यवस्थित नोंद करून ठेवली जाई आणि आपल्या संघटनेविरुद्ध एखादा सभासद जाऊ लागल्यास त्याला दमदाटी करण्यासाठी त्याचा उपयोग करण्यात येई. या चर्चच्याच कागदपत्रातून आणि काही 'फुटीर' लोकांच्या जबान्यावरून ही गोष्ट माहीत झाली. साहजिकच पंथ सोडून जाणे, पंथाविरुद्ध तक्रारी करणे वा या अपप्रकारांना प्रसिद्धी देणे यासारख्या पंथाला तापदायक गोष्टी करायला कोणी भक्तगण सहसा तयार होत नसत.

नवीन भक्तांना या सर्व गोष्टी एकदम न सुनावता, थोड्या थोड्या काळाने विरघळणाऱ्या गोळीसारख्या हळूहळू पढवल्या जात. कालांतराने हे सर्व भक्त 'कळसूत्री बाहुल्या' बनून जात.

१७ वर्षांची शालेय विद्यार्थिनी ज्यूली ख्रिस्तीकर्सनचे उदाहरण नमुनेदार आहे तिच्या ओळखीच्या एका व्यक्तीने तिला या पंथाचा

'संपर्क अभ्यासक्रम' (Communications course) घ्यायला उद्युक्त केले. खरे तर असे उमेदवार जाळ्यात पकडणे हेच त्या व्यक्तीचे काम होते, फार काय अशा सावजे पकडणाऱ्यांना (कागदोपत्री नाव फिरते कर्मचारी) त्यांचेकडून चर्चला मिळणाऱ्या पैशापैकी १० टक्के मेहेनताना दिला जाईल अशा या चर्चच्या जाहिराती प्रसिद्ध होत असत. ज्यूली नकळत हब्बार्डने निर्माण केलेल्या संमोहनावर आधारित मनाचा गोंधळ उडवून देणाऱ्या 'शिक्षणक्रमाच्या' अड्ड्यात अडकली होती. नवीन रंगरूटाला इथे 'कच्चे मांस' म्हणून संबोधले जाई. धडे असत – शिक्षकाच्या गुडघ्याला गुडघे भिडवून तासंतास डोळे मिटून बसून रहाणे. नंतर तासंतास डोळे उघडे ठेवून बसून रहाणे. यानंतर शिक्षक प्रयत्न करतो 'भावनिक खटके' शोधून काढण्याचा. मग तासंतास नुसती हुकुमाची अंमलबजावणी– ती खुर्ची उचल, खुर्ची हलव, खुर्चीत बैस!

ज्यूली आणि तिच्याप्रमाणेच या पंथाच्या माजी सदस्य असणाऱ्या ४०० जणांच्या मुलाखती कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या मानसशास्त्रज्ञ मार्गारेट सिंगर यांनी घेतल्या होत्या. त्या म्हणतात, या 'अभ्यासक्रमामुळे व्यक्तिमत्त्व दुभंगून आत्यंतिक असंबंधित अशी मनाची अवस्था होऊ शकते आणि काय होते आहे याची जाणीव होण्यापूर्वीच विद्यार्थी या गळाला अडकलेला असतो.

यापुढची पायरी असते 'तपासणी!' यात मनातली सत्य आणि भ्रम यातली सीमारेषा पुसून टाकण्याचा आणखी प्रयत्न चालूच रहातो. ज्यूली या अवस्थेला पोचेपर्यंत तिने शिल्लक टाकलेले ३००० डॉलर्स संपून गेलेले असतात. त्या वेळी तिला सांगण्यात येते की, या पुढचे 'कॉलेज' पातळीवरचे शिक्षण तिला घ्यायचे असेल तर स्वत: कर्मचारी म्हणून नवीन आलेल्या 'कच्च्या मासा' वर संस्कार करण्याचे काम करत तिला ते घेता येईल. अखेर दर आठवड्याला ६० ते ८० तास काम करून केवळ ७॥ डॉलर्स पगार घेऊन ज्यूली 'कळसूत्री बाहुली' बनून गेली.

आपण 'सर्वश्रेष्ठ' असल्याची तिची खात्री झाली होती आणि रॉनबरोबर अन्य ग्रहांवर नेल्या जाणाऱ्या अल्पशा लोकांपैकी आपण आहोत अशी तिची श्रद्धा होती.

**बहुतेक सर्व धर्मामध्ये आणि एकांगी राजकीय तत्त्वज्ञानात आढळणाऱ्या 'आपण विरुद्ध बाकीचे' या दृष्टिकोनाचा तिच्या मनावर अशा रीतीने घणाघाती संस्कार करण्यात आला.**

पण ज्यूली नशिबवानच म्हणायची. कारण नऊ महिन्यातच तिच्या पालकांनी तिला या पंथापासून अलग केली आणि भारलेल्या अवस्थेतून या कळसूत्री बाहुलीला वास्तवात आणले. गेल्याच महिन्यात पोर्टलॅंडमधील न्यायपंचायतीला या चर्चने ज्यूलीला दिलेली वर्तणूक इतकी लबाडीची आणि संतापजनक वाटली की त्यांनी तिला २० लाख ६७ हजार डॉलर्स नुकसानभरपाई मिळावी असा निवाडा दिला.

ॲन रोशेनब्लुम मात्र एवढी नशिबवान ठरली नाही. तिने जवळजवळ ६ वर्षे सायंटॉलॉजीमध्ये काढली. यापैकी शेवटचे सव्वा वर्ष ती या चर्चच्या शिक्षाविभागात काम करत होती. या विभागाचे नाव मात्र होते 'पुनर्वसन योजना दल.' या विभागातर्फे कैद्यावर सतत पहारा करण्यात येतो. त्यांना कधीही एकटे राहू दिले जात नाही. तसेच परवानगीशिवाय परक्या माणसाशी बोलूही दिले जात नाही. उरलेसुरले खायचे, जमिनीवर झोपायचे, शारीरिक कष्टाची आणि हलकी कामे करायची आणि रॉनच्या लिखाणाचा अभ्यास करायचा हा यांचा दिनक्रम. याच्या जोडीला या लोकानी या अगर या पूर्वीच्या जन्मात रॉन विरुद्ध काही गुन्हे केले असतील ते शोधण्याकरता चालणारी जबरदस्त तपासणी!

'कुटीर' सभासद सांगतात की या तपासणीमुळे लोक भ्रमिष्ट होत, वेडे बनत. मग त्याना एकांतवासाची सजा दिली जाई. अनेक जण आत्महत्या करीत यात नवल नाही.

कालौघाबरोबर रॉन 'श्रद्धाळू' पणाच्या नवनवीन पातळ्या निर्माण करी. 'मुक्ती' प्राप्तीची दक्षिणा होती ३८१२ डॉलर्स, पण उच्चतम दर्जाची 'मुक्ती' मिळवण्यासाठी भक्ताला १२,५०० डॉलर्स ओतावे लागत. आपल्या कर्मचाऱ्याना पाठवलेल्या पत्रात हब्बार्डने एकसारख्या 'पैसे कमवा, आणखी पैसा मिळवा', इतराना जादा उत्पादन करायला लावून जादा पैसा मिळवा, असा धोशा लावलेला असे. नवे भक्तगण वा जमा होणारी दक्षिणा कमी होताच हब्बार्ड त्याच्या कर्मचाऱ्यांना नुसत्या भात आणि पाव यावर गुजराण करण्याची शिक्षा देई.

पण हब्बार्डचे उत्पन्न दर वर्षी वाढतच होते. १९७६ सध्ये अमेरिकेच्या अंतर्गत करविभागाने हब्बार्डच्या अपोलो नावाच्या ९७ मोटरी ध्वजनौकेवर धाड घातली. २८ लाख ६० हजार डॉलर्स रोख सापडले. याच सुमारास या चर्चने गुप्तपणे जवळजवळ १० कोटी डॉलर्स किंमतीची हॉटेल्स आणि इतर मिळकत क्लिअरवॉटर येथे खरीदली होती.

### अभ्यासक्रम

१९६६ मध्ये 'पालक कार्यालय' (Guardian Office) या नावाने स्वत:ची गुप्तहेर संघटना हब्बार्डने उभारली. सायंटॉलॉजीला होणाऱ्या विरोधामागे कुठली तरी केंद्रीय संस्था असावी अशी त्याची खात्री झाली होती. 'जागतिक मानसिक आरोग्य संघटने' बद्दल (World Federation of Mental Health) त्याला संशय होता. 'मानसोपचार आणि रशियन गुप्तहेर संघटना (K. G. B.) यांचे सख्य असते, असे तो सांगे. हीच मंडळी (C.I A.) (F.B.I.) काही वृत्तपत्रे आणि इतर गट याचे माध्यमातून आपल्या विरुद्ध कारवाया करतात असे त्याला वाटत असावे. आपली तृतीय पत्नी मेरी सू हब्बार्ड हिला त्याने या संघटनेच्या लॉसएंजलीस येथील मुख्य कार्यालयाची प्रमुख नेमले. 'पालक कार्यालयाचा हेतू 'विरोधकाना साफ करून सायंटॉलॉजीचा विस्तार करणे' असे ती सांगे.

या संघटनेच्या अभ्यासक्रमात, वार्ताहरांना खुनाची धमकी देणारे फोन करावेत, विरोधी बोलणाऱ्या धर्मोपदेशकाचे चारित्र्यहनन करावे, वृत्तपत्रात आलेला म्हणून बनावट मजकूर तयार करणे आणि घरफोड्याची योजना आखून अमलात आणणे असे विषय असत. सामाजिक संपर्क विभागाच्या प्रवक्त्याना वृत्तपत्राना खोट्या बातम्या कशा पुरवाव्या याचे धडे दिले जात. एक आवडता गलिच्छ

प्रकार म्हणजे विरोधकाचेबद्दल आयकरखात्याला निनावी फोन करून त्यानी करबुडवल्याची वर्दी देणे आणि त्या खात्याचा ससेमिरा त्याचे मागे लावणे, सायंटॉलॉजी विरुद्ध पहाण्या करणाऱ्या संस्था आणि विरोधी लेख प्रसिद्ध करणारी वृत्तपत्रे ही मोठी लक्ष्ये ठरवली जात. यात कोबॅज मासिक, अमेरिकन वैद्यकीय संघटना, बेटर बिझिनेस ब्यूरो आणि अमेरिकन मानसोपचारतज्ज्ञ संघटना याचा समावेश होता.

अशा शत्रूमध्ये व्यक्तीचाही समावेश असे. १९७१ मध्ये पॅलेट कूपर या न्यूयॉर्क येथील स्वतंत्र वार्तालेखिकेने 'सायंटॉलॉजीची बदमाशगिरी' या नावाचे एक पुस्तक प्रसिद्ध केले. यावर या चर्चने कोर्टकज्जे, चोऱ्या, चारित्र्यहनन आणि खोटे खटले याची तिच्या-विरुद्ध मोहीमच उघडली. तिला खुनाच्या धमक्या देणारे फोन येऊ लागले. नंतर सापडलेल्या चर्चच्या कागदपत्रात 'पॅलेट कूपरला वेड्याच्या इस्पितळात अथवा तुरुंगात कुजायला लावणे' हा या मोहिमेचा हेतू असल्याचे उल्लेख सापडले.

आणि जवळजवळ तसे झालेही. कु. कूपर आणि तिचे प्रकाशक याचे विरुद्ध अमेरिकेत आणि अनेक इतर देशातील कोर्टात दावे दाखल करण्यात आले. ही कायदेबाजी थांबवण्याकरता बिचाऱ्या प्रकाशकाना हे पुस्तक विकणे रद्द करावे लागले. 'एवढ्या दाव्यांच्या खर्चा-एवढ्या योग्यतेची या पुस्तकाची विक्री नव्हतीच' असे त्याचे म्हणणे.

सगळ्यात जबरदस्त प्रकार म्हणजे सायंटॉलॉजीच्या काही एजंटानी तिच्या नावाची शीर्षक-पत्रे पळवली आणि त्यावर बॉंब ठेव-ल्याची धमकी देणारी पत्रे लिहून तिला अडकवले. अशा तऱ्हेच्या धमक्या दिल्याबद्दल एका केंद्रीय न्यायमहामंडळाने तिला दोषी ठरवले. दोन वर्षे हा मनस्ताप सहन केल्यावर अखेर तिने पेंटोथॉल इंजक्शन देऊन सत्य काय ते शोधून काढा अशी मागणी केली आणि या सत्त्वपरीक्षेत ती उत्तीर्ण झाल्यावर सरकारतर्फे तिच्यावरचे आरोप मागे घेण्यात आले.

सायंटॉलॉजीचे दोन हेर खोटी ओळखपत्रे दाखवून न्यायखात्याच्या कचेऱ्यात प्रवेश मिळवतात आणि रात्री तिथल्या कार्यालयाच्या झडत्या घेतात, असे १९७६ मध्ये F.B.I. च्या लक्षात आले. यातूनच वॉशिंग्टनमध्ये चालणाऱ्या प्रचंड हेरगिरीच्या कारवाया उजेडात आल्या. यापैकी मैस्नर नावाचा हेर एक वर्ष फरारी होता. पुढे त्याने सरकारला सहाय्य करायचे कबूल केले. आपल्या विरुद्ध कारवाया करणाऱ्या सर्व सरकारी यंत्रणाविरुद्ध जोरदार मोहीम १९७४ मध्ये सायटॉलॉजी चर्चने उघडली होती. यापैकी वॉशिंग्टनमधल्या आघाडीचा मैस्नर प्रमुख होता. आणखी एका हेराचे मदतीने अंतर्गत करावभागाच्या कचेरीत घुसून त्यानी निरनिराळ्या सरकारी इमारतीत प्रवेश मिळविण्याकरता आवश्यक असणारी ओळखपत्रे बनावटरीत्या तयार केली. चुकून राहिलेल्या किल्ल्याच्या नकला बनवल्या, कुलुपे फोडली आणि सरकारी फायली पळवल्या आणि नकलल्या.

मैस्नरच्या जबाबाच्या जोरावर F. B. I. ने झडतीहुकूम मिळवून ८ जुलै १९७७ रोजी वॉशिंग्टन आणि लॉसएंजिलस येथील सायं-टॉलॉजीच्या प्रमुख कार्यालयांवर धाडी घातल्या आणि २३००० कागदपत्रे (पैकी अनेक अमेरिकन सरकारी कार्यालयातून चोरलेली), घरफोडीची हत्यारे आणि हेरगिरीची इलेक्ट्रॉनिक उपकरणे ताब्यात घेतली. इथे चालणारी हेरगिरी महाप्रचंड प्रमाणावर होती. न्यायलयाच्या एका विभागात अतिगुप्त स्वरूपाची सी. आय्. ए. ची कागदपत्रे असणाऱ्या सुरक्षागृहात सायंटॉलॉजीवाल्यानी पेरलेला एक माणूस काम करीत होता.

२६ ऑक्टोबर १९७९ ला सायंटॉलॉजीच्या ९ अधिकारी व्यक्ती-वर सरकार विरुद्ध कट कारवाया करणे व चोऱ्या करणे हे आरोप सिद्ध झाले; प्रमुख आरोपी होती मेरी सू हब्बार्ड या सर्वांची नायिका ! स्वतः हब्बार्ड आणि इतर २४ जणांची नांवे सहाय्यक म्हणून दाखल करण्यात आली होती.

या मंडळीना शिक्षा ठोठावण्यात आल्यावर अनेक सायंटॉलॉजीचे अनुयायी आपल्या कहाण्या सागण्यास पुढे येऊ लागले. इतके दिवस हब्बार्डच्या 'पालकांच्या' भीतीने हे लोक गप्प राहिले होते.

पण हब्बार्ड आणि त्याचे सायंटॉलॉजीवाले दबलेले नाहीत. कोर्टाच्या निकालानंतर त्यांनी वृत्तपत्रात जाहिराती देऊन 'सायंटॉलॉजी थांबवू इच्छिणाऱ्या मंडळीना हुसकावून बाहेर काढण्यासाठी' स्वयंसेवक-भरती सुरू केली आहे.

या सर्व गोष्टीचे तुम्हाला आश्चर्य वाटेल. आपण नवीन 'धर्म' स्थापन करतो आहोत असे मानणारी ही अत्यंत प्रगत देशातील सुशिक्षित मंडळी या बेकायदेशीर आणि अनैतिक मार्गाचा अवलंब करतात कशी असा विचार सहजच डोक्यात येईल. खरी गोष्ट अशी आहे की, धर्माची सुद्धा झिंग चढते. कैफ असतो तो मद्यासारखा किंवा एल्. एस्. डी. सारखा. तो एकदा डोक्यात भिनला की माणूस सारासार विचार, बंधुभाव, प्रेमळपणा, एकाच ईश्वराची लेकरे, दयाळू वृत्ती हे सगळे गुण विसरून जातो. तो निर्दय, विचारहीन, क्रूर पशू बनतो. खरे तर पशूंचा हा अपमान आहे. कारण कुठलाही पशू दुसऱ्यावर तो माझ्या धर्माचा नाही म्हणून हल्ला चढवतो असे ऐकिवात नाही. ज्या मानवी जीवाच्या उन्नतीकरता प्रत्येक धर्माची स्थापना झाल्याचे सागण्यात येते त्याच हजारो जीवाची हत्या, ते हा उन्नतीचा मार्ग स्वीकारायला तयार होत नाहीत म्हणून केली जाते. इस्राइली विरुद्ध बिगर इस्राइली (इ. स. पू. २००० वर्षे), ज्यू विरुद्ध ख्रिश्चन, ख्रिश्चन विरुद्ध मुसलमान, मुसलमान विरुद्ध हिंदू, हिंदू विरुद्ध बुद्ध, ज्यू विरुद्ध मुस्लिम अशा धर्माधर्मातील झगडण्यात, तसेच प्रॉटेस्टट विरुद्ध कॅथॉलिक, शिया विरुद्ध सुन्नी, हीनयान विरुद्ध महायान, शैव विरुद्ध वैष्णव सवर्ण विरुद्ध अस्पृश्य अशा एकधर्मीय झगड्यात बळी पडलेल्या लक्षावधी जीवाचा विचार डोक्यात आला म्हणजे कुठल्याही धर्माचा आणि परमेश्वराचा काडीचाही संबंध नाही याची खात्री पटते. सायटॉलॉजी हे या मोठ्या परंपरेतले अगदी अलीकडचे छोटे पिल्लू; पण आधीच्या सर्व धर्मांतील अव-लक्षणे याच्या अल्पायुष्यातही प्रकर्षाने उठून दिसतात. तेव्हा तात्पर्य काय ?

'अ—धर्मे निधनं श्रेयः, सर्वधर्मो भयावहः'

□

पुस्तक परीक्षण

# ब्राह्मणेतरांच्या चळवळीचे मूल्यमापन

महात्मा गांधींच्या खुनानंतर महाराष्ट्रात जातीय दंगली व अत्याचार झाले. या अत्याचारांचे निमित्त घेऊन पत्रकार ह. रा. महाजनीनी १९४८ साली ब्राह्मणेतर चळवळीचे मूल्यमापन करणारे १२ लेख लिहिले. हे लेख पुस्तकरूपाने ह. रा. महाजनी प्रकाशनातर्फे प्रकाशित झाले आहेत. (१९४८ साली 'ब्राह्मणेतरांच्या चळवळीचे मूल्यमापन' या विषयावरचे हे १२ लेख कोणत्या नियतकालिकात, वा वृत्तपत्रात आले होते याचा उल्लेख मात्र नाही !)

हे लिखाण म्हणजे ब्राह्मणेतर चळवळीचे कठोर मूल्यमापन आहे. विशेषत: १९४८ सालच्या पार्श्वभूमीवर तर या लिखाणाची धार अधिकच जाणवावी. १२ मुद्देवजा लेखामध्ये ह. रा. महाजनीनी महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीनंतरच्या, प्रामुख्याने १९२० ते १९४८ या कालखंडातील ब्राह्मणेतर चळवळीचे सूक्ष्म व मर्मग्राही विश्लेषण केले आहे. हे लिखाण एका सजग पत्रकाराचे लिखाण आहे, १९२० ते १९४८ या काळातील ब्राह्मणेतर चळवळीतील सर्व घटनांचा तपशीलवार आढावा यामध्ये नाही किंबहुना असा तपशीलात्मक आढावा देणे हा या लेखमालेचा हेतू नाही. ब्राह्मणेतर चळवळीच्या अपयशाची मीमांसा करणे हा या लेखमालेचा हेतू आहे आणि तो हेतू सफल झाला आहे. ब्राह्मणेतर चळवळ योग्य दिशेने विकसित होण्याची आत्यंतिक गरज लेखकाला जाणवते आणि योग्य दिशेने, व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने ती विकसित होण्याऐवजी ही चळवळ पुन्हा 'ब्राह्मण्या' तच अडकून रहाते याची तीव्र खंत महाजनींना जाणवते आणि आपल्या धारदार पण तितक्याच संयमी लेखणीतून ते ब्राह्मणेतर चळवळीच्या विश्लेषणाकडे, तिच्या मूल्यमापनाकडे वळतात.

या लेखमालेचे थोडक्यात सार सांगायचे झाले तर ते असे सांगता येईल; 'महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीने 'ब्राह्मणां' वर हल्ला केला नाही तर त्यांनी 'ब्राह्मण्या' वर हल्ला केला. फुल्यांच्या चळवळीचा रोख सामाजिक, वैचारिक क्रांती करण्याकडे होता. माणसाला गुलाम करणाऱ्या पुरोहितसंस्थेवर फुल्यानी कडाडून हल्ला चढविला. वैचारिक आणि सामाजिक गुलामगिरी दूर करण्याचा प्रयत्न फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीने केला. वैचारिक संघर्षाबरोबरच फुल्यानी चळवळ उभी करण्याचा प्रयत्न केला. फुल्यांचे समकालीन आगरकराना वैचारिक संघर्ष करणे जमले; पण त्याना चळवळ उभी करता आली नाही. सामाजिक वैचारिक गुलामगिरी विरोधी संघर्ष हा फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीचा गाभा होता. फुल्यानंतर सत्यशोधक चळवळ होती पण ही ब्राह्मणेतर चळवळ फुल्यांचा वैचारिक वारसा चालवू शकली नाही. ही ब्राह्मणेतर चळवळ सत्तेच्या राजकारणात अडकली. निवडणुका व नोकऱ्यांमध्ये थावून राहिली आणि यामधून 'ब्राह्मणे' तर चळवळीत 'ब्राह्मण्य' घुसले, ब्राह्मणांचे अनुकरण चालू झाले. निवडणुकांतही जातीयता आली आणि हे जातीयवादी राजकारण काँग्रेसमध्ये शिरले. ब्राह्मणेतर चळवळीतील व्यक्ती व कार्यकर्ते काँग्रेसमध्ये गेले पण तिथे सामाजिक गुलामगिरीविरुद्ध संघर्ष होण्याऐवजी काँग्रेसलाही जातीयवादी स्वरूप आले. १९४५ च्या निवडणुकात जातीयवादी मतदान झाले.

ब्राह्मणेतर चळवळीच्या मूल्यमापनाच्या संदर्भात ह. रा. महाजनीनी पुढे समाजवाद व ब्राह्मणेतर चळवळीतील संबंधाचे टीकात्मक विवेचन केले आहे. समाजवादी व मार्क्सवाद्यांनी ब्राह्मण्यात हरवलेली ब्राह्मणेतर चळवळ टीका न करता जवळ केली असे महाजनीचे म्हणणे आहे. ब्राह्मणेतर चळवळीच्या सखोल विश्लेषणाची गरज समाजवादी व मार्क्सवाद्यांना जाणवली नाही याची खंत महाजनीना वाटते व म्हणून ते प्रखर टीका करतात. आज डाव्या चळवळीतील विचारवंत, कार्यकर्ते आत्मनिरीक्षणाचा भाग म्हणून ब्राह्मणेतरांच्या चळवळीकडे दुर्लक्ष झाल्याचे मान्य करतात. १९४८साली महाजनीनी हे दुर्लक्ष व त्यावर टीका करून त्याचे परिणाम सांगावेत हे विशेष आहे.

ब्राह्मणेतर चळवळीचे हे विश्लेषण आज नवे वाटणार नाही. कारण आज अशी टीका सार्वत्रिक आहे; पण १९४८ सालच्या पार्श्वभूमीवर हा विचार मूलगामी मानावा लागेल.

ब्राह्मणेतरांच्या चळवळीत दोन प्रवाह आहेत : एक ब्राह्मणेतर पण अस्पृश्येतर जातींची चळवळ आणि दुसरी म्हणजे अस्पृश्यांची चळवळ. महाजनीच्या लिखाणाचा भर अस्पृश्येतर जातींच्या चळवळीवर जास्त आढळतो. १९४८ पर्यंत आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्यांची चळवळ बरीच वाढली होती. ब्राह्मणेतर चळवळीच्या विश्लेषणामध्ये आंबेडकरांच्या चळवळीचा कार्यक्रम, मागण्या त्याचे राजकीय मूल्यमापन करणे आवश्यक होते. ह. रा. महाजनीना अभिप्रेत असलेली वैचारिक सामाजिक क्रांतीची बीजे इथे आढळून येतात. हा भाग या लेखमालेत आढळत नाही. फुल्यानंतरची ब्राह्मणेतर चळवळ जातीपरिषदामध्ये विकसित झाली. जी ती जात स्वत.पुरती चळवळ करू लागली आणि सत्यशोधक चळवळ संपली हा भागही यायला हवा होता. उदारमतवादी रानडे, आगरकर यांच्यावर महाजनी ते मूर्तिभंजकाचा पंथ निर्माण करू शकले नाहीत अशी टीका करतात. टीकात्मक वृत्तपत्रीय लिखाण सामाजिक संशोधक आणि जिज्ञासू यांच्यासमोर येणे आवश्यक असते. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीवरील लिखाणातील चांगले लिखाण या पुस्तकरूपाने उपलब्ध झाले आहे. (पुस्तकाच्या पानाच्या संख्येच्या मानाने पुस्तकाची किंमत मात्र जास्त वाटते.)

.—लता भिसे

ब्राह्मणेतरांच्या चळवळीचे मूल्यमापन
लेखक : (कै) ह. रा. महाजनी
प्रकाशक : ह. रा. महाजनी प्रकाशन
क ४४/४०२, गांधीनगर
बांद्रे (पूर्व) मुंबई४०००५१
किंमत : ७ रुपये.

फिनिक्स निवड

## The Savage God

[ A Study of Suicide ]
By A. Alvarez.
Peguin Books,
Pages 320, 45 Pence

एका तरुण जोडप्याने रेल्वेच्या रुळावर जीव दिला... सुरुवातीला शॉक, दया... जगाचं रहाटगाडगं परत सुरू...किचीऽऽऽड्ड्.

'अरे, आजची बातमी वाचली का? एका डॉक्टरने झोपेच्या गोळ्या खाऊन जीव दिला! काय कमी होतं त्याला? गाडी, बंगला, तरुण सडसडीत बांध्याची बायको...'

वंगणाशिवाय परत आवाज किचीऽड्... किचीऽऽड्...वंगण घालायला जाईल त्याचा हातच तुटतो! बोटच चेंगरले जाते. क्वचित प्रसंगी जेट इंजिनमध्ये, वस्तु जोरात ओढली जाते तसा बॉडिली आत ओढला जातो

जगात दररोज १००० लोक जीव देतात. 'It is no measure of good health. to be well-adjusted to a profoundly sick society." असे अल्डस हक्सले म्हणाला होता ते काय उगीच? जीव देणारे, गुन्हेगार, फ्लोटसॅम, जेटसाम ह्या काय समाजाच्या मिरर इमेज असतात? फार काय, कित्येक शारीरिक आजार हीसुद्धा समाजाचीच प्रतिबिंबे असतात. अलीकडे अमेरिकेत दोन पुस्तके चर्चिली जात आहेत. ती म्हणजे Social causes of illness, आणि Illness as a Metaphor.–By Susan Sontang.

समाज फुल लेंग्थ मिररपुढे उभा असतो आणि किंचाळतो 'तो मी नव्हेच!' सफारी सूट व मोटारीची किल्ली जमिनीवर झटकण्याच्या तोऱ्यात व ठसक्यात तो बाजूला होतो. "साला भेकड, जीव दिला! साला नालायक, खून केला!" समाजाच्या आरशापुढची 'तो मी नव्हेच' हीच एक माइंड सुइसाइड. थोरो, गांधी यांचा कॉन्शन्स वगैरे गुंडाळून ठेवलेला. लेमिंग्जसारखा! पुढची सुइसाइड फार लांब नाही. पोल्यूशन, न्युक्लिअर डिस्ट्रक्शन.

१९५७ पासून आत्तापर्यंत आत्महत्येवर सुमारे १२०० पुस्तकं लिहिली गेली. त्यातील हे एक. सिल्विया प्लाथ नावाच्या लेखिकेने व कवयित्रीने अमेरिकेत काही वर्षांपूर्वी आत्महत्या केली होती. हे एक रोमँटिक डेथ होते. एक डेलिशिअस शोकांतिका होती. एक चर्चेचा विषय होता. या पुस्तकाच्या लेखकाने सुद्धा आत्महत्त्या करण्याचा प्रयत्न केला. हे पुस्तक म्हणजे त्या सिल्वया प्लाथ कवयित्रीचा व अल्वारेझच्या आत्महत्येचा घेतलेला वेध. अल्वारेझ त्या आत्महत्येच्या प्रयत्नात फसले. प्रयत्नानंतर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने एक वेगळीच कलाटणी घेतली. पुष्कळ वेळा जिथे जिथे आत्महत्येचा प्रयत्न फसतो तिथे एका वेगळ्याच स्तरावर ते व्यक्तिमत्त्व येते. त्यांच्या आयुष्याचा दृष्टिकोन पार बदलतो. अर्थात हे नेहेमी होत नाही. कधीकधी अशा प्रयत्नामुळे त्या व्यक्तीची अधिकच घसरगुंडी होत जाते आणि मग Once a suicide, always a suicide!

अल्बेर कामू एकदा म्हणाला होता, Mankind has but one problem, and that is suicide."

Suicide is a cry for help.

आणखी एक लेखक म्हणाला होता, "कुणी आत्महत्या केल्याचे ऐकले किंवा वाचले की मला थोबाडीत मारल्यासारखे वाटते."

पंधरा ते चोवीस या वयोगटातल्या व्यक्तीत जास्तीत जास्त आत्महत्या होत असते. डेंटिस्ट लोक सर्वांपेक्षा अधिक आत्महत्या करतात, दात कोरून कधी पोट भरतं का या नियमाला जरी ते अपवाद असले तरी जीव देण्यात त्यांचा पुढाकार असतो. पुढील क्रमांक मानसशास्त्रज्ञाचा. त्यांच्यातही आत्महत्येचे प्रमाण फार मोठे असते.

आत्महत्या करण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे depression हे बऱ्याच वेळा endogenus असते. शरीरात रासायनिक असंतुलितपणा आला की मग काही बाह्य कारण नसताना खिन्न व उदासीन वाटते आणि मग कळते पण वळत नाहीला सुरुवात होते. एखादा अभागी जीव तुमच्याजवळ बोलतो की मी आत्महत्या करणार. मग तुम्ही त्याला अगदी टॅक्टफुली विचारा की, आत्महत्या करण्यासाठी तो कुठले साधन वापरणार आहे? त्याने जर पटकन उत्तर दिले की, गळफास लावून, तर मग खरेच तो कदाचित जीव देईल; पण कशा रीतीने आत्महत्या करायची हे ज्याने ठरवलेले नाही तो कदाचित धमक्या देऊनही आत्महत्या करणार नाही!

आत्महत्या करणाऱ्या व्यक्ती जशा विविध तशी आत्महत्या करण्याची कारणेही व्यामिश्र. वैफल्य, बेकारी, दुर्धर आजार, बदनामी, पैसा गमावणे, करिअरमध्ये अपयश, अती श्रीमंती, धवघवीत यश, परीक्षेत नापास, जीवघेणा एकाकीपणा, प्युअर बोरडम, न आवडणारे करिअर, प्रेमभंग वगैरे अनेक कारणे असू शकतात.

एक कारण मात्र मला फार चमत्कारिक वाटले.एक मुलगी नुकतीच प्रेमात पडली होती. लग्न ठरलं होतं. एकमेकाला अनुरूप होते. ती मुलगी नेहमी म्हणायची "Oh, I am so happy! I feel like ending my life on a happy note. Lest I do not die unhappily." आणि तिने यशस्वी आत्महत्या केली!

या सर्व कारणाव्यतिरिक्त आणखी एक महत्त्वाचे अनाकलनीय कारण म्हणजे डेथविश. प्रत्येक माणसात ही कमी अधिक प्रमाणात असते असे फ्रॉइड म्हणाला होता. रस्त्यावरचे बरेचसे अपघात हे अपघात नसून सुप्त मनाने घडवलेल्या आत्महत्याच असतात असेही त्याने सुचवले होते.

आत्महत्या करण्याच्या प्रयत्नांमध्ये स्त्रियांनी केलेल्या प्रयत्नांचे प्रमाण जास्त असते असे दिसून आले आहे; पण मरण्यामध्ये त्या यशस्वी होत नाहीत. याउलट पुरुषात त्या मानाने आत्महत्या करण्याचे प्रयत्न कमी होतात; पण जे होतात ते स्त्रियापेक्षा पुष्कळ वेळा यशस्वी होतात.

आत्महत्या करणे हा गुन्हा आहे असा कायदा अजूनही पुष्कळ देशात आहे! Freedom of speech, action, press, religion, starvation–but no freedom of death! मध्ययुगात आणि त्यापूर्वी काही देशात जर कुणी आत्महत्या केली तर मरणानंतर त्याला शिक्षा म्हणून त्याच्या हृदयातून एक सळई आरपार भोसकली जात असे.

दररोज २१ वर्षांच्या आतले तीस अमे-

रिकन्स आत्महत्या करतात अशी माहिती डॉ. डॅरॉल्ड ट्रेफर्ट यानी एकदा दिली होती. लाचलुचपत, नफेबाजी वगैरे नव्या पिढीला आवडत नाही म्हणून एकट्या अमेरिकेत गेल्या दहा वर्षात आत्महत्या तिपटीने वाढल्या आहेत.

'त्याला दुसरा मार्गच नव्हता ' या व अशा चर्चेने आत्महत्या म्हणजे एक honourable solution आहे असा समाज काही प्रमाणात पसरतो. कोणत्याही लहान मुलाच्या जवळच्या नातेवाइकाने आत्महत्या केली तर त्या मुलाची आत्महत्या करण्याची शक्यता एकदम ७५ टक्क्यानी वाढते.

ए. अल्वारेझ याना असे वाटते की, लेखक जेव्हा आत्महत्येचा प्रयत्न करतात तेव्हा ते तो अनुभव तरलपणे माडतात. यात तसे काही नवीन नाही. लेखक कोणताही विषय किंवा अनुभव तरलपणे मांडतात. ते त्याचे कामच असते.

आत्महत्येचा एक आगळा वेध घेऊन अल्वारेझ शेवटच्या प्रकरणात कबूल करतात की त्यांनी एकदा आत्महत्येचा प्रयत्न केला होता. वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून हे पुस्तक लिहिलेले असल्यामुळे त्यातील काही भाग अत्यंत वाचनीय झाले आहेत.

आत्महत्या हे धक्कादायक, दयनीय, शोचनीय गूढ कोडे आहे. कोणत्याही जीवाच्या शरीराच्या पेशी जिवंत रहाण्याचा आक्रोश करीत असतात. कोणत्याही परिस्थितीत जगावे हाच त्याचा घोषा असतो. म्हणजे आत्महत्या ही शरीराची आणि मनाची head on collision असते आणि अशा या head on टकरी नेहेमीच मती गुंग करणाऱ्या असतात.

कित्येक देशात Suicide Prevention Centres असतात. नुसता फोननबर फिरवला की आत्महत्येचा विचार करणाऱ्याला दिलासा व मदत मिळते. वेळ मारून नेल्याने पुष्कळ आत्महत्या टळल्या आहेत.

अल्वारेझ लिहितात, 'Freud saw suicide as a great passion, like being in love. In the two opposed situations of being most intensely in love and of suicide, the ego is overwhelmed by the object, though in totally different ways.'

आता ego overwhelm झाला म्हणजे तो शरण गेला. त्यामुळे मला तरी असे वाटते की, तडजोड न करणारा ego च आत्महत्या करतो. शेवटी माझा मीपणा टिकवता येत नाही म्हणूनच जीवन असह्य वाटते. या प्रत्येक तडजोडीत तुम्ही ज्या प्रमाणात 'मी' पणाचा भाग देऊ शकता त्या प्रमाणात तुम्ही आत्महत्येपासून लांब जाऊ शकता.

युजीन ओ'नील त्याच्या आत्मचरित्रात्मक नाटकात लिहितो,

'I will always be a stranger who never feels at home, who does not really want and is not really wanted, who can never belong, who must always be a little in love with death.'

– जे. एन्. पोंडा

---

## नवीन दाखल झालेली पुस्तके

1. John Arlott's Book of Cricket — 130–00
2. Kissinger years : By T. N. Kaul — 50–00
3. The Far Arena (Best Seller Novel) Sapir, Ben Richard — 55–00
4. Beyond The Poseidon Adventure ( Sequel )
   Paul Gallico — 00–85
5. A Can of Worms : James Hadley Chase
6. Shadow of The Moon ( Bestseller–Novel)
   –M. M. Kaye — 37–05

* पुस्तके हाताळण्यापूर्वी हात स्वच्छ असल्याची खात्री करून घ्या.
* पाने उलटताना ती काळजीपूर्वक उलटा.
* पुस्तकात कोणतीही जाड अगर तीक्ष्ण वस्तु ठेवू नका.
* खुणेसाठी पाने दुमडू नका.
* पुस्तक वाचून झाल्यावर ते उन्हात किंवा धुळीच्या जागी ठेवू नका.
* लहान मुलांपासून पुस्तके दूर ठेवा.
* उघडे पुस्तक पालथे ठेवू नका.
* कोणताही पदार्थ खाताना किंवा पिताना पुस्तक वाचू नका.
* पुस्तकांची ने–आण करण्याकरता स्वतंत्र व स्वच्छ पिशवी ठेवा.

सर्वांत महत्त्वाचा मुद्दा लक्षात ठेवा. ५० वाचकांनी पुस्तके काळजीपूर्वक वापरली व ५१ व्या वाचकाची पुस्तके हाताळण्याची सवय खराब असली तर ग्रंथालय बॅक टु स्क्वेअर वन जात असते.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.**

## हिचकॉकच्या कथा । कथा पाचवी

## स्वैर अनुवाद । रवींद्र गुर्जर

# आपुले मरण पाहिले म्या....

ती कल्पना ब्रॅडलीच्या सुपीक डोक्यातूनच निघाली. रात्र कंटाळवाणी झाली होती. हेडक्वार्टरच्या छोटयाशा खोलीत 'क्राइम रिपोर्टर्स' जांभया देत बसले होते. 'तीन पत्ती' डाव बराच वेळ चालला होता. ब्रॅडलीच मन त्यात रमत नव्हतं. काही तरी रोमांचक घडावं, असं त्याला वाटत होतं

'मित्रहो,' हातातले पत्ते फेकून देऊन तो म्हणाला, 'आपण म्हाताऱ्या पॉपची गंमत करू या!'

त्या इमारतीच्या तळमजल्यावर अनाथ बेवारशी लोकांचं प्रेतागार होतं. पॉप हेन्डरसन हा तिथला रात्रपाळीचा रखवालदार होता. सत्तरीला पोहचल्यामुळे त्याची हालचाल मंदावली होती आणि त्याचं डोकं त्यापेक्षाही मंदपणे चालत असे. वास्तविक त्यानं यापूर्वीच निवृत्त व्हायला पाहिजे होतं; पण कौटुंबिक जबाबदारीमुळं ते इष्ट नव्हतं. अपंग बायको. मुलं, देणी या सगळ्या गोष्टी निवृत्तिवेतनात भागण्यासारख्या नव्हत्या. कामही फार अवघड नव्हतं म्हणून वरिष्ठानी त्याच्या वयाकडे दुर्लक्ष करून त्याला राहू दिलं होतं.

'कसली गंमत?' फर्नेस नावाच्या वार्ताहरानं विचारलं. तो 'रेकॉर्ड' दैनिकाचं काम बघत होता. 'एक्सप्रेस'च्या ब्रॅडलीनं आपली कल्पना सांगितली. त्यावर मान हलवून फर्नेस म्हणाला, 'भलतंच काही तरी नको! बिचाऱ्या पॉपला का उगीच त्रास द्यायचा? त्याचं डोकं बताचच आहे!'

पण ब्रॅडली ऐकतो थोडाच! तो उपद्व्यापी म्हणून प्रसिद्ध होता. काही तरी नाविन्यपूर्ण कल्पना लढविणारा, गमत्या इसम म्हणून त्याची ख्याती होती. त्याच्या दृष्टीनं विनोद करणं महत्त्वाचं होतं. मग तो कोणावर का असेना.

म्हणून तो आग्रह करत राहिला आणि शेवटी उगीच वाद नको म्हणून फर्नेसनं मान्यता दिली. 'क्रॉनिकल'च्या मॉर्गननं दोन पेग पोटात रिचवले असल्यामुळं आधीच मान्यता दिली होती.

अशा रीतीनं तिघंही तळमजल्यावर आले. पॉप प्रेतागाराजवळील खोलीत रात्रपाळी संपण्याची वाट बघत बसला होता.

नुसता बसून राहिला होता.

मुख्य खोलीत भिंतीमध्ये प्रेतांसाठी दीड बाय दोन फुटांचे वीस कप्पे होते. पूर्ण वाढ झालेल्या माणसाचं शरीर त्यात व्यवस्थित मावू शकत होतं. अर्थात हालचाल न करता 'स्वस्थ पडून' राहायचं असेल तर! शून्याखालच्या तपमानात प्रेतं ठेवली जायची. ते शहर मोठं असल्यामुळं अपघातात मृत्युमुखी पडलेल्या किंवा बेवारशी लोकांची संख्या कमी नसायची. या कारणामुळे तिथल्या बहुतेक जागा भरलेल्या रहायच्या.

'पॉप,' ब्रॅडली म्हणाला, 'आम्हाला ११ नंबर बघायचाय्. न्यूयॉर्क बँकेतला बेपत्ता इसम तो असावा की काय ही शंका आहे.'

'अकरा नंबर?' पॉप जडपणे उठला. सावकाश चालत जाऊन त्यानं अकरा नंबरच्या कप्प्याची कडी काढली आणि आतून बर्फाची लादी पूर्णपणे बाहेर ओढली त्यावर एक आकृती रबरी चादर पांघरलेल्या स्थितीत पडलेली होती. ब्रॅडलीनं चादर बाजूला केली आणि चेहऱ्याच निरीक्षण करत असल्याचा अभिनय सुरू केला.

'त्याच्यासारखा दिसतोय खरा,' ब्रॅडली म्हणाला, 'वर्णन जुळतंय. या माणसाचं रेकॉर्ड आणशील पॉप?'

'ओके मि. ब्रॅडली.' पॉप आपल्या खोलीत गेला. फर्नेसकडे पाहून ब्रॅडलीनं डोळे मिचकावले. फर्नेस पॉपच्या मागोमाग गेला. ते दोघंही दिसेनासे झाल्यावर ब्रॅडली आणि मॉर्गन 'गमती'ची तयारी करू लागले.

फर्नेसनं पॉपला त्याच्या खोलीतच गुतवून ठेवलं. थोड्या वेळानं मॉर्गन तिथे आला

'थांब, पॉप. कागदपत्राची गरज नाही.' तो म्हणाला, 'आमची काही तरी चूक झाली असं वाटतं. अकरा नंबरला पुन्हा जागच्या जागी झोपव. चल फर्नेस, आपण वर जाऊ आणि पत्त्यांचा डाव टाकू!'

दोघं वार्ताहर बाहेर जाऊन वाट बघू लागले. पॉपनं कागद पुन्हा फाइलला लावले. नंतर अकरा नंबरचं प्रेत आत ढकलण्यासाठी तो मोठ्या खोलीत जाऊ लागला.

त्या ठिकाणापासून दहा-बारा फुटावर असताना लादीवरील रबरी चादर हलली. त्याखालून कण्हण्याचा नाटयपूर्ण आवाज ऐकू आला. नंतर ती आकृती हळूहळू उठून बसली. ऱ्हस्व दृष्टीच्या पॉपला तिथे बसलेल्या ब्रॅडलीचा चेहरा ओळखू आला नाही.

'मी कुठे आहे?' त्या बातमीदारानं खोल आवाजात प्रश्न केला. 'तुम्ही—माझं—हे—काय—केलंत?' पॉप जागच्या जागी थबकला आणि डोळे फाडून बघू लागला. ब्रॅडलीनं त्याच्याकडेच बोट केलं होतं.

'तू!' खर्जातला आवाज काढून तो म्हणाला, 'तू असं का केलंस? तू—मला—ठार—करायचा—प्रयत्न—केलास!'

ब्रॅडलीच्या अपेक्षेप्रमाणे परिणाम साधला होता. पॉप गर्भगळित होऊन जागेवरच थांबला. त्याचा श्वास घुसमटला. नंतर तो वळला आणि अडखळत धावू लागला. गेल्या वीस वर्षांत तो इतक्या वेगानं पळाला नव्हता!

'धावा, धावा!' तो किंचाळला, 'तो जिवंत आहे! तो उठून बसला! सार्जंट! सार्जंट रॉबर्ट!, लवकर या! एक प्रेत पुन्हा जिवंत झालय!'

फर्नेस आणि मॉर्गन यांना मागे टाकून पॉप जिना चढू लागला.

तिकडे ब्रॅडलीनं बर्फावरून खाली उडी टाकली. तो खदखदा हसत होता. नंतर चादर बारा नंबरच्या रिकाम्या कप्प्यात

टाकून त्यानं तो बंद केला.

'चला, दोस्त हो!' हसून पुरेवाट झालेला ब्रॅडली बाहेर येऊन दोघाना म्हणाला, 'दुसऱ्या जिन्यावरून वर चला! सार्जंट एवढ्यात खाली येईल. तो माथेफिरू आहे. त्याला संशयही येता कामा नये!'

ते पुन्हा प्रेसरूममध्ये परतले. सार्जंट-बरोबर पॉप जिना उतरत होता. पॉपचा थरकाप अजूनही कमी झाला नव्हता.

'तो उठून बसला, सार्जंट ... मी सांगतो ना की तो उठून बसला आणि त्यानं माझ्या-कडं पाहिलं ... आणि ते ...'

पुढे आवाज येईनासे झाले. ब्रॅडली आता मुक्तपणे हसू लागला. मॉर्गन अस्वस्थपणे सौम्य हसला आणि गप्प झाला. फर्नेस आधीच स्वत:वर चिडला होता. त्याला पश्चात्ताप होत होता. त्यानं सिगारेट पेटवली आणि वैतागून जमिनीवर चिरडून विझवली.

तीन मिनिटांनी जाडजूड सार्जंट पुन्हा वर आला. त्यांच्या दाराशी थांबून तो खेकसला, 'काय चेष्टा चाललीय्? तुम्ही अकलेचे खंदकच आहात!' पण प्रेसला किती दुखवायचं आणि किती नाही याचा त्याला अंदाज असल्यामुळं पाय आपटत तो आपल्या खोलीत परतला.

'बघितलात त्याचा चेहरा?' ब्रॅडली नेहमीच स्वत च्या विनोदावर बेहद्द खूष असे. 'तो कसा चडफडत होता. त्याला — पण तुम्हाला काय झालं — मित्रांनो?' बाकीच्या दोघांची काहीच प्रतिक्रिया न झाल्यामुळं तो म्हणाला, 'तुम्हाला विनोदावर साधं हसता येत नाही?'

'मी निघालो,' फर्नेसनं जाहीर केलं. 'जर माझ्या ऑफिसचा फोन आला तर मी एका बातमीच्या मागे आहे, असं सांगा!'

तो निघून गेला. 'मूर्ख लेकाचा!' ब्रॅडली कुरकुरला. मॉर्गननं नुसते खांदे उडवले. तो मद्याच्या तंद्रीत होता.

'एकंदरीत तुझी कल्पना काही फारशी चांगली नव्हती.' मॉर्गन काही वेळानं म्हणाला. 'मी सुद्धा जातो आणि एक छोटासा पेग मारून घरी पळतो. पेपर तिकडे छापूनही झाला असेल म्हणा!'

तोही बाहेर पडला. ब्रॅडली एकटाच राहिला. सिगार पेटवून तो स्वत:शीच म्हणाला, 'ज्याला विनोद पचत नाही अशा माणसाचं तोंडही बघू नये!' त्याच वेळी पॉप हेन्डरसन खोलीच्या दाराशी येऊन उभा राहिला. त्यानं आत् डोकावलं.

'तुम्ही असं करायला नको होतं, मि. ब्रॅडली!' तो नेहमीच्या शांत आवाजात म्हणाला, 'माझी बोबडी वळली; पण त्याबद्दल माझं काहीच म्हणणं नाही. गोष्ट अशी आहे की, सार्जंट रॉबर्टचा राग निष्कारण मी ओढवून घेतला. आधीच तो माझ्याबद्दल तक्रारी करत असतो आणि आता तर तो चांगलाच भडकला आहे!

'आम्ही जेव्हा खाली गेलो तेव्हा सगळी प्रेतं जागच्या जागी ठीक होती. ते पाहून तो म्हणाला की, मला भ्रम झाला असावा. मी जेव्हा सागितलं की तुम्ही लोक खाली आला होता. तेव्हा तो म्हणाला की, हा ब्रॅडलीचाच चावटपणा असणार!'

पॉप श्वास घेण्यासाठी थांबला. त्यानं ब्रॅडलीकडे स्थिरपणे पाहिलं; पण त्यात रागाचा लवलेशही नव्हता. ब्रॅडली सावकाश झुरके मारत होता.

'तो म्हणाला की मी जर पुन्हा तुमच्या विनोदाला बळी पडलो किंवा आणखी एखादी चूक केली तर मला राजीनामा द्यायला भाग पडेल. मला पैशाची अत्यंत गरज आहे म्हणून कृपया यापुढे अशी मस्करी करू नका!'

आणखी एक क्षणभर तिथे उभं राहून तो डुलत डुलत निघून गेला.

ब्रॅडलीनं खांदे उडवले. धुराचं एक वर्तुळ काढलं आणि फोनजवळ गेला.

'मी ब्रॅडली. इथे सर्व शांत आहे पेपर छापायला सुरुवात झाली? ठीक आहे. मी निघालो उद्यापर्यंत मला त्रास देऊ नका!' त्यानं फोन बंद केला.

तो बाहेर पडला. दाट काळोख होता. कडक थंडी पडली होती त्याला प्रश्न पडला. आजचा विनोद अंगाशी आला होता आणि बाई किंवा बाटलीपेक्षाही त्याला हसतखेळत, मजेत राहायला आवडत असे. या वेळी त्यानं ड्रिंक घ्यायचं ठरवलं; पण फर्नेस किंवा मॉर्गन असतील तिथे जायला नको; त्यापेक्षा थोडा दूर, बंदराजवळ असलेला लहानसा बार चांगला तिथे दैनिकातले लोक फिरकत नसत. ब्रॅडली त्या दिशेनं निघाला.

ती जागा लहानशी आणि अस्वच्छ होती, पण व्हिस्कीनं त्याला ऊब आली. तिसऱ्या पेगनंतर तो पहिल्यासारखा उत्साही झाला. त्याचं चित्त प्रफुल्लित झालं. चौथ्या पेगनंतर तो नव्या विनोदाचा विचार करू लागला. गंमती–जमती करण्यात आणि हसण्या–खेळण्यात नाही वेळ घालवायचा तर काय उपयोग! फर्नेस आणि मॉर्गन अगदीच रद्दड आहेत!

त्यानं आजुबाजूला पाहिलं. पहाटेचे दोन वाजून गेल्यामुळं बार जवळजवळ रिकामा झाला होता. बारमन आणि तो सोडून आणखी एकच बुटका माणूस तिथे होता. तो काउंटरच्या खाली असलेल्या आडव्या ब्रासच्या पट्टीवर पाय टेकवून बिअर पीत होता. बारमन हा हसू शकेल असा इसम वाटत होता आणि गंमत करायची तर ती बुटक्या माणसाचीच!

ब्रॅडली आतल्या आत खिदळला. बुटाची नाडी बांधायचं निमित्त करून तो खाली वाकला आणि बुटक्या माणसाच्या बुटामध्ये मागच्या बाजूला पडलेल्या चामड्यातील फटीतून पेटती काडी आत टाकली. नंतर पटकन उभं राहून त्यानं आणखी ड्रिंक मागितलं.

बारमनकडे पाहून त्यानं सवयीप्रमाणे डोळे मिचकावले. 'गंमत बघा!' तो कुज-बुजला.

पण बारमनच्या लक्षात काहीच आलं नाही. ब्रॅडली हसू दाबून उभा होता. तेव-ढ्यात तो बुटका माणूस किंचाळला आणि एका पायावर नाचू लागला. ब्रॅडली आता मोठ्यानं हसू लागला. त्यानं बारमनकडे अभिप्रायासाठी बघितलं.

तो बेसावध असताना बुटका माणूस त्याच्यावर चाल करून आला आणि एक इरसाल शिवी देऊन त्यानं ब्रॅडलीच्या तोंडावर सणसणीत गुद्दा लगावला. तो त्याच्या ओठा-वर बसला. तोल जाऊन तो एकदम मागे पडला. त्याला डोकं कशावर तरी आदळ-ल्याची जाणीव झाली आणि नंतर सगळा अंधार झाला.

बुटका माणूस त्याच्याकडे संतापून बघत होता. 'महामूर्ख! माझ्याशी खेळ करतो! या किड विल्कीनशी?'

बारमन पुढे झाला. त्याने पोटावरच्या घाणेरड्या रुमालाला हात पुसले.

'तुम्ही याला फारच जोरात मारलं किड.' बारमन म्हणाला, 'तो निपचित पडलाय् !'

'काय, फार तर त्याचे एकदोन दात पडले असतील. पुढच्या वेळी कुणाचीही गंमत करताना तो दोनदा विचार करील !'

'त्याचं डोकं पहा कसं वेडंवाकडं पडलंय!' बारमन खाली वाकून काळजीच्या स्वरात म्हणाला. त्यानं ब्रॅडलीची नाडी दाबून पाहिली आणि त्याचा लालसर चेहरा पांढरा पडला. 'तो ठार झालाय् !'

'ठार ?' बुटका माणूस दचकून म्हणाला. 'माईक, तो अपघात आहे ! मी त्याला इतकं जोरात मारलं नव्हतं. हा अपघातच आहे !'

'हो ! हा अपघात आहे !'

बारमन घाईघाईनं दाराशी गेला. त्यानं दार आतून बंद केलं. बाहेरचे दिवे मालवून तो ब्रॅडलीजवळ परतला.

'हे काही चागलं नाही, किड.' तो ब्रॅडलीचे खिसे चाचपून म्हणाला, 'आधीच पोलिसांचा त्रास होत असतो आणि आज इथे मुडदा पडला !'

'समजलं, समजलं !' किड गुरगुरला. 'मी रागावलो की मला भान राहात नाही. त्यामुळे नेहमीच अडचणीत येतो; पण आता आपण काय करायचं ?'

तोपर्यंत ब्रॅडलीचं पाकीट बारमननं बाहेर काढलं होतं.

'किड, झाली ही गोष्ट फारच गंभीर आहे. हा इसम बातमीदार आहे, तोही एक्सप्रेसचा. ते तर पोलिसापेक्षाही वाईट !'

'बातमीदार ?' किड तोंड वाकडं करून म्हणाला. 'आणि तो माझ्या वाटे गेला ! आणि त्याची मान मोडली ? का ? माझ्या बाबतीत असं का व्हावं ?'

'ते आता जाऊ दे. मला एक कल्पना सुचलीय्. याला आपण बंदरावर नेऊन टाकू. झिंगल्यामुळं हा तोल जाऊन पडला असं दिसलं की बास झालं !'

'चालेल !' बुटका इसम खूष होऊन म्हणाला, 'सकाळी सहा वाजता मी जहाजावरून निघणार आहे. पुन्हा इकडे फिरकणार नाही म्हणजे झालं ! कोणी चौकशी करत इथे आलं तर साग की तो भरपूर दारू पिऊन बाहेर पडला होता. पुढे काय झालं हे तुला ठाऊक नाही !'

'ठीक आहे ! आधी त्याचे सगळे खिसे रिकामे करू म्हणजे ओळख पटायला तेवढाच उशीर लागेल. नंतर त्याला पाण्यात फेकून देऊ !'

त्यानं ब्रॅडलीच्या खिशातल्या सगळ्या गोष्टी आपल्या खिशात भरल्या. नंतर आतले दिवे बंद करून मागचं दार उघडलं. दोघांनी ब्रॅडलीला उचललं आणि ते मागच्या बाजूला अंधारात मिसळले.

ब्रॅडली जेव्हा अर्धवट शुद्धीवर आला तेव्हा आपण जिवंत आहोत, याची त्याला प्रथम जाणीव झाली. त्यानं हलायचा प्रयत्न केला, पण सगळं अंग बधिर झाल्यामुळं ते जमेना. तो कशा प्रकारे पडलेला होता, हे सुद्धा त्याला कळेना.

आपली मान ! आपण पडलो तेव्हा मानेवर आपटलो. मागे एकदा फूटबॉल खेळताना असेच पडलो होतो. तेव्हा महिनाभर रुग्णालयात झोपावं लागलं. या वेळेची दुखापत अधिकच वाईट आहे. बघू काय होतं !

नंतर एक आवाज त्याच्या कानावर पडला तो खूप दुरून आल्यासारखा वाटत होता.

'ठीक आहे, याला तुझ्या ताब्यात दिलं आहे. तो बंदराजवळ सापडला. तो बहुधा पिऊन लास झाला असावा. आम्हाला तो सापडला तेव्हाच थंड पडला होता. डॉक्टरला त्याची नाडी सापडली नाही, म्हणून त्याला इकडे आणलेलं आहे; अद्याप त्याची ओळख पटलेली नाही. त्याला 'बिछान्या 'वर आरामात निजव. उद्या सकाळी उत्तरीय तपासणी केली जाईल !'

आवाज बंद झाला. ब्रॅडलीला उचलून हलवत असल्याचं समजलं. त्याच्या मानेत बारीक आवाज झाला आणि एखादी शीर जागच्याजागी आली असावी म्हणून तो डोळे उघडू शकला.

त्याला पूर्ण शुद्ध नसूनही बाजूच्या वातावरणामुळे जागेची ओळख पटली

'पॉप !' तो क्षीण आवाजात म्हणाला, 'पॉप हेन्डरसन !'

पॉपनं नुकतेच त्याचे हात आणि पाय सरळ केले होते. ब्रॅडलीनं पुन्हा प्रयत्न केला.

'पॉप !' या वेळी आवाज मोठा आला. 'पॉप, मी जिवंत आहे !'

तो थकलेला रखवालदार वळला. त्याच्या कपाळावर आठ्या होत्या. ब्रॅडली प्रयासानं म्हणाला 'पॉप ! मी आहे, ब्रॅडली ! मी जिवंत आहे ! लवकर एखाद्या डॉक्टरला बोलाव !'

पॉप भेदरून गेला. खाली वाकून त्यानं चेहरा बघितला.

'मि. ब्रॅडली,' तो थक्क होऊन म्हणाला, 'मी तुम्हाला ओळखलं नाही. तुमचा चेहरा सुजलेला होता. कोणीच तुम्हाला ओळखलं नाही !'

'ते जाऊ दे.' सारी शक्ती एकवटून ब्रॅडली एक एक शब्द बोलत होता. 'मी जिवंत आहे. मला इथून बाहेर काढ आणि डॉक्टरला बोलाव !'

पॉप घोटाळला. काय करावं हे त्याला समजेना. नंतर त्यानं रबरी चादर उचलली आणि उलगडली.

'मि. ब्रॅडली, मी तुम्हाला सांगितलं होतं, पुन्हा गंमत नको ! एका रात्री तरी एकच गंमत पुरे !'

त्यानं बर्फाच्या लादीवर पडलेल्या त्या आकृतीवर व्यवस्थित चादर पसरली.

'सार्जंट रॉबर्ट पुन्हा मला जवळ उभं करणार नाही !' तो गंभीरपणे म्हणाला, 'मि. ब्रॅडली एकच विनोद दोनदा करणं चांगलं नाही !'

त्यानं अतिशय सावकाशपणे लाकडी फळी त्यावरील आकृतीसह कप्प्यात ढकलली आणि १२ क्रमांकाचं दार बंद करून कडी घातली.

नंतर पॉप आपल्या कार्यालयात परतला आणि रात्रपाळी संपायची वाट बघू लागला. □

(मूळ लेखक : रॉबर्ट आर्थर)


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : १० रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# गाझा ते गॅलिली : पृष्ठ ८ वरून

न्यूयॉर्कमध्ये युनोत आतापर्यंत अनेक राष्ट्रनेत्याची अवतरणं वादळी, स्फोटक झाली. कॅस्ट्रो झाले, निकिता क्रुश्चेव्ह झाले; पण त्याहीपेक्षा गाजलं ते यासेर अराफत याचं १९७४ मध्ये झालेलं युनोतलं पदार्पण आणि दर्शन. पुरी शंभर मिनिट त्यांनी युनोच्या आमसभेत साम्राज्यवाद, क्रांती, इतिहास, अरब, ज्यू इत्यादी विषयावर सबंध जगाला उद्देशून व्याख्यान दिलं. न्यू यॉर्कमधलं भाषण म्हणून त्यांनी अब्राहम लिंकन, वूड्रो विल्सन, जॉर्ज वॉशिंग्टन इत्यादींचे उतारे उद्धृत करून अमेरिकनांना 'खास' अपील केलं की आम्हा पॅलेस्टिनींना न्याय द्या. एक राष्ट्र नव्हे, तर एका संस्थेच्या प्रमुखाला युनोत असं भाषण करायला मिळण्याची पहिलीच वेळ. ह्या संधीचा उपयोग पुरेपूर करून घेऊन आपले व्यक्तित्व जगावर ठसवलं. तेव्हापासून त्याची डोक्याला काळं–पांढरं कफीया गुंडाळलेली आणि पँटवर मागे पिस्तुलाचं आच्छादन अडकवलेली मूर्ती जगप्रसिद्ध झाली.

### अराफात यांची वक्तव्ये

१९२९ मध्ये जेरुसलेममध्ये जन्मलेले यासेर अराफात हे कैरो विद्यापीठातून पदवी प्राप्त केलेले इंजिनियर आहेत. त्याचा फाती अराफात हा डॉक्टर आहे. तो बेरूट (लेबानन) मध्ये पॅलेस्टिनीसाठी हॉस्पिटल चालवतो. यासेर अराफात हे अशा जहाल पॅलेस्टिनी अरबांपैकी आहेत ज्यानी १९४८ मधला युनोचा अरब-ज्यू दोघांना काही भूमी देणारा तोडगा कधी मानलाच नाही. अरबानाच सगळं पॅलेस्टाइन हवं हे स्वप्न आणि हट्ट ते घेऊन बसले. शिक्षण झालेलं. पैसा मिळवणं ही सोपी गोष्ट सोडून ते पॅलेस्टिनी गनीम बनले. पुढे १९६४ पर्यंत ते भूमिगत असल्यामुळे फारसे दिसले नाहीत. १९६४ मध्ये पी. एल्. ओ. ची स्थापना झाल्यावर त्यांचं व्यक्तिमत्त्व दिसू लागलं. १९६९ मध्ये पी. एल्. ओ. चं प्रमुखत्व त्यांना मिळालं. अराफातांचा स्वार्थत्याग मोठाच आहे यात वादच नाही. मात्र त्याची हट्टी भूमिका आणि आतापर्यंत विनाशक कार्य यामुळे त्याचा सर्व सूर हा सतत विध्वंसक आणि नकारात्मक वाटतो.

पी. एल्. ओ. च्या मूलभूत घटनेत सर्वत्र दिसतो तोच एक नकार. कलम पहिलं सागत की पॅलेस्टाइन हा अरब स्वराज्याचा अविभाज्य भाग आहे, दुसरं सांगतं की, पॅलेस्टाइन हा अविभाज्य भूप्रदेश आहे, पंधरावं कलम सागतं की पॅलेस्टाइनची मुक्ती ही झायोनिझमचा (म्हणजे ज्यू लोक आणि धर्म) नायनाट करण्यासाठीच होणार !

अलीकडे पी. एल. ओ. नं अराफात हे मवाळ मतवादी आहेत असा प्रचार सुरू केला आहे. हेतू हा की, जास्तीत जास्त देशानी पी. एल्. ओ. ला मान्यता द्यावी. दुसऱ्या लेखाकात जॉर्डनच्या पश्चिम किनाऱ्यावरच्या नियोजित पॅलेस्टिनी राज्याचा उल्लेख आलाच आहे. ह्या सबंधात अराफातांची वक्तव्यं आतापर्यन्त कशी आहेत हे पाहणं उद्बोधक ठरेल.

ब्यूनोस आयर्स २१।३।१९७१

'आमचं ध्येय इस्राइलचा निःपात करणं हेच आहे. नको! आम्हाला शातता नको ! आम्हाला युद्ध आणि विजय पाहिजे. इस्राइलचा नाश यालाच आम्ही शांतता म्हणतो !

तेहरान १९।२।१९७९

'आम्ही एकत्र लढू; एक मुस्लिम देश म्हणून एकाच झेंड्याखाली लढू. आम्ही सर्वजण मुस्लिम धर्माचे उत्साही प्रचारक आहोत.'

बेरूट १।६।१९७९

'इस्राइलनं लक्षात ठेवलं पाहिजे की सत्तर वर्षांत त्याचा नाश ठरलेलाच आहे. या सत्तरपैकी बत्तीस वर्षं आत्ताच संपलीत.'

परवा अराफात नवी दिल्लीला आले, तेव्हा काही आपल्या अतिउत्साही राजकारण धुरीणांनी त्याची तुलना महात्मा गांधीजीशी केली ! हा एक तऱ्हेचा विनोदच म्हणायला पाहिजे. कारण हिंसाचार आणि दहशतवाद ही तत्त्वं अराफात उघडउघडच आणि त्यांत प्रतिष्ठा ठेवून पाळतात. १९७० सालापासून विमानाची चांचेगिरी, ऑलिंपिक्सवर खुनी हल्ला, परदेशी वकिलातींवर हल्ले, परकीय राजदूतांचे खून, बसप्रवाशांवर हल्ले आणि बाँबफेक–अशी असंख्य घातकी कृत्यं पी. एल्. ओ. नं केली त्यांचा अराफातनी कधीही निषेध तर केलेला नाहीच उलट पाठपुरावा केला !

एकीकडे हा दहशतवाद आहे आणि दुसरीकडे संपूर्ण हुकुमशाही आहे! पी एल्. ओ. मध्ये निवडणुका नाहीत, तिथे पॅलेस्टिनी लोकांना प्रतिनिधित्व असं नाही. पी. एल. ओ. ची नेमणूक इतर अरब हुकुमशाही देशानीच केलेली आहे. बरं, हा पैसा कसा येतो ही चर्चा दुसऱ्या लेखाकात आलेलीच आहे. अरब राष्ट्रं सध्या पी. एल. ओ शस्त्रास्त्रासाठी आणि एकूण 'व्यवस्थापना' साठी पैसा देतात आज पी. एल्. ओ. नं युरोपमध्ये ५० दशलक्ष पौंड गुंतवले आहेत अरब लीग दरवर्षी २९ दशलक्ष डॉलर्स देते. सगळी अरब तेल-उत्पादक राष्ट्रं मिळून दरवर्षी २५० दशलक्ष डॉलर्स देतात. या प्रचंड पैशाचं पुढे काय होतं हे गौडबंगालच राहील. मात्र यातून दहशतवादी कृत्यासाठी शस्त्रास्त्रं खरीदली जातात हे खरं. अर्थात् पी. एल्. ओ. वर कुठलीच नियंत्रणकारी शक्ती नसल्यामुळं आणखी किती तरी पैसा कुठं जातो ते गूढच आहे. याच संदर्भात परवा लीबियाचे आपले दोस्त गडाफी यानी अराफात यांच्यावर केलेला शाब्दिक हल्ला सूचक आहे. गडाफीनी उघड आरोप केला आहे की, पी. एल्. ओ. ला लीबियानं दिलेले पैसे अराफातनं स्वत.च्या खाजगी खात्यात स्विटझर्लंडमध्ये भरले आहेत. अराफात आज जगभर भटकतात, चिक्कार पैसा उधळतात आणि हिंसाचाराचे गोडवे गातात.

अराफात हल्ली बेरूटमध्ये राहतात. एका कोपऱ्यात दिसायला अगदी गलितगात्र अशा इमारतीत पी. एल्. ओ. चं मुख्यालय आहे, तिथेच ते बहुतकरून असतात. त्याच्या कचेरीत इराणचे सर्वाधिकारी अयातुल्ला खोमेनी याचं मोठं चित्र लावलेलं आहे. सर्वत्र सैनिकाचा पहारा चालू असतो. त्याचं दैनंदिन काम खूप असतं. पी. एल् ओ. नं काही कारखाने उघडले आहेत त्याच्यावर लक्ष ठेवणं, हॉस्पिटलसवर लक्ष ठेवणं इत्यादीत त्याचं लक्ष असतं.

अराफात याची कर्तबगारी मोठी आहे हे खरं असलं, ते स्वत: निराश्रित आहेत असं जरी असलं, आज पॅलेस्टिनी लोकांत त्याच्या-

इतकी लोकप्रियता कुणालाही नाही हे धरलं तरी ते ज्या तत्त्वांचं आणि आचरणाचं प्रतिनिधित्व करतात ती कितपत गौरवास्पद आहेत हे आपण ठरवायचं आहे. हिंसा, इस्राइलचा नाश, इस्लामधर्माचा अंधाभिमान, संपूर्ण हुकुमशाही, दंडेली ही तत्त्वं ते पाळतात. म्हणजे आपण भारतामध्ये जी तत्त्वं प्रिय मानतो, आचरणात आणण्याचा प्रयत्न करतो त्या तत्त्वांशी अराफात आणि पी. एल्. ओ. यांचं काहीच जवळीकीचं नातं नाही. अराफात काय, पण कुठलाच अरबनेता भारत–पाकिस्तान-संघर्षात केवळ मुस्लिम राष्ट्र म्हणून पाकिस्तानचीच बाजू घेतो हा योगायोग नव्हे. आज भारताच्या पूर्वभागात केवढा प्रचंड संघर्ष चालू आहे, त्यामध्ये परकीय पैसा आणि शस्त्रे मुबलक आहेत असं सगळेच म्हणतात. ती पी. एल्. ओ. कडून येत नसतीलच अशी एकशेएक टक्के खात्री कोणीही देऊ शकणार नाही. आतापर्यंत आतरराष्ट्रीय क्षेत्रात जे जे समूह दहशतवादासाठी कुप्रसिद्ध झाले, त्यांच्याशी पी. एल. ओ. नं गूढ आणि गुंतागुंतीचे संबंध ठेवले आहेत, यामध्ये इटलीचे रेड ब्रिगेडस्, जपानी रेड आर्मी, उरुग्वेचे टुपामारो, आयर्लंडची आय्. आर. ए. यांचा समावेश आहे. म्हणजे उद्या हे ग्रहण आपल्याला ग्रासणार नाही कशावरून ? आज आपल्या पश्चिम किनाऱ्यावर स्मगलिंगचा धंदा अरब पैशानंच चालतो. मिरजेला येणारे अरब आपल्या विविध चाळयात मश्गूल आहेतच. म्हणजे पी. एल. ओ. आणि अराफात यांच्या समर्थनाची किंवा विरोधाचीच केवळ ही बाब नसून एकूण भारताच्या श्रद्धा, मूल्यं, तत्त्वं याशी अरब देशाची सध्याची धोरणं सुसंगत आहेत का विसंगत आहेत हा खरा प्रश्न आहे.

बेन-गुरियन आणि इस्राइल किंवा पी. एल्. ओ. आणि अराफात यांच्यामधली निवड ही जास्तकरून प्रतीकात्मक आहे. तीत आतापर्यंत भारतानं पी. एल्. ओ. आणि अराफात याच्या बाजूनं अद्याप तरी कौल दिलेला आहे. ही निवड भारताला निदान स्वार्थ तरी साधण्याइतपत उपयुक्त ठरावी; पण तशीही ती ठरत नाही. 'ओपेक' नं तेलाच्या किमती सगळे साररूयाच परीने नागवले जातील अशाच वाढवल्या आहेत ! या दृष्टीनं भारतानं स्वत.चे हितसंबंध रक्षण करण्यासाठी तरी, ही निवड एकतर्फी करता कामा नये. आज जपान, फिलिपिन्स, थायलंड, हॉलंड हे देश आपल्यापेक्षा किती तरी पटीनी अरबांकडून तेल आयात करतात; पण त्यांचे इस्राइलशीसुद्धा मित्रत्वाचे संबंध आहेत. अरबांनाही आपली गरज आहेच की–आपण इस्राइलशी मैत्री केली म्हणून ते काही आपल्याला खाऊ शकत नाहीत. इस्राइलची भारताशी मैत्री करण्याची उत्कट इच्छा आहे; पण भारतानं इस्राइलला जवळजवळ अस्पृश्यच मानलं आहे. खुद्द पी. एल्. ओ. चे लोक मोशे दायानला पुष्कळदा भेटलेत; पण आपले वाजपेयीजी त्याना भेटले, तर आपण गहजब करतो. इस्राइल व बेन-गुरियन आपल्याला सगळ्या दृष्टींनी जवळचे आहेत; पण हे जाणूनबुजून न लक्षात घेणं हा कै. पंडित नेहरूंच्या विक्षिप्त अलिप्ततावादाचा आणखी एक नमुनाच आहे.

बेन-गुरियन द्रष्टे होते. त्यांची भाकितं इस्राइलनं मानली, त्याप्रमाणे दक्षता घेतली आणि स्वत.चं कल्याण केलं. आपल्याकडे द्रष्टे राष्ट्रनेते होतेच होते, पण त्याचे विचार इतके उत्तुंग आणि कालाच्या पुढचे होते, की इतर राजकारण्यांनी किंवा विचारवंतानी त्यांच्याकडे हेतुपुरःसर दुर्लक्ष केलं. पंचवीस वर्षांपूर्वी स्वातंत्र्यवीर सावरकरानी आसामबद्दल धोक्याचा इशारा दिला होता, हे वाचून आता आपण तोंडात बोटं घालतो ! गरज ही होती की, तेव्हा त्याचं परिशीलन आणि विचार आपण वाचायला हवे होते.

इस्राइलबद्दलही स्वातंत्र्यवीरांनी १९४७ साली द्रष्टे उद्गार काढले होते आणि आता १९८० मध्ये आपल्याला ग्रासू पाहाणाऱ्या पी. एल्. ओ. पासून पाकिस्तानच्या पॅन-इस्लामिक ब्लॉकबद्दल धोक्याचा इशारा दिला होता. त्याही आधी १९२३ साली ते म्हणतात, 'यदाकदाचित ज्यूचं राष्ट्र पॅलेस्टाइनमध्ये निर्माण झालंच, तर आम्हाला अतिशय आनंद होईल.' पुढे इस्राइल राष्ट्राची स्थापना होण्याच्या सुमारास १९–१२–१९४७ रोजी काढलेल्या एका पत्रकात स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात, 'ऐतिहासिक चष्म्यातून पाहिलं, तर असं दिसेल की, मुहंमद पैगंबराच्या जन्माच्या दोन हजार वर्षं आधीपासून पॅलेस्टाइन ही ज्यूची राष्ट्रीय भूमी होती. अरबांनी आपल्या सिंधप्रांतावर हल्ला करण्याआधी काही दशकंच आधी पॅलेस्टाइनवर चढाई केली'. पुढे पंडित नेहरूंच्या अरबांची मैत्री साधण्यासाठी इस्राइलशी वैर करण्याच्या धोरणातली चूक दाखवून ते लिहितात, 'भारताचं ( इथं त्याचा मूळ शब्द 'हिंदुडम') परराष्ट्रीय धोरण हेच पाहिजे की, आफ्रिका ते मलायी द्वीपकल्प यामधल्या निर्माण होणाऱ्या मुस्लिम वर्चस्वाला शह देणं. एका शक्तिशाली आणि स्वतंत्र अशा ज्यू राष्ट्राच्या जन्मामुळं मुस्लिम आक्रमक व अतिरेकी धोरणांना पायबंद बसेल. ज्यू लोकाचं आपल्याशी कोणतंही भांडण नाही, मग सध्याच्या कॉंग्रेस सरकारचं धोरण काही असो. आम्ही सर्व हिंदू-संघटक काही झालं तरी ह्या नवजात स्वतंत्र ज्यू राष्ट्राला सदिच्छा दर्शवितो आणि आमचा नैतिक पाठिंबा देतो आहोत. राजकीय आणि नैतिक दोन्ही दृष्टिकोनांतून हा पाठिंबा आहे'.

इस्राइलनं बेन-गुरियनना मानलं. आम्हाला स्वातंत्र्यवीर सावरकर दूरचे वाटले ! त्याचे विचारच काय पण त्याना अभिप्रेत असलेला 'हिंदू' शब्दाचा अर्थही आम्हाला समजला नाही, आम्हाला तो समजूनच घ्यायचा नव्हता ! इस्राइलला 'ज्यू' शब्दाचा अर्थ सापडला आणि आजचा इस्राइल उभा राहिला. द्रष्ट्या माणसाचे विचार तीस वर्षांनी खरे झाल्याचं पटतं; पण उशीरा पटून उपयोग होत नाही. एवढंच आहे की, काळ बदलला तरी दिशा तेवढ्याच राहतात. चुकलेली दिशा बदलण्याचा प्रयत्न सतत करता येतो, काळ जरी बदलता आला नाही तरी !

# स मा प्त

# चित्रपट

## एक बार फिर

### सजीव प्रेमत्रिकोण

Cine Image च्या 'एक बार फिर' या चित्रपटाने मुंबईच्या 'लोटस' चित्रपटगृहात काही दिवसांपूर्वी आपला शंभरावा दिवस पूर्ण केला.

'Art film' म्हणून या चित्रपटाचा गाजावाजा ऐकला होता. 'गमन' चित्रपट पाहिल्यापासून art film म्हटल्या जाणाऱ्या चित्रपटांबद्दल एक धडकीच मनात होती; पण निर्माता, लेखक–दिग्दर्शक सबकुछ श्री. विनोद पांडे असलेला 'एक बार फिर' हा चित्रपट पाहिल्यावर एक चांगला चित्रपट पाहिल्याचे समाधान मिळाले.

'गुड्डी,' 'कोशीश', 'छोटीसी बात' यांच्या जातीतलाच हा चित्रपट आहे. यात 'खानदानकी इज्जत' 'स्विमिंग पूलची दृश्ये 'बडया हॉटेलमधली बर्थ डे पार्टी' वगैरे हल्लागुल्ला प्रकार नाही.

महेंद्रकुमार हा एक लोकप्रिय चित्रपटतारा-चित्रपटाच्या छायाचित्रीकरणासाठी लंडनला जातो. बरोबर त्याची पत्नी कल्पनाही असते. महेंद्रकुमार अनेक स्त्रियांशी लफडी करणारा. पत्नी कल्पना लंडनला आल्यावर एका चित्रकाराच्या–बिमलच्या प्रेमात पडते. ते भावबंध दृढ होऊन पतीशी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेते, असे या चित्रपटाचे थोडक्यात कथानक.

चित्रपटातील वातावरणनिर्मिती, जलद पुढे जाणारे मनोविश्लेषणात्मक कथानक आणि उत्तम व्यक्तिचित्रे यामुळे प्रेक्षक चित्रपटाशी अगदी सहज समरसून जातो.

महेंद्रकुमार (सुरेश ओबेराय) तो स्वतःच्याच तोऱ्यात वागणारा आहे. तो छायाचित्रीकरणासाठी वेळेवर येत नाही. प्रकृती खराब आहे असे लेखक, दिग्दर्शकांना कळवून बायकांबरोबर मजा मारायला जातो. भोवतली वावरणाऱ्या माणसांवर तुच्छतेने खेकसतो. लेखक, दिग्दर्शकांना स्वतःच्या मनाप्रमाणे संवाद बदलणे भाग पाडतो. अतिमधुर भाषण ठोकतो. चित्रपटाच्या व्यवसायात काही माजलेले लोकप्रिय 'हिरो' असतात. त्यांच्यावर ही थोडी टीका आहे; पण ही टीका महेंद्रकुमारच्या व्यक्तिरेखेचा तोल बिघडू देत नाही. त्याला एकदम खल बनविले नाही. पत्नीवर त्याचे प्रेम आहे. तिला तो स्वातंत्र्य देतो. लंडनमध्येच शिकण्यासाठी रहायचे म्हणते तेव्हा तिची व्यवस्था लावून देतो. स्वित्झर्लंडला किंवा भारतात परत जाताना तिचा प्रेमाने निरोप घेतो. यातून पैसा आणि लोकप्रियता यामुळे चढून गेलेले पण काही जीवनमूल्ये मानणारे एका नटाचे व्यक्तिमत्त्व दिसते.

कल्पना (दीप्ती नवल) आकर्षक व्यक्तिमत्त्वाची कलाप्रेमी स्त्री आहे. फिल्मी जीवन तिला फारसे प्रिय नाही; पण तिने ते बिनतक्रार स्वीकारले आहे. पतीच्या लफडयांची चीड तिच्या मनात आहे; पण नुसती चेहऱ्यावर दिसते. शब्दांनी फारच क्वचित् तोंडातून बाहेर पडते. सूड म्हणून ती दुसऱ्या माणसाबरोबर फिरत नाही. तिचे आणि चित्रकाराचे सूर हळूहळू जुळतात. भावबंध दृढ होतात. तरीही तिच्या जीवनाची पाळेमुळे तिच्या पतीशीच जखडलेली आहेत हे तिच्या वागण्याबोलण्यातून जाणवते. ते तसे जाणवल्यामुळे प्रियकराबरोबरचे भावविश्व बाजूला ढकलून ती पतीकडे हिंदुस्थानात जाण्याचा निर्णय घेते तो पटतो. पतीशी जखडलेली असतानाच त्याच्या व्यभिचाराविषयी मनात असलेला मल, प्रियकराविषयीचे उत्कट प्रेम, मी सुशिक्षित आहे, मी माझा निर्णय का घेऊ नये असे अधूनमधून उफाळणारे विचार यांचे दीप्ती नवलच्या अभिनयात सहज दर्शन होते. त्यामुळे पतीचा फोन येताच तिचे प्रथम गोंधळून बोलणे, त्याचा रागीट हुकमी आवाज ऐकताच नकळत घटस्फोटाचा निर्णय तिच्या तोंडून बाहेर पडणे हेही तितकेच स्वाभाविक वाटते.

चित्रकार (प्रदीप वर्मा) हा कल्पनाचा प्रियकर. तिच्या प्रेमात वाहून जात असतानाच ती विवाहित असल्याची त्याला जाणीव आहे. पतीकडे जाण्याच्या तिच्या निर्णयाने तो दुःखी होतो; पण आश्चर्यचकित होत नाही. तिच्यावर कोणतेही दबाव आणत नाही; पण आवेगाने तिला भेटण्याचा मात्र प्रयत्न करतो. 'एक बार फिर' ये म्हणतो. ही व्यक्तिरेखा हृद्य वाटते.

अशा या तीन व्यक्तिमत्त्वाच्या स्वाभाविक वास्तव गुंतागुंतीमुळे नेहमीचा हल्लागुल्ला चित्रपटातील प्रेमत्रिकोण येथे सजीव झाला आहे. त्यात कृत्रिमता नाही. आपल्या चित्रपटामध्ये बहुतेक नायिका आर्यपतिव्रतेचा धर्म पाळणाऱ्या! बाहेरख्याली नवऱ्याशी कमालीच्या एकनिष्ठ राहून, प्रसंगी त्याच्या लाथा खाऊन शेवटी त्याला आपल्याप्रमाणे बदलविणाऱ्या अशा असतात. 'स्वामी' चित्रपटासारख्या चित्रपटातील एखादी नायिका काही वेळ वाट चुकते; पण पुन्हा घरटयातच येते; पण सरळ सरळ घटस्फोट घेणारी नायिका मला वाटते याच चित्रपटात प्रथम आली आहे.

चित्रपटाच्या कथानकात काही दोष आहेतच. कल्पनेने पहिल्याच भेटीत चित्रकाराबरोबर कारमधे बसून प्रदर्शन पाहण्यास जाणे पटत नाही. महेंद्रकुमारचा असिस्टंट कल्पनेला सांगतो, साहेब मीटिंगमध्ये आहेत आणि त्याच वेळी महेंद्रकुमार कोणत्या तरी स्त्रीला मिठीत घेताना दुधी काचेतून कल्पनेला दिसते. हा प्रसंग अतिरंजित वाटतो. कॅबरे डान्सर दिसताक्षणीच पार्टीत महेंद्रने आपला आब सोडून तिच्याशी लंपटपणा करणे त्याच्या कुर्रेबाज व्यक्तिमत्त्वाशी विसंगत वाटते. शेवटी कल्पनेचा 'प्रियकर-शोध' अगदीच फिल्मी वाटतो. कल्पनेचा घटस्फोटाचा निर्णय प्रेक्षकांना कळतो; पण प्रियकराला कळत नाही. यामुळे कथानकाला

संदिग्धता येते.

रघुनाथ सेथ यांचे संगीत प्रसंगांना पोषक आहे. नादीम खान यांची फोटोग्राफी केवळ खिळवून ठेवणारी आहे.

लेखक-दिग्दर्शक-निर्माता, कलावंत, छाया-चित्रणकार यांनी मिळून केलेला, निरनिराळे प्रसंग आणि व्यक्तींच्या भावना यांचा सहजाविष्कार यामुळे 'एक बार फिर' हा प्रभावी चित्रपट झाला आहे.

—विनया खडपेकर

## यह कैसा इन्साफ

### अश्लीलतेच्या काविळीवरील दसरी नारायणी उतारा

हिंदी चित्रपटसृष्टीत काही घरंदाज, कुळवंत घराणी आहेत. प्रत्येक घराण्याचे आपापले असे अतिशय पक्के कुळाचार आणि सकेत ठरलेले आहेत. उदाहरणार्थ—रामसे घराणे म्हटले की, ते हमखास रहस्यमय चित्रपटच काढणार. जेमिनी आणि ए. व्ही. एम. ही जुनाट घराणी कौटुंबिकतेच्या चरकातील प्रेम, भाडणे, दु:ख, त्याग इत्यादींचे आले-लिंबू-बर्फ टाकून काढलेला शिळा चित्ररस देण्याबद्दल अतिशय प्रसिद्ध होती. हीच परंपरा चालविणारी सध्याची घराणी म्हणजे बी. नागीरेड्डी आणि एल. व्ही. प्रसाद. तर या एल. व्ही. प्रसादसाहेबानी आपल्या प्रसाद प्रॉडक्शनच्या बॅनरखाली 'यह कैसा इन्साफ' नावाचा चित्रपट नुकताच प्रदर्शित केला. दिग्दर्शक आहेत' स्वर्ग-नरक' फेम दसरी नारायण राव.

म्हणजे होते काय की, शंकर (राज-किरण) आणि किरण (सारिका) अशा दोघांचे एकमेकावर प्रेम बसते. एक दिवस किरण शकरला विचारते, 'तू पैशाची इतकी काटकसर कशाला करतोस?' शंकर सद्गदित वगैरे होऊन सागतो, 'ही आमच्या 'छोटी मालकिन'ची शिकवण.' की, लगेच फ्लॅश-बॅक.

एक तरुणी—मधू (शबाना आझमी) एका देवळात गाणे म्हणत आहे. (गाण्याचा विषय—राम, मधूनच 'राम सियाराम सियाराम जयजय राम' असा कोरस आणि तीच तीच चाल ऐकताच चित्रपटाची titles पाहिली नसली तरी लक्षात येते—गीत, संगीत-रवींद्र जैन) ते गाणे रामनाथ मल्होत्रा (विनोद मेहरा) नामक तरुण ऐकतो आणि मधूच्या प्रेमात पडतो. मग थोडा वेळ दोघाचे गायीच्या शुद्ध तुपातील कौटुबिक वगैरे प्रेम झाल्यानंतर तो रीती-प्रमाणे तिला मागणी घालतो. ती तिच्या कुटुबात सर्वांत वडील. कारण अर्थातच वडील नाहीत त्यामुळे सर्व कुटुबाची जबाबदारी तिच्यावर. (या ठिकाणी सिनेमा एकदम डब्बल कौटुबिक बनतो.) मग तो तिची ही जबाबदारी वाटून घ्यायचे कबूल करतो की लगेच लग्न. (लग्न हा प्रकार सगळ्या चित्रपटात दोन तीन वेळा घडतो आणि सर्व वेळा दसरी नारायणांनी तो बेंडबाजा, वरात, राजा की आयेगी किंवा भैय्या राजा बनायेगा वगैरे टाळून मस्त घेतला आहे.) एवढा दुप्पट कौटुबिकपणा आल्यानंतर मग कौटुबिक संघर्षाला काय कमी! मधूची खाष्ट सासू विरुद्ध गरीब बापडी आई, हट्टी नणंदेचे चोचले, मधूच्या मेडिकलला जाऊ इच्छिणाऱ्या भावाचे प्रश्न वगैरे आणि त्यामुळे रामनाथ व मधूचे बिनसणे वगैरे होऊन शेवटी घर फुटते. रामनाथ आणि मंडळी मुबईला जाऊन नवीन कारोबार सुरू करतात, तर मधू आणि ब्रदर्स नागपूरचीच शाखा सांभाळतात. फ्लॅश-बॅक संपला.

मग किरणच्या ध्यानात येते, 'अरे, मधू म्हणजेच आपली आई!' मग किरण-शंकर शुभ-विवाह होऊन थोडा वेळ पूर्वपरिस्थितीचे छोटेसे नाटक परत खेळून रामनाथला सर्व तरुण मडळी कौटुंबिक समज देतात आणि मधू-रामनाथ यांची एक कौटुबिक मिठी होऊन चित्रपट संपतो. सबंध चित्रपटात काही केविलवाणे विनोद करण्यासाठी असरानीला वापरले आहे.

खरे म्हणजे स्वतःच्या माहेरासाठी नोकरी करणारी तरुणी, तिच्या सासरच्या माणसामळे — त्याच्या विरोधामुळे व अट्टहासामुळे निर्माण होणारे ताण, त्यामुळे गुदमरणारी, कोंडली जाणारी ती तरुणी आणि तिचा पती ही कल्पना अतिशय चांगली होती. सपूर्ण चित्रपटामध्ये मुख्यत: मधू व रामनाथचे जे प्रसंग आहेत ते या कल्पनेशी इमान राखून घेतल्याने अतिशय सुदर वठले आहेत. (याचे श्रेय अर्थातच शबाना आझमी आणि विनोद मेहरा या कलाकारांनाही आहेच.) पण अशा परिणामकारक प्रसंगाच्या जोडीला आधी उल्लेख केलेल्या कौटुबिकपणाचे प्रदर्शन करणारे जे अतिनाटकी आणि उथळ प्रसंग घुसडले आहेत त्यामुळे ही मूळ कल्पना पार बाजूला पडते आणि हिंदी चित्रपट म्हणजे अश्लीलता अशा काविळी नजरेने त्याच्याकडे पाहणाऱ्या कुटुंबवत्सल प्रेक्षकाला औषध म्हणून मिळालेला दसरी नारायणाचा प्रसाद असे चित्रपटाचे स्वरूप बनते. (या प्रसंगांमधील भडकपणा, नाटकीपणा आणि उथळपणाला बऱ्याच अंशी शशिकला, असरानी, राजकिरण इत्यादी बोलट जबाबदार आहेत आणि हो, यांपैकी काही बोलटांना दोन—तीन रद्द गाणी म्हणायला लावून चित्रपटाचा आणखी चोथा बनविला आहे.)

चित्रपटातील प्रत्येक शब्दाला काही ना काही चिन्हांच्या रूपाने न्याय द्यायलाच हवा, अशी काही तरी भयंकर ठाम समजूत दसरी नारायण रावाची असावी. (संदर्भ — स्वर्ग-नरकमधील उतू जाणारे दूध, 'आग है लगी हुअी' की लगेच सगळीकडे आग इत्यादी इत्यादी आणि इत्यादी.) या चित्रपटातही हे प्रत्ययाला येते गर्भपाताच्या गोळ्या घेतल्यानंतर मधूने वारंवार लहान बाळाच्या चित्राकडे पाहणे वा लग्न सूचित करण्यासाठी खेळण्यांमधील वरात येथपर्यंत समजू शकते; पण चित्रपटात एकदा मधू रामनाथला म्हणते, 'तुम्ही या घरात वृक्षासारखे आहात. वादळात तुम्हीच डगमगायला लागलात तर कसे होणार?' एवढ्या एका संवादाच्या आधारावर मग एक वृक्ष, त्याच्यावर बसणारे घाव, मग तो तुटत तुटत जाणे आणि शेवटी संपूर्ण तुटून पडणे एवढचा गोष्टी या साहेबांनी वारंवार वारंवार दाखवल्या. मधू—रामनाथच्या लग्नासाठी तर नको नको इतक्या वेळा सीता—स्वयंवराशी संबंधित शिल्पाकृती दाखवल्या.

मी स्वत: काही नागपूर पाहिलेले नाही; पण चित्रपटातील नागपुरी घराच्या बाहेर दिसणारे दोन पातळ्यावरील रस्ते आणि

त्यावरून वाहतूक करणारे पादचारी ( हे पादचारीसुद्धा अगदी ठरवून दिल्याप्रमाणे भारतातील बहुतेक सर्व प्रांतातून गोळा केलेले — सव्वीस जानेवारी वा पंधरा ऑगस्टला भरलेले प्रादेशिक वैशिष्ट्याचे प्रदर्शनच. ) पाहिल्यानंतर जरा गंमतच वाटली. शिवाय चित्रपटामध्ये विशेषतः गाण्यासाठी ज्या निर्मनुष्य बागा, निर्मनुष्य पूल वा तत्सम स्थळे दाखवतात, ती नक्की कुठे असतात; याबद्दल एक मला प्रचंड कुतूहल आहे.

असो. तर एल्. व्ही. प्रसाद यांच्या 'बिदाई' साच्यातील 'यह् कैसा इन्साफ' हा आणखी एक चित्रपट.

चित्रपटाबाहेर

## अमजदखान, सईद जाफ्री आणि सरडा

दोन-तीन दिवसापूर्वी दोन मुलाखती वाचल्या. एक होती अमजदखानची. मुलाखतीचा जवळजवळ पंचाहत्तर टक्के भाग 'मी अकबरखानला असा ठोकला आणि फिरोझखान तसा आहे.' अशा ठोशानी किंवा 'नाही हो नाही, अल्ला कसम—माझं आणि कोमिल्लाचं काही लफडं नाही.' अशा रंगसफेदीने भरलेला होता. एक प्रश्न होता, 'तुम्हाला तुमच्या कामावर टीका केलेली फारशी —'

प्रश्न अर्धवटच राहिलेला आणि अमजदचा जबाब, 'मला पत्रकार वा समीक्षकानी माझ्या कामावर टीका केलेली खपत नाही. मी जेव्हा एखादी भूमिका साकारत होतो, तेव्हा माझा कुणी तरी अतिशय जवळचा शेवटच्या घटका मोजीत असेल आणि तेच माझ्या मनात असेल; तर त्याचा विचार त्यांना कसा करता येईल ? एखाद्या शॉटसाठी एक तास लागेल असं आधी सांगितलं असेल आणि त्याला चार तास लागले आणि ते 'इरिटेशन' माझ्या चेहऱ्यावर उमटलं; तर त्याची जाणीव या अपुऱ्या समीक्षकाना कशी होणार ? हा, जो त्या ठिकाणी होता, ज्याला त्या परिस्थितीची पूर्ण कल्पना होती अशा एखाद्या दिलीपकुमार वा अमिताभ वा हृषिकेश मुकर्जीनं केलेली टीका मी जरूर ऐकून घेईन!'

पुढचा प्रश्न होता, 'तुम्ही खलनायकाच्या भूमिका स्वीकारणं थांबवलंय म्हणे?' (खरंच का तो सुदिन उगवला असेल ?)

'हे पहा, मी खलनायकाच्या भूमिका करण्याच्या विरुद्ध नाही; पण अजून किती वर्ष एका हातात बंदूक घेऊन मी हा नेहमीचा हाः हाः व्हिलन करीत राहू ? कलाकार म्हणून अशा साचेबद्ध भूमिका करण्याच्या मी विरुद्ध आहे आणि आज माझ्याबद्दल लोक काही म्हणोत, अजून काही दिवसांनी no son of a bitch can say that I don't have variety.'

दुसरी मुलाखत होती सईद जाफ्रीची. मुलाखत कसली-शतरंज के खिलाडी, संजीवकुमार, सत्यजित रे, नाटक इत्यादी इत्यादी विषयावर मारलेल्या गप्पाच. सहज ओघात त्याने सांगितले, 'लोक म्हणतात बुवा की, सरड्याप्रमाणं रंग बदलण्याची हातोटी माझ्यात असल्यामुळं कोणत्याही भूमिकेत मी फिट्ट बसू शकतो.'

सहजच डोक्यात या दोन मुलाखतीची सरमिसळ झाली. कोणत्याही कलाकाराचा 'मूड', त्याच्या भोवतालची (शरीर आणि मन दोन्ही भोवतीची) परिस्थिती या गोष्टीचा त्याच्या कलाकृतीवर परिणाम होणे स्वाभाविक आहे; पण त्या कलाकृतीच्या दर्जाची पारख करताना—आणि विशेषतः जर तो वाईट असेल तर त्या वाईटपणाचे अपश्रेय त्या कलाकाराच्या गळ्यात बांधताना—त्याचा त्या वेळचा मूड आणि त्या वेळची ती परिस्थिती याचे सर्वस्वी निकष लावणे अथवा त्याचा विचार करून मग त्यावरून त्या कलाकृतीचा दर्जा ठरविणे योग्य ठरेल का ? कोणत्याही कलाकाराने स्वतःच्या बाबतीत रसिकाकडून या सवलतीचा आग्रह किंवा अपेक्षा ठेवणेही बरोबर आहे का ?

फक्त कलाकारच नव्हे, तर प्रत्येक माणूस हा सतत निरनिराळ्या भावछटांच्या (मग त्या आनंदी असोत वा दुःखी असोत, शांत-स्थिर असोत वा सतत अस्वस्थ करणाऱ्या, घुसमटवणाऱ्या असोत) ताणाखाली वावरत असतो. अगदी सर्व गोष्टींच्या पलीकडे पोहोचलेल्या स्थितप्रज्ञ व्यक्तीलाही तटस्थपणाचा वा निर्लेपत्वाचा ताण सहन करावा लागत असेल. अशा अनेक ताणांखाली वावरत असतानाच कित्येकदा अनेक विख्यात कलाकृतीची रचना झाली आहे. अर्थात प्रत्येक वेळीच हे ताण उपयोगी ठरतील, असा नियम नाही; पण याचा अर्थ असाही नाही की, आपली एखादी कृती बिघडली, तर तिचा बचाव करण्यासाठी कलाकाराने त्याचा ढाल म्हणून वापर करावा.

अमजदखान 'हमारे तुम्हारे'मध्ये काम करीत असताना इरिटेट झाला असेल, कोणी आजारी असल्यामुळे अस्वस्थ असेल किंवा त्याला स्वतःला त्या दिवशी जुलाबाचा त्रास होत असल्याने हैराण झाला असेल. अमजद या माणसाच्या या अडचणीबद्दल आमची त्याला पूर्ण सहानुभूती आहे; पण याचा अर्थ त्या सबबीसाठी आम्ही त्याचे 'हमारे-तुम्हारे'तील तद्दन रद्दड, भिकार आणि खालच्या दर्जाचे काम खपवून घ्यावे अथवा त्या तसल्या कामाचेही कौतुक करावे, ही अपेक्षा ठेवणे अत्यंत चूक आहे. अर्थात 'मागणी तसा पुरवठा' या तत्त्वावर चालणाऱ्या आणि (काही सन्मान्य अपवाद वगळता) कला नामक प्रकाराशी दूरान्वयेही संबंध नसणाऱ्या चित्रपटधंद्याच्या हातात हात घालून चालणारा एक हुंडेकरी किंवा पेढीवाला असाच पेशा अमजदखानने पत्करलेला असल्यानंतर (तो स्वतः अत्यंत संपन्न

अभिनेता आहे, हे मान्य करूनही ) त्याच्याकडून फार विचारी वा विवेकी मताची अपेक्षा बाळगणे त्याहून चूक आहे. वेळप्रसंगी स्वतःच पाघरलेल्या वाघाच्या कातड्याखालून 'आधी सांगितले, मग-( केले नाही तरी चालते. )' अशा स्वरूपाचा केविलवाणा गुरगुराट केल्याशिवाय सतत आपल्यावर स्पॉट कसा राहणार आणि पब्लिकमध्ये आपली हवा कशी खेळणार, नाही का ? तेव्हा तशी काळजी अमजदने घेतली, हे योग्यच आहे. फक्त असा चिडचिड चिरचिराट करण्याचे स्वातंत्र्य त्याला असेल, तर 'तुझे अमुक अमुक काम फडतुस झाले आहे' असे सांगण्याचा आणि 'कौतुकाप्रमाणेच ही टीकाही -अमजदने खुलेपणाने स्वीकारावी' अशी अपेक्षा करण्याचा अधिकार कोणत्याही रसिकाला हवाच !'

या पार्श्वभूमीवर परदेशी राहणाऱ्या आणि वेगवेगळे रंग बदलणाऱ्या त्या सरड्याची मुलाखत एकदम वेगळी वाटली. त्या मुलाखतीत कोणाची खोटी स्तुती नव्हती; पण कोणाला व्यर्थ जोडेही नव्हते, अगदी खोटा विनयसुद्धा नव्हता. एका प्रामाणिक कलाकाराची चित्रपटाविषयीची विलक्षण आस्था त्यात दिसत होती. एखाद्या गहन प्रश्नावर वा विचारावर व्यक्त केलेली कूट मते त्या मुलाखतीत नव्हती; होत्या त्या 'काय, कधी आलात ? कसं काय चाललंय ?' अशा थाटाच्या गप्पाच; पण त्यातूनही एखादी कृती साकारताना तिच्या सौंदर्यासाठी केलेल्या जाणीवपूर्वक विचाराची, प्रयत्नांची आणि घेतलेल्या श्रमांची ओळख पटत होती.

आपले निसरडे बोलणे सोडून देऊन या 'सरडे 'पणासाठी अमजदने काही प्रयत्न केले; तरच-अन्यथा गर्जेल तो पडेल काय-हे शेवटी आधाराला आहेच.

—सदानंद बोरसे

## व्हिएटनाम-थायलंड संघर्ष

पृष्ठ ४ वरून....

परततील; पण राजवट पसंत नसली तर त्यांनी काय करावयाचे ? नव्या राजवटीला प्रतिकार त्यांनी दुसऱ्या देशातून चालू ठेवावा काय ? त्या देशाची संमती असेल तर असा प्रतिकार चालू ठेवता येतो; पण संमति नसेल तर काय करावयाचे ? दुसऱ्या देशात आसरा शोधणे किंवा सर्व परिणामांना तोड देण्याची तयारी ठेवून स्वदेशी परतणे हे दोनच मार्ग त्यांच्यापुढे राहतात. निर्वासितांना परत घेताना आपण नव्या राजवटीशी एकनिष्ठ राहू असे अभिवचन त्यांच्याकडून घ्यावे काय ? अशा अभिवचनांना काही अर्थ नसतो. देशात प्रवेश मिळविण्यासाठी ती दिली जातात आणि नंतर मोडली जातात. पूर्वीचे सरकार पदच्युत करून त्या जागी आलेले नवे सरकार लोकशाही मानणारे असेल तर शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने सरकारला विरोध करण्याचा विरोधकांचा हक्क ते मान्य करील. या निर्वासिताचे ते पुन: वसनही करील, आम्हाला हे सरकार पसंत नाही. पण आम्ही या देशाचे नागरिक आहोत. नागरिक या नात्याने या देशात राहण्याचा आणि आम्हाला नको असलेले सरकार शांततेच्या व लोकशाहीच्या मार्गाने बदलण्याचा हक्क आम्हाला आहे, अशी भूमिका हे निर्वासित घेऊ शकतात. या प्रश्नावर दोन्ही बाजूंनी हीच भूमिका योग्य होय; पण असे क्वचितच घडलेले आढळते.

त्यामुळेच नियोजितांचे प्रश्न दीर्घकाळ अनिर्णित राहिलेले आहेत. अफगाणिस्तातून पाकिस्तानात आलेल्या निर्वासितांना अफगाण सरकार परत घेण्याची शक्यता दिसत नाही. पॅलेस्टिनी निर्वासित तर स्वतंत्र राज्याची मागणी करीत आहेत. या बाबतीतला मूलभूत विचार म्हणजे निर्वासितांचे प्रश्नच का निर्माण होतात ? हे लोक काही स्वखुषीने देशाबाहेर जात नाहीत. स्वदेशात राहणे अशक्य झाल्यामुळेच त्यांना दुसऱ्या देशात आसरा घेणे भाग पडते. त्याना स्वदेशात आपल्या मताप्रमाणे जीवन जगण्याचा हक्क मिळायला हवा. अट फक्त एकच—स्वदेशातल्या सरकारविरुद्ध शांततेच्या व लोकशाहीच्या मार्गानेच त्यांनी लढा द्यावयाला हवा. □

मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे...     —प्रा. वा. ल. कुलकर्णी
(प्रास्ताविकातून)

# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले
हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.
तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०